# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१३

## अंतरंग

**संपादकीय**

## निसर्ग

डॉ. सुरेखा धुरंधर, सौ. शुभांगी शैलेश धराधर, वैशाली विलास देसाई, नलिनी तळपदे,
डॉ. सौ. रश्मी यतिन व्यवहारकर, डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर, सौ. सुरुची अनिल प्रधान,
कल्पना सुभाष कोठारे, अदिती सीमित देसाई, तनिषा नितीन देसाई, सुरज नायक,
दीपश्री कोठारे, शौनक कौशिक जयकर, सुषमा, अपर्णा समीर विजयकर, सुहासिनी कीर्तिकर,

## प्रवासवर्णन-निसर्ग

शुभदा सुरेश आगासकर, केतकी जयकर, कल्पना सुभाष कोठारे

## लेख/कथा

महेश कोठारे, विनोद जी. प्रधान, राजन जयकर, सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर,
मृदुला प्रभुराम जोशी, सतीश शामराव कोठारे, नताशा त्रिलोकेकर, प्रविण मानकर, इना तळपदे,
निनाद केशव धैर्यवान, ऐश्वर्या वेलकर, त्वरिता संजय दळवी,

## परीक्षणे

प्रताप वेलकर, संजीवनी खेर

## व्यक्तिचित्रण

आनंदलक्ष्मी मधुकर विजयकर

## बालसाहित्य

पद्माकर रणजीत, मिथिल वेलकर, अर्णित धराधर, अर्णव धराधर, अनिका जयदीप विजयकर,

## कविता

सुहासिनी कीर्तिकर, कल्पना सुभाष कोठारे, शैलेश शंकर विजयकर,
उज्ज्वला र. ब्रह्मांडकर, यशोदिनी य. राणे, पद्माकर रणजीत, अजित प्रमोद तळपदे,

**वात्रटिका : डॉ. सुमन नवलकर**

**रंगीत छायाचित्रे:** राजेश नवलकर, राहुल आगासकर, धीरेन रणजीत

**व्यंगचित्रे : प्रदीप कोठारे**

**मुखपृष्ठ: राजेश नवलकर, मलपृष्ठ: धीरेन रणजीत**

**प्रभुतरुणास देणगी, प्रभुतरुणाची डायरी, भाऊबीज, संस्थांचे अहवाल**

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

**www.prabhutarun.com**

कार्यकारी संपादक मंडळ :
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक,**
**संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

**वर्ष ४७ वे)** **नोव्हेंबर २०१३** **(अंक ५**

***संपादकीय***

# शुभम् भवतु!

**-सुहासिनी, संजना, मीनाक्षी, मयुरा, वैजयंती = आम्ही सर्व**

मित्रहो,

हा अंक हाती येईल तेव्हा देवदिवाळी चालू असेल. तिच्या साक्षीने आणि सकारात्मक भावनेने मनापासून तुम्हा सर्वांना दिवाळीच्या, नववर्षाच्या शुभेच्छा. शुभेच्छांचं बळ मोठं असतं. वारकरीही वारीत भेटले की एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून आलिंगन देत शुभेच्छा देतातच. आपली भावना दुसऱ्यापर्यंत पोहोचणं अत्यंत निकडीचं असतं.

विशेषत: सध्याच्या घडामोडी पाहिल्या की. अशावेळी प्रभुतरुणावरील आपलं प्रेम आम्हाला उभारी देणारं आहे. खात्रीच आहे की ते आंधळं नाही. विवेकी आहे. मित्रहो, तुमच्या प्रेमाची, विवेकाची ‘मन झाले ग्वाही’. या मनानं म्हणूनच सश्रद्ध होऊन एकमेकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊया. या अंकाचे मुखपृष्ठ राजेश नवलकरच्या फोटोने उजळले आहे. त्याचे पारितोषिक प्राप्त फोटो आतही आहेत. धीरेन रणजीत आणि राहुल आगासकर यांच्याही फोटोंनी हा अंक अगदी मलपृष्ठापर्यंत उजळला गेला आहे. प्रदीप कोठारेंची व्यंगचित्रे ही दरवर्षीची खासियत. ही चित्रेही यंदा अंकात विराजमान आहेत. यामुळे शुभेच्छांमध्ये भरच पडणार आहे.

लेखक, कवी, देणगीदार, जाहिरातदार, वाचक... सर्वासर्वांना प्रभुतरुण दिवाळी अंकाचीही कडकडून गळाभेट. वारकऱ्यांच्या निष्ठेने, भावनेने. ‘निसर्ग’ हा विशेष विभागही तुम्हाला गळाभेट द्यायला आला आहेच.

असेच दर महिन्याला भेटत राहूया.

शुभम् भवतु!

# निसर्ग

*'निसर्ग' हा अनुबंध घेऊन प्रभुतरुणाने विशेष विभाग सादर केला आहे. त्याला अनेकांचा या विषयाच्या प्रेमापोटी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला*

*-संपादक*

## लेख

# Save Water

**✶ Dr. Surekha Dhurandhar ✶**

`Water' has been one of the most essential components for the existence of life on the earth. Terned as most precious, the importance of water is beyond one's vocabulary.

Historically, our ancient civilisations necessarily established, survived & prospered adjuscent ot an important source of fresh water, invariably a flowing and clean river. Availability of water contributed immensely to the census of human population.

Over the years, techiological advancements, Industrial & population growth and increased prosperity has put tremendous pressure on this important natural resource `Water'.

`Quenching Thirst' didi not remain the only need as water had been substantially used to provide the luxuries of life. Man's conquest continued to explore not only the natural but un-natural sources of water too and by now. Every possible source of water has got tapped.

The process of ensuring constant source of water must have started by collecting rain water in a simple container, the concept which repidly got magnified into creating artificial lakes. The engineering skills of man resulted in construction of dams and boring of wells etc. The quest for water was so enormous that the human mind did not just think but put complex techologies to work such as. `reverse osmosis' to convert salt water from sea of potable sweet water. Experiments such as inducing artifical rains and du-routing of rivers thought canals are now regularly practiced. The crazy human mind even thought of toeing icebergs from the North Pole into the Mediterranean Sea to provide drinking water in the deserts. Inspite of all these efforts, water contiuned to remain insufficient.

As per the available statistics, out of total water existing on earth, only 2.5% is sweet. While just 0.08% is available for human use the agriculture consumes the major chunk of 70%. The World Water Council's report estimates that in next two decades the use of water by human will increase by about 40% and that 17% more water than is available today, will be needed to grow the world's food requirements.

It is quite evident that the resources of water have been explotied by their maximum. Since we can not generate anymore fresh water it is extermely necessary to conserve the available water and explore the possibility of recycling the used water. With the help of modern techologies it is

possible to treat waste water coming out of Industrial effluent, kitchens, bathrooms or sewage and use the same for other applications such as watering of plants to mainting gradens and even for agriculture. This recycled water many a times is known to provide organic fertilizers too. The enormous consumption of water in agriculture can now be substantially reduced by employing even at the house hold level is `Water Harvesting'. Rain water which flows away through the drain into the sea can be put back into the tubewell so that subsoil water collection is enriched. Our Government has been giving subsidies and also making it compulsory for the new industrial units & residential buildings to install water harvesting facilities.

It is feared that `War of the 21st Century' will be fought over the most precious commodity `water'. The only way to prevent the war is to conserve and save water not only for our survival but for the posterity too.

## UNINTENTIONAL WASTAGE OF WATER

| Acivity | Method Adopted | Qty Used ltr. | Method to be adopted | Qty. Required Ltr. | Qty Saved Ltr. |
|---|---|---|---|---|---|
| Brushing Teeth | Running tap for 5 min | 45 | Tumbler or Glass | 0.5 | 44.5 |
| Washing Hands | Running tap for 2 min | 18 | Half filled Wash Basin | 2 | 16 |
| Shaving | Running tap | 18 | Shaving mug | 0.25 | 17.75 |
| Shower | Letting Shower run while soaping staying under shower too long | 90 | Wet down, Tap off soap up Rinse off | 20 | 70 |
| Flushing Toilet | Using Old fashioned large capacity system | 13.5 or more | Dual System Short Flush Liquid Waste full flush soild waste | 4.59 | 4.5 or more |
| Watering Plants | Running hose for 5 minutes | 120 | Water can | 5 | 115 |
| Floor | Running hose for 5 minutes | 200 | Mop and bucket | 18 | 182 |
| Washing Car | Running hose for 5 minutes | 400 | Buckets (two) | 18 | 382 |

Conserve Water for Tomorrow
Please use Water with Care

*

# 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी'

✶ सौ. शुभांगी शैलेश धराधर ✶

लहानपणापासून माझे एक स्वप्न होते. आपला छोटासा बंगला असावा. त्याच्या सभोवती झाडेच झाडे असावीत. अंगणात सुंदर फुले, फुलपाखरे, नानाविध पक्षी असावेत आणि आपण त्यांच्याबरोबर मनमुराद खेळावे. हे स्वप्न बघण्याला एक कारण म्हणजे जन्मत:च असलेली निसर्गाची आवड आणि दुसरे, लहानपणी पाहिलेला मामाचा वाडा.

लिंबोणीचे झाड करवंदी
मामाचा वाडा चिरेबंदी

हे गाणे ऐकत मोठी होत असताना मामाच्या घरी जायची संधी मात्र मिळाली ती तिसरीत असताना, आणि खरोखरच स्वप्नातला वाडा प्रत्यक्षात समोर उभा ठाकला. कर्नाटकातील 'धारवाड' हे माझ्या मामाचे गाव. त्या गावात जवळ जवळ तीन एकर जागेत वेगवेगळ्या झाडांच्या कुशीत विसावलेला मामाचा वाडा अक्षरश: वाडाच. खरोखर काय नव्हतं त्या बागेत? आंबा, चिकू, पेरू, केळी, फणस, राजावळे, डाळींब, जाम, जांभूळ, नारळ आणि चिंचा ह्यांची कितीतरी झाडे होतीच. निरनिराळ्या प्रकारचे व रंगाचे गुलाब, शेवंती, जास्वंद, तसेच मोगरा, अबोली, चाफा ही फुलझाडे तर होतीच; पण पहिल्यांदाच मी वेगवेगळ्या प्रकारचे कॅक्टसही त्याच बागेत पाहिले होते. पूर्ण दिवसभर चिवचिवणाऱ्या विविधरंगी चिमण्या, तऱ्हतऱ्हेच्या सुंदर पक्ष्यांची किलबिल मनात ठेऊनच मी लहानाची मोठी झाले. त्याच वाड्याचे स्वप्न पहात आले. जणू मी अशा घराचा, बागेचा ध्यासच घेतला होता आणि ईश्वराने माझी इच्छा पूर्ण केली. ध्यानीमनी नसताना ह्यांनी मला मागणी घातली. आमचा प्रेमविवाह. पण त्यावेळी मला ह्यांच्या काकांचे अलिबागला असेच सुंदर घर आहे हे माहीतही नव्हते. लग्न झाले आणि ज्यावेळीअलिबागच्या बागेत पहिल्यांदा पाय ठेवला तेव्हा मी वेडावूनच गेले. कारण अगदी मामाच्या घराइतका वाडा नसला तरी अर्धा एकर जागेतला तो एक सुंदर बंगला होता.

मामाच्या बागेसारखीच इथेही आंबा, चिकू, फणस, केळी, चिंचा, बोरे, शेवगा ह्यांची झाडे होती. मोगरा, चाफा, अनंत, कागडा, जास्वंदाची झाडे होती. सकाळ व्हायची ती कोकीळेच्या मंजुळ कुहूकुहूने आणि भारद्वाज पक्ष्याच्या धीरगंभीर 'कुक-कुक' ह्या आवाजाने. जसजसा दिवस चढत जायचा तसतसे, कोकीळ, निरनिराळ्या रंगाच्या व आकाराच्या चिमण्या, कोतवाल, पोपट, खंड्या, सातभाई, भोरड्या, हळद्या हे पक्षी समोरच्या चिंचेवर हजेरी लावून जायचे. तिथेच मी पहिल्यांदा बागेत नारळाच्या झाडावर 'धनेश' पक्षी बघितला आणि आश्चर्य म्हणजे एक पांढरेशुभ्र घुबड आमच्या घराच्या पाण्याच्या टाकीजवळ बस्तान ठोकून होते. बागेतल्या विहिरीतले मासे, कासव, तसेच बागेत फिरणारी छोटी कासवे, वेगवेगळे साप, सरडे, खेकडे, रंगा–बेरंगी किडे, फुलपाखरे पाहून मी वेडावून गेले होते.

दुपारच्या वेळी तर जवळ जवळ बारा-पंधरा पोपट आणि साळुंक्या पाठीमागच्या आंब्याच्या झाडावर धुमाकूळ घालायचे आणि हो; छोट्या-मोठ्या खारूताई तर हक्काने आमच्या अंगणातच नव्हे; तर व्हरांड्यातसुद्धा दंगामस्ती करायच्या. त्यांची ती पळापळ पहाताना वेळ कसा जायचा तेही समजायचे नाही.

संध्याकाळी घरापाठी असलेल्या समुद्राची गाज ऐकताना मन कसे शांत व्हायचे. तो नितळ समुद्र, किनाऱ्यावरचे ते सुरूचे बन, किनाऱ्यावर असलेले

शंख-शिंपल्यांचे भांडार आणि सूर्यास्ताचा तो अवर्णनीय देखावा सोडून पुन्हा मुंबईला परतावे लागायचे. मन विषण्ण व्हायचे. पाय जड व्हायचे. कारण पुन्हा ह्या मुंबईच्या काँक्रीटच्या जंगलात परतायचे. ते गाड्यांचे कर्कश आवाज, ती धूळ, ते प्रदूषण, ती गर्दी आणि ट्रॅफिकजाम नकोसे वाटायचे. नको ती मुंबई. 'गड्या अपुला गाव बरा' असे मन सांगायचे. पण नोकरीच्या कारणाने पुन्हा मुंबई गाठावीच लागायची.

परंतु आपली मुंबईसुद्धा पूर्वी अशी बकाल नव्हती. त्या वेळचे मुंबईचे सौंदर्य काय वर्णावे? इथे सुद्धा छोटे-छोटे बंगले, छोट्या-छोट्या वाड्या होत्या. सुंदर बागा होत्या, साफ-सुंदर रस्ते होते. असे म्हणतात की मुंबईचे रस्ते पूर्वी रोज पाण्याने धुतले जायचे. पण आज आपल्यालाच स्वच्छ पाणी मिळण्याची मारामार; तिथे रस्ते कुठले धुणार हो? आज मुंबईत काय आहे? जिकडे बघावे तिकडे घाण, प्रदुषण. एकीकडे गगनचुंबी इमारती आहेत तर त्याच्याच दुसऱ्या बाजूला बकाल झोपडपट्टी आहे. कुठे गेले ते पूर्वीचे स्वच्छ-सुंदर रस्ते? आज रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ते; तेच शोधावे लागते. ती शुद्ध हवा, ते सुंदर-स्वच्छ समुद्रकिनारे कुठे गेले? माझे दुसरे आजोळ (बाबांचे आईवडील) शिवाजीपार्कला रहायचे. त्यामुळे माझे लहानपण शिवाजीपार्कमध्ये आणि तिथल्या चौपाटीवर खेळण्यात गेले. आजही तो स्वच्छ सुंदर किनारा, त्या किनाऱ्यावर बनवलेले ते वाळूचे किल्ले, घातलेला धुमाकूळ डोळ्यांपुढे येतो आणि आजची दादरची चौपाटी पाहून रडू येते. अगदी मुलांना दाखवण्यासाठीसुद्धा त्या चौपाटीवर जायची इच्छा होत नाही.

मुंबईची ही अवस्था कोणी केली? आपणच ना? आज प्रत्येकजण फक्त स्वत:पुरतेच बघतो. आपले घर तर साफ आहे ना, मग भले कचरा शेजाऱ्यांच्या दारात पडो की रस्त्यावर पडो! वेफर्सची पाकीटे, बिस्कीटचे कागद, भेळेचे कागद, पाण्याच्या बाटल्या, आईसक्रीमचे कप असोत की कोकचे टीन; बिनधास्त गाडीतून किंवा खाऊन झाल्यावर रस्त्यात फेकले जातात. हे कोण बदलणार? मुंबईचे सिंगापूर करण्याचे स्वप्न बघणाऱ्यांनी पहिली मुंबईकरांची मानसिकता बदलायला हवी; तर फायदा. अन्यथा बकाल मुंबईचे बकाल सिंगापूर व्हायला कितीसा वेळ लागणार? चला आपणच स्वत: बदलूया. परिवर्तनाची सुरवात स्वत:पासून सुरू करूया. आपले गाव मुंबई सुंदर करूया. झाडे लावूया, झाडे जगवूया. पुन्हा एकदा मुंबईच्या जमिनीवर हिरवळ फुलवूया. वृक्षराजीने मुंबई बहरून नेऊया. मुंबई प्रदुषणमुक्त करूया. कदाचित आपल्याला ती रम्य, सुंदर मुंबई पहायला मिळणारही नाही. पण आपल्या मुला-नातवंडांना तर त्या सुंदर स्वच्छ मुंबईचे सुख उपभोगायला मिळेल.

चला तर आपल्या स्वप्नातल्या उद्याच्या स्वच्छ-सुंदर आणि निसर्गरम्य मुंबईसाठी आजच आपण पाऊल उचलूया.

*

---

## हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



**लेख**

# मुंबईतला निसर्ग-मला भावलेला

**✶ वैशाली विलास देसाई ✶**

मुंबईसारख्या मोठ्या शहरातल्या विलेपार्ले या उपनगरात माझा जन्म झाला आणि निसर्ग म्हणजे काय याची जाणीव होण्यापूर्वी त्या निसर्गाच्या कुशीत खेळत बागडतच मी लहानाची मोठी झाले. छोटेसे कौलारू घर, घराभोवती अंगण, अंगणात फळाफुलांची झाडे, मेंदीचे कुंपण व मातीच्या पायवाटा हे तेव्हाचे दृश्य मी कधीच विसरू शकत नाही.

कालांतराने भोवतालच्या परिसरात सुधारणा होऊ लागल्या. राहाणीमानात अपरिहार्यपणे बदल घडू लागले. यंत्रयुगाने माणसाला भौतिक सुखसोयी दिल्या. कोंबड्याच्या आरवण्यापेक्षा व सूर्याच्या उगवण्यापेक्षा मुंबईकर घड्याळाच्या गजराने दिवस सुरू करू लागला. आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाणे दिनचर्या आखू लागला. पण मग या आखीव दिनक्रमात त्याला निसर्गाचा आस्वाद घायला फुरसद मिळते का? नसेलही, पण म्हणूनच वेळात वेळ काढून मुंबईकर सुट्टीच्या दिवशी निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जातो. निसर्गाशी असलेले आपले नाते जोपासतो.

आज मुंबई शहरातल्या प्रचंड लोकवस्तीला जमीन अपुरी पडू लागल्याने ती आकाशात घुसू पाहते आहे. याचा परिणाम म्हणून उंच टॉवरमध्ये राहणारा माणूस जमिनीवरच्या मातीपासून दूर दूर जात चालला आहे. मात्र सुखासीन जीवन जगतानाही संवेदनाक्षम मनाचा एक कोपरा त्याने राखून ठेवला आहे. मग तो प्रचंड वृक्षाचे बोन्साय करून आपल्या घरात ठेवतो आणि जमेल तशी निसर्गाशी जवळीक साधतो. तुळशीवृंदावन नाहीतर नसू दे. पण छोट्या कुंडीत तरी गृहिणी तुळशीचे रोप लावते. मुंबईतल्या अनेक चाळींतून अगदी डालडाच्या रिकाम्या डब्यातूनसुद्धा तुळस डोलताना दिसते. अर्थात यातून तिची श्रद्धा जोपासलेली असते. आजही आगगाडीच्या खिडकीतून लाल गुलमोहर व पिवळा बहावा नजरेस पडतो. मुंबईला मोठा समुद्रकिनारा लाभलेला आहे. तिथे गेल्यास ओल्या वाळूतल्या पाऊलखुणा, अथांग सागराची गाज, मावळतीचा सूर्य हे दृश्य अनुभवता येते. अशा वेळी मुंबईकर आपले रोजचे धकाधकीचे आयुष्य क्षणभर विसरून जातो.

चंद्र, सूर्य, तारे, इंद्रधनुष्य, फुले, पाने, पशू, पक्षी हे फक्त कवितेतूनच नाही तर; प्रत्यक्षातही आपल्याला दिसतात. मात्र त्यासाठी छोटासा का असेना, निळ्या आकाशाचा एक तुकडा आपल्या वाट्याला यायला हवा. सुदैवाने माझ्या घरातून भरपूर वनश्री दृष्टीस पडते. पावसाळ्यात 'हिरवे-हिरवे गार गालीचे, हरित तृणांच्या मखमालीचे' पसरलेले दिसतात. बदामाच्या झाडावर पोपट येऊन बसतात. लहानपणी फॅमिली मेंबर असलेली चिमणी आता मधूनच कधीतरी चिवचिवते. खारूताई 'सर सर झाडावर झरझर खाली' पळताना दिसते. शाळेत असताना मोकळ्या मैदानात लांबून धावत येणारा पाऊस भिजवून गेला होता. आता मात्र रस्त्यावरचे खड्डे चुकवत त्याला सामोरे जावे लागते.

आपण शहरी आयुष्य जगत असलो तरी मनाचे डोळे उघडे असतील तर आपल्यालाही बहिणाबाई चौधरींच्याप्रमाणे 'टाळ्या वाजविती पाने, दंग देवाच्या भजनी' असा साक्षात्कार होऊ शकेल. माझ्या मते निर्गुण, निराकार ईश्वर निसर्गाच्या रूपाने आपल्या सभोवती साकार झालेला आहे. निसर्गात संगीत आहे, नृत्य आहे, सप्तरंगांची उधळण आहे, नवरसांचा परिपोष आहे, मातेची माया आहे, पित्याचा आधार आहे. गुरूचे मार्गदर्शन आहे. तो आजीचा बटवाही आहे. आपण खेड्यात किंवा मुंबईसारख्या शहरात कुठेही रहात असलो तरी खरे तर आपण निसर्गाच्या कुशीतच राहत असतो. किंबहुना आपण त्याचाच एक अंश असतो म्हणून आपण निसर्गावर प्रेम केले, त्याचे नियम पाळले, तर देवाचा वरदहस्त कायम आपल्या मस्तकावर राहील यात शंका नाही.

✳

लेख

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे!

**✶ नलिनी तळपदे ✶**

हे गणाधीशा, गणनायका, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आमच्या विनंतीला मान देऊन आपण आलात. दहा दिवस आमचा पाहुणचार घेऊन आमचा निरोप घेतलात. आम्हीही नेहमीप्रमाणे पुढच्यावर्षी लवकर येण्याचे आपणास आग्रहाचे निमंत्रण दिलं.

सर्वेश्वरा, आपण लालबागचे, गणेशगल्लीचे, पुण्याच्या दगडूशेट हलवाईचे, कसबा, गणेशपेठ, तुळशीबागेचे सार्वजनिक अथवा घरगुती असलात तरी आमच्यासाठी ॐकारस्वरूप आहात.

आपलं आगमन आम्हाला नेहमीच उत्साहवर्धक, आनंददायी वाटतं. पण आपण मात्र केवळ रूढी, परंपरा म्हणून उसनं अवसान आणून इथं येता असं वाटतं. आपल्या मनातली नाराजी यावेळी तरी आम्हाला स्पष्ट जाणवली.तसं नसतं तर साक्षात् विघ्नहर्त्याच्या विसर्जनावेळी स्टिंग रे माश्यांच्या रुपानं विघ्न आलंच नसतं. बावन्न माणसांच्या पावलांचे चावे मूर्तिमंत मत्स्यरुपी नारायणकरवी घेऊन आपण आपल्या नाराजीची चुणूक दाखविलीत.

'देवा गजानना, आपली नाराजी आम्ही समजू शकतो. आपला रोष आहे तो आपल्या आगमनाप्रीत्यर्थ केलेल्या बेसुमार उधळपट्टीवर. रस्त्यातल्या खड्ड्यांवर. ठिकठिकाणी लावलेल्या जाहिरातींच्या फलकावर, कर्णकर्कश संगीतावर. मंडप उभारण्यासाठी खोदलेल्या जमिनीवर आणि हे सर्व करणाऱ्या गणेशोत्सव मंडळ कार्यकर्त्यांच्या बेताल वागणुकीवर. होय ना हेरंबा?'

''अर्थातच, माझी तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती. प्रत्यक्ष बुद्धीदात्यासमोर आपली बुद्धी गहाण ठेवून वागल्यानं आपण त्या बुद्धीच्या दैवताचा म्हणजेच माझा अपमान करता आहात एवढंही तुम्हाला कळू नये?''

''क्षमस्व मोरेश्वरा, पण सगळ्याच मंडळाचे कार्यकर्ते असे नसतात. कित्येक मंडळे सेवाभावी, लोकोपयोगी कार्य करत असतात. भाविक जनतेकडून मिळालेल्या अमाप द्रव्याचा जनतेच्या हितासाठीच विनियोग करणारी काही मंडळं आहेत. पण हे मी आपल्याला का सांगतोय? आपण तर सर्वसाक्षी, सर्वज्ञानी आहात.''

''तो तर मी आहेच. पण तुझ्या अज्ञानाचं काय?अशा काही मंडळांच्या सत्कार्याचा आढावा देऊन प्रश्न सुटणार नाही. अरे, लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचा मूळ हेतूच तुम्ही विसरला आहात. चार माणसं एकत्र जमून विचारांची देवाणघेवाण करणं, चार हिताच्या गोष्टी, चांगल्या कल्पना लोकांच्या मनात बिंबवणं, त्यासाठी चांगल्या वक्त्यांची भाषणे ठेऊन जनतेला प्रेरित करणं, या शुद्ध हेतूनं सुरू झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचं तुम्ही तर विडंबन करून टाकलंय. त्यापेक्षा अलीकडे कुणा सुबुद्धमानवाच्या डोक्यातून निघालेली 'एक गाव एक गणपती'ची कल्पना तुम्ही का उचलून धरत नाही? म्हणजे उत्सवाच्या नावाखाली चाललेला हा गोंधळ, गदारोळ तरी होणार नाही.''

''आपलं म्हणणं मला पटतं गणराया, पण एक गाव एक गणपती करायला मतही असायला हवं ना? इथे तर आधी मतामतांचा गलबला, मग पुढचं पाऊल उचला असं असतं. बरं ते जाऊ दे, पण एक सांगू-

आपण ज्या दिमाखात लालबागला येता ना, त्या आपल्या राजबिंड्या रुपाचं दर्शन घेण्यासाठी भाविक आपल्या काळवेळेचं, तहानभुकेचं भान विसरून तिष्ठत असतात. 'लालबागच्या राजा' म्हणून आपलं नामकरण या लोकांनीच केलं असावं.''

''नुसता नामधारी राजा. ज्याला चार हात असूनही एका हातानं त्या बेमुर्वत कार्यकर्त्यांना चपराक मारता आली नाही.''

''हे मात्र अतीच झालं हं देवा! देवदर्शनासाठी

तासन्तास रांगेत तिष्टत राहणाऱ्या भाविकांना क्षणभरही आपल्यापुढे उभं राहता येऊ नये?स्त्रियांनाही सरळ सरळ हाताला धरून ढकलणारी ही त्यांची मुजोरी, जनतेच्या दरबारात नसलं तरी तुमच्या दरबारात या माजुर्ड्यांना कडक शासन करा हं देवा!''

''शासन आम्ही करूच. पण तुमचं प्रशासन? ते तर जनतेच्या चार पावलं पुढेच. नवी मुंबईतील कुणा नगरसेवकानं शारदोत्सवाच्या निमित्ताने केलेल्या उपद्व्यापानं धरणीमातेसारखं आमचंही अंत:करण विदीर्ण झालं आहे. या नगरसेवकानं विधायक कार्य करण्याऐवजी पर्यावरणाची हानी करून विध्वंसच केलाय आणि तो कशासाठी; तर नवरात्रात गरबा खेळण्यासाठी.''

''हो वाचलीय मी ती बातमी. दांडिया खेळायला मोठ्ठी जागा हवी म्हणून रस्त्याच्या मधोमध असलेला दुभाजकही त्यांनी रातोरात हलवला म्हणे.''

''आता तूच पाहा- असे तुमचे उत्सव आणि महोत्सव.रस्त्यावर खड्डे अणून जमिनीची नासधूस करणं, झाडांची उलथापालथ करून पर्यावरणाचा तोल डावलणं, थोडक्यात; स्वत:च्या मस्तीत, धुंदीत निसर्गाचा आब न राखणं, निसर्ग जितका मनमोहक, आल्हाददायक, तितकाच कधी रुष्टही होऊ शकतो. नुकताच उत्तराखंडात झालेला निसर्गाचा प्रकोप आठवतोय ना? पैशाच्या लोभानं मानवाने पर्यावरणाच्या अपरिमित केलेल्या हानीनं दुखावलेल्या निसर्गानं मानवाचा घेतलेला तो बदला होता. एवढं होऊनही तुम्ही निर्बुद्धासारखे वागत राहिलात तर मी ती माझी हार समजेन.''

''नाही परमेश्वरा, आपल्यासारख्या बुद्धीदात्यांनी या निर्बुद्धांच्या घोळात न पडणं चांगलं नाही का? वनस्पतीनांही जीव असतो. कित्येक वनस्पती आम्हा मानवासाठी जीवनदायी ठरणाऱ्या आहेत. या झाडाझुडुपांमुळे आम्हाला प्राणवायू. सावली, पक्ष्यांना निवारा मिळतो. अंगणातलं तुळशीवृंदावन सबंध घराला चैतन्य आणि शोभा देतं. आत्ताच्या फ्लॅटसंस्कृतीत ते शक्य नाही. तरी कित्येक घरात तुळशीच्या कुंड्या ठेवलेल्या दिसतात. अलीकडे समारंभातून मान्यवरांना तुळशीची रोपं देण्याची प्रथा सुरू झाली आहे. गणराया, नुकतेच स्वर्गवासी झालेले मोहन धारिया- त्यांनी तर राजकारणातून निवृत्त झाल्यावर वृक्षवेलींच्या संवर्धनात, निगराणीत सर्वस्वी वाहून घेतलं होतं. त्यांच्या निधनानं वनराई खऱ्या अर्थानं पोरकी झाली.''

''खरंच झाडाझुडुपांवर इतकं जीवापाड प्रेम करून, निसर्गाचा आदर आणि पर्यावरणाची कदर करणारी णाणसं फार विरळा. उलट मनमानी कारभारानं पर्यावरणाचा ऱ्हास करण्याचीच प्रवृत्ती वाढत चाललेली दिसतेय.''

''पण गणाधीशा, या वर्षीचा दीपोत्सव फटाके कमी लावून ध्वनीप्रदूषणमुक्त केला होता. पर्यावरणाचाही तोल सांभाळला गेला.''

''तसं असेल तर चांगलंच आहे की, त्याच वाटेवरून पुढे पावलं टाकलीत तर ठीक. पर्यावरणाचा हा स्नेह तुम्हालाच लाभदायक ठरेल. या वनस्पती आम्हा देवाधिकांनाही अतिशय प्रिय आहेत. मला वाहिल्या जाणाऱ्या दुर्वा, श्रीशंकरांना वाहिले जाणारे बेल, भगवान विष्णुच्या, पांडुरंगाच्या गळ्यात रुळणारी वैजयंती म्हणजेच तुळस ही त्याचीच निदर्शक आहेत. अशाच काही औषधी आयुर्वेदिक वनस्पती केवळ तुमच्या सोयीसाठी अविचारानं उपटून पर्यावरणाचा नाश करू नका. नाही तर; नाही तर; या पृथ्वीतलावर दहा दिवसच काय; एक दिवस येण्यासाठी पण मला दहादा विचार करावा लागेल.''

''नाही- नाही. प्रथमेशा; आजपर्यंत पर्यावरण, प्रदूषणाच्या बाबतीत आमच्याकडून खूपच हयगय झाली. असा निष्काळजीपणा पुन्हा होणार नाही. आम्हाला एकच संधी द्या बाप्पा मोरया...

...आणि पुढच्या वर्षी लवकर या!''

*

## ओढणी

तोंडावर ओढणी लपेटून होती, तेव्हा तो तिच्या प्रेमात पडला,
रोज नवी ओढणी पाहून मनोमनी हरखून गेला,
एकदा तिने सोडली ओढणी, म्हणाली उकडतंय फार,
ओढणीचा फास लागल्यासारखा तो मग पडला गार.

**-डॉ. सुमन नवलकर**

# शिक्षिकेच्या बालानुभवातून साकारणारे बालवाडीतील मुलांचे निसर्ग शिक्षण

**⁎ डॉ. सौ. रश्मी यतिन व्यवहारकर ⁎**

असे म्हणतात की निसर्गाच्या सान्निध्यात त्याची ओळख चांगली होते. निसर्गाशी गट्टी करण्याची संधी मला ७-८ वर्षांची असल्यापासून मिळाली. माझ्या वडिलांच्या आत्याचा लोणावळ्याला बंगला आहे. दरवर्षी सर्व सुट्ट्यांमध्ये महिनाभर आम्ही तिथे वास्तव्याला जात असू. तेव्हाचे लोणावळा शहर (१९६५ साली) शहरवजा गावच होते. मला आठवते की, त्यावेळी आमचा बंगला व समोर महमद रफीचा बंगला असे दोनच बंगले त्या भागात होते. पाठीमागे एका पारशी कुटुंबाचे १२ बंगले होते. परंतु ते नेहमी तसे रिकामेच असत. बाकी सर्व वनराई, आजुबाजूला शेतं, फळबागा आणि फुलबागा. समोरच मोठी पेरुची बाग होती, तिथे आम्ही दिवसभर पेरू पाडत, खेळत बागडत असू. बाग इंद्रायणी नदीकाठी असल्यामुळे नदीतले मासे पकडत, किडे पकडत आम्ही हुंदडत असू. आमच्या बंगल्याभोवती मोठी बाग होती. त्यात आमच्या आत्याआजी व आजोबांनी (आम्ही त्यांना माई आणि पप्पा म्हणत असू) या बागेत मोठ्या मोठ्या आकाराच्या वेगवेगळ्या रंगाच्या आणि जातींच्या गुलाबांची झाडे लावली होती. निलगिरीची झाडे वाऱ्याबरोबर डुलत असत. पेरूच्या झाडांवर मोठे मोठे पिवळेधमक पेरु फक्त माझ्या नजरेला दिसत. त्याच्या बाजूलाच कोपऱ्यात करमराचं झाड होतं. चिकू, आवळा, गावठी आंबे, जांभ, लिची जे म्हणाल त्याची झाडे होती. आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीची वाट पाहत असू. मेच्या मध्याला आमची गाडी लोणावळ्याला पोहेचे. गेटवर पोहचताच टॉमी कुत्रा आमच्या स्वागतास सज्ज असे. तसा टॉमी हा भटक्याच होता. पण आमच्या जयवंती बंगल्यात त्याला छत्र मिळालं. मी त्याला खूप घाबरत असे. सर्व मोठी माणसे म्हणजे बाबा, आई, माझा भाऊ, मामा, मावशी सर्व सकाळी उठत. मी मात्र झोपलेली असे. डोळे उघडल्यावर समोर टॉमी उभा. त्याबरोबर माझी किंकाळी, जसा काही माझी राखण करीत असे.

सकाळी उठल्यावर समोरच्या टेकडीवर (साखरपठार) मारूतीच्या देवळातील घंटानाद ऐकू येई. समोरच्या टेकडीतून सूर्यराजाचे दर्शन होत असे. व्हरांड्यात उभे राहिले की, डावीकडे लोहगड व विसापूर हे किल्ले आणि उजवीकडे बॅरोमीटर टेकडी. त्यावर ढग जमले की आजोबा म्हणत, चला आता पाऊस येणार आणि खरंच एक दिवस पाऊस पडत असे.

एके वर्षी मजाच झाली. माझ्या भावाला निसर्गाची पक्षी, प्राणी याची खूप आवड. असाच पाऊस पडला आणि सगळीकडे डराव डराव असा आवाज यायला लागला. आमचे मामा आणि भाऊ गेले बेडकांच्या शोधात. एक २५-३० बेडूक आणले पकडून आणि पाण्याच्या हौदात सोडले. हौदात पाणी भरलेले नव्हते. काही वेळाने पाहतो तो संबंध हौद बुडबुड्यांनी भरलेला. आम्ही विचार करीत गेलो हौदाजवळ आणि काय आश्चर्य! प्रत्येक बुडबुड्याला एक काळा डाग होता. माझ्या प्राणीप्रिय भावाला लगेच लक्षात आले की, ही बेडकांची अंडी आहेत. आमचे जीवशास्त्राचे शिक्षण येथूनच सुरू झाले. पण अंड्यातून छोटे बेडूक येण्यापूर्वी आईने हौद साफ करायला सांगितले. आम्ही बेडकांची अंडी नाल्यात सोडली. नंतर संबंध दिवस हौद साफ करीत होतो. परंतु त्याची मजा काही औरच होती.

असेच एकदा नदीकाठी फिरायला गेलो असताना छोटी छोटी भोकं जमिनीत दिसली. आत बोटं घातली की काहीतरी बाहेर येई व परत आत जाई. येणारे जाणारे गावकरी सांगत, 'अरे पोरांनो हात सांभाळा, साप असेल. दंश करेल' पण जसे आम्ही पुढे चालायला लागलो तसे मोठाले खेकडे त्यातून बाहेर पडू लागले. मग ते पकडण्यात आमची दुपार गेली. घरी आल्यावर संध्याकाळच्या जेवणात चिबोरीचं खडखडलं आणि गरम गरम भात घरातल्या थोरामोठ्यांची शाबासकी देऊन गेला.

एका दिवाळीच्या सुट्टीत, मुंबईत दिवाळी साजरी केल्यावर आम्ही आलो लोणावळ्याच्या बंगल्यात. फटाके घेऊन. आजी आजोबा, काका आणि आम्ही भाऊबहीण. संध्याकाळी फटाके लावण्यास सुरुवात केली. काही वेळ मजेत गेला. नंतर हळूहळू न दिसणाऱ्या बिळांतून काहीतरी वळवळू लागले. पाहतो तर फटक्यांच्या आवाजामुळे बाहेर आलेले छोटे-मोठे साप. झोपायला बेडरूममध्ये गेलो तर ३-४ सापाची पिल्लं घरात घुसली होती. आवाज शांत झाल्यावर हळूहळू ती निघून गेली. परंतु आमची मात्र पाचावर धारण बसली. असंच एकदा मे महिन्यांच्या सुट्टीत मी बंगल्याच्या व्हरांड्यात उभी होते. खाली बागेत लाल पानांच्या झुडुपात एक लाल मानेचा पक्षी (तो बुलबुल आहे हे मला नंतर कळले) सारखे ये जा करत होता. माझे बालमन विचार करीत होते की हा पक्षी असं का करतोय? हळूच मी माझ्या भावाला दाखविले. पण त्या पक्षीप्रेम्याने ते आधीच ओळखले होते. तो म्हणाला, 'न आवाज करता खाली चल,' मी पण त्याचा हात धरून हळूहळू त्या झुडूपाकडे गेले. जवळ जाऊन पाहतो तर काय? बुलबुलाचे छोटे घरटे व त्यात पांढऱ्या करड्या रंगाची छोटी छोटी अंडी. तेव्हा त्या पक्षाचे येणे जाणे उमगले आणि माझ्या उत्सुकतेचे निवारणही झाले. पुस्तकी अभ्यासाशिवाय समजलेले सामान्य ज्ञान ते हेच!

असे म्हणतात की बालपणीच्या आठवणी, अनुभव आपल्याला आयुष्यभर पुरतात. कदाचित या नैसर्गिकरित्या अवगत झालेल्या ज्ञानाचा बालवाडीत लहान मुलांना शिकविताना उपयोग झाला. माझ्या ३० वर्षांच्या बालशिक्षणाच्या कारकिर्दीत या ज्ञानाची, वेगवेगळ्या प्रसंगी मिळालेल्या अनुभवांची, मी मुंबई सारख्या कॉक्रींटच्या जंगलातसुद्धा सांगड घालत अनौपचारीक शिक्षणपद्धतीद्वारे लहान मुलांना पक्षी, प्राणी, झाडं, पानं, फुले याचे ज्ञान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

१९८०-९२ पर्यंत मी सांताक्रूझ येथील एसएनडीटी प्रायोगिक नर्सरी स्कूल मध्ये बालशिक्षिका होते. तसे एसएनडीटी विद्यापीठाचे आवार खूप मोठे आणि झाडे, पाने, फुले मोठ्या प्रमाणात. खूप पक्षी त्यावर बागडत. कितीतरी तऱ्हेची फुलपाखरे घिरट्या घालीत. बुलबुल, पोपट, बगळे, किंगफिशर किती नावे घेऊ? फक्त त्यासाठी पंचेंद्रिये सावध असणे आवश्यक होते.

आम्ही दर दिवसाआड मुलांना आवारातील वेगवेगळ्या भागात नेऊन झाडांची वेलीची ओळख, पक्ष्यांची ओळख करून देत असू. या कार्यानुभवातून मुलांना शब्दज्ञान, अंकज्ञान, सामान्यज्ञान मिळत असे. आमच्या शाळेच्या आवारात एक गुंजांचे झाड होतं. त्यावर लाल लाल गुंजांच्या शेंगा येत. त्या उघडल्यावर खाली लालभडक सडा पडत असे. या गुंजा मुले गोळा करीत व बाटल्यात भरून ठेवत. तसेच समोर पांगाऱ्याचेही झाड होते. त्याला मोठ्याल्या शेंगा येत. त्या उघडल्यावर गुलाबी लाल रंगाच्या बिया मिळत. याही मुले गोळा करून भरून ठेवत. या बियांचा अंकगणिताच्या पूर्वतयारीसाठी उपयोग होत असे. सगळ्या बिया एकत्र करून मुलांना दिल्या की त्या वेगवेगळ्या करणे हा एक छंदच त्यांना जडत असे. प्रत्येकाकडे किती रंगाच्या कोणत्या व किती बिया आहेत हे सुद्धा मोजले जाई.

माझी आपसूक असलेली उत्सुकता मला स्वस्थ बसू देत नसे. एक दिवस पावसाळ्यात शाळेतील बागेत सहज सळसळ जाणवली. काहीवेळानं सर्व माळीदादा एकत्र आले. पाहतो तर त्यांच्या हातात ५-६ फूट लांब साप. मुले तेव्हा वर्गात होती. माळीदादांच्या मदतीने साप बागेत ठेवला व सर्व मुलांना बागेतील पायऱ्यांवर बसविले. साप बघताच काही मुले घाबरली. धीट मुले हात लावण्यासाठी सरसावली. चौकशी केल्यावर कळले तो साप विषारी नव्हता. हा अनुभव मुलांना प्रथम दर्शनी आगळाच अनुभव देऊन गेला. मुलांना हेही समजले की हा साप शेतातील उंदीर, बेडूक खातो.

आमच्या शाळेच्या बागेत आंब्याचे झाड होते. त्याला एप्रिल महिन्यात कैऱ्या येत. त्या पडल्यावर

त्याचा उपयोग भेळपुरीमध्ये पेरायला होत असे. आणि मुलांना बागेतील कैऱ्यांची भेळपुरी मिळत असे.

१९९२ साली मी माटुंग्याच्या डॉ. बी.एम.एन. कॉलेज ऑफ सायन्समध्ये रुजू झाले. मानव विकास विभागाच्या 'प्रांगण' या प्रायोगिक शाळेची प्रमुख म्हणून कार्यरत झाले. आता सांताक्रूझ ते माटुंगा, म्हणजे सिमेंटच्या या जंगलातून त्या जंगलात. या जंगलातून निसर्गातील वैविध्य शोधून काढणे महाकठीण. परंतु बालपणीच्या निसर्गाच्या देणगीमुळे या भागातील पक्षी, प्राणी जीवजंतूनीसुद्धा मला त्यांस शोधून काढण्यास भाग पाडले. अनुभव उपयोगी आला. इथे मोठी बाग नसली तरी मुख्याध्यापिकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या फुलझाडांच्या, वेलीच्या कुंड्या आहेत. सोनमोहोर, गुलमोहोर, रेन ट्री, वड, पिंपळ, आंबा, अनेक मोठाले वृक्ष आहेत. उंच इमारतीत वसणारे घुबड, पोपट, चिमण्या, कबुतरे, फुलपाखरे, कृमीकिटक, बगळे तसेच ५ गार्डनस् जवळच असल्यामुळे वेगवेगळ्या पक्ष्यांचे तसेच वटवाघळांचे दर्शन घडते. आणि हो! गुंजाचे झाड इथेही आहे. इकडच्या बालवाडीचे अनुभव जरा आगळे वेगळेच.

एक दिवस आमची कॉलेजमध्ये राहणारी सहशिक्षिका सांगत आली की रात्री हू..हू..हू.. असा विचित्र आवाज येतो. असे जवळजवळ एक आठवडा चालले होते. ती एकटीच राहत असल्याने घाबरली होती. जरा चौकशी केल्यावर समजले की, हा आवाज घुबडाचा आहे. त्यानंतर लगेचच एका सकाळी बालवाडीच्या प्रांगणात बरेच कावळे काव काव करीत होते. मी ओळखले की कोणतातरी पक्षी, प्राणी पडला असेल. बागेत गेले तर एका झाडामागे काहीतरी सोनेरी पांढरे हलत आहे. पहिल्यांदा मांजरच वाटली. जरा जवळ गेल्यावर एक छोटंसं घुबडाचे पिल्लू दृष्टीस पडले. बिचारं खूप घाबरलं होतं. कावळे मात्र पिच्छा सोडत नव्हते. माझ्यातील बालशिक्षिका त्वरित जागी झाली. म्हटलं चला, एक प्रासंगिक शिक्षणानुभव मुलांना देता येईल. त्या पिल्लावर टोपली ठेवली; तसे कावळे पळाले. आमची एक हौशी कॉलेज विद्यार्थिनी पुढे झाली आणि तिने टोपलीतून पिल्लू बाहेर काढले व वर्गात आणले. मुलं जरा घाबरलीच कारण हा पक्षी तसा नवीनच होता. पक्ष्याची ओळख मुलांना सहजरित्या झाली. त्याची सोनेरी पांढरी पिसे, फडफडताच मोठा, लांब होणारा पिसारा! पांढरी मान, लुकलुकणारे डोळे, मान इथे तिथे करत सगळेच वेगळे. मुलांनी पिल्लाला पाणी दिलं. त्याचं नाव शोधलं; तर ते बॅन ओल म्हणजे शेतातील घुबड होतं, असं कळलं. आता या पिल्लाचं काय करायचं असा प्रश्न पडला. माझ्या लक्षात आलं की, आमचे एक पालक बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे सदस्य आहेत. त्यांना बोलावलं. लगेचच आले आणि मुलांना अधिक माहिती देऊन आश्वासन दिलं की हे पिल्लू संजय गांधी उद्यानात सोडणार. मुलंसुद्धा खुष झाली.

असाच आणखी एक गमतीदार अनुभव. एका पावसाळी दिवशी उघाडी आल्यावर मुले सायकली घेऊन अंगणात खेळत होती. पावसामुळे बरेच किडे, मुंग्या अवतरल्या होत्या. त्यात सुरवंटसुद्धा होते. काळ काळे, शंभरपादी, तुरुतुरु चालणारे. मुलांना गंमत वाटत होती. मी मुलांना सुरवंटापाशी गोळा करून माहिती सांगत होते. तेवढ्यात एका सुरवंटाने काहीतरी सोडले. एक मुलगा म्हणाला, 'आंटी, सुरवंटाने हिरवे हिरवे टाकले.' मी त्यांना सांगितले की, सुरवंटाने शी शी केली. असा हा मस्त अनुभव.

असे किती प्रसंग व अनुभव सांगावे?याच आनंददायी अनुभवामुळे विद्यादान करताना खूप आनंद होतो. प्रत्येक अनुभव काही नवे शिकवितो. शिक्षिका म्हणून मुलांबरोबर खेळता खेळता माझेही ज्ञान बहरत गेले.

आपल्या धावपळीच्या आयुष्यात सृष्टीचे असे अनेक खुणावणारे इशारे असतात. आपण ते मुलांपर्यंत पोहोचवायचे माध्यम असतो. आपल्या नकळत मुलांची आस्वादकता, त्यांचे निरीक्षण, निर्मिती, त्यांचा भाषाविकास, भावनिक विकास घडतो. या शिकण्या-शिकविण्याच्या प्रक्रियेत नैसर्गिकरित्या मुलांचा सर्वांगसुंदर विकास होतो.

*

कथा

# कुहू-कुहू

**★ डॉ. सुमन नवलकर ★**

'आज कृष्णाची आंघोळ किती वेळ चाललीय. काय करतेय कोण जाणे इतका वेळ बाथरूममध्ये! एरव्ही तर पाच-दहा मिनिटांत येते आंघोळ करून.' ब्रेडला बटर लावता लावता आईची बडबड चालली होती. दाढी करता करता बाबांच्या मनातही तोच विचार चालला होता की कृष्णाला आज आंघोळीला इतका वेळ का बरं लागला असेल?

तेवढ्यात कृष्णा बाथरूममधून बाहेर आली. चेहरा, हात पाय अगदी सोलवटल्यासारखे दिसत होते. गरम-गरम पाण्याच्या वाफांबरोबर बाथरूममधून सुगंधी घमघमाटही येत होता.

'काय झालं कृष्णा? आज इतका वेळ आंघोळ? आणि असं सोलवटल्यासारखं का दिसतंय तोंड तुझं?' बाबांचा आवाज ऐकून आईपण बाहेर आली.

'हो, हात-पाय पण सोलवटल्यासारखे दिसतायत.' आईच्या लक्षात आलं.

'मी ना आज खूप घासून-घासून आंघोळ केली.' कृष्णा हळूच म्हणाली.

'कशाने घासलंस अंग? अगं बोलना. कशाने घासलंस?' आई आपली विचारतेच.

'मी ना, ती ना, बादली घासायची घासणी आहे ना, तिने-'

'बाप रे, बादली घासायच्या घासणीने अंग घासलंस? अगं पण का? काही चिकटलं होतं का अंगाला? कृष्णा अगं बोल ना!'

'आई, आई मी ना हा रंग घालवत होते घासून घासून. पण ना आई, किती घासलं तरी हा रंग जातच नाहीये मुळी.' बोलता बोलता कृष्णा रडायला लागली. मग आईने हाताला धरून तिला सोफ्यावर आणून बसवलं. तिच्या बाजूला आई बसली. तिच्या डोक्यावरून हात फिरवत आई म्हणाली, 'सांग बघू नीट काय ते. रंग कुठला घालवत होतीस? काय झालं?'

'आई, माझं अंग किती काळं आहे ना! बघ, हात-पाय, तोंड किती काळं आहे ना आई? त्यामुळे ना आई, मला कध्धीच नाचात घेत नाहीत बाई. गोऱ्या गोऱ्या छान मुलींना निवडून घेतात. ती सोनल आहेना, तिला तर नेहमी सरस्वती, लक्ष्मी, परी, राजकन्या असंच काय काय बनवतात. काल पण मुलींना निवडण्यासाठी आल्या होत्या बाई. आम्हाला सर्वांना नाच शिकवला. आम्ही करायला लागल्यावर आमच्यातल्या चांगल्या चांगल्या मुलींना निवडून निवडून घेतलं. मी ना खूप छान नाचत होते आई, मला आमच्या पी.टी. च्या बाईंनी निवडलंही होतं आई. पण नाचाच्या बाई म्हणाल्या 'ही नको.' असं का म्हणाल्या असतील त्या आई? मी इतकं छान नाचूनही असं का म्हणाल्या असतील त्या आई?' बोलता बोलता कृष्णा पुन्हा रडायला लागली.

तेवढ्यात बाबा म्हणाले, 'हे बघ कृष्णा, नाचात नाही घेतलं तर नाही घेतलं, नाटकात घेतील. रडायचं कशाला?' 'हो बाबा, नाटकात घेतलंच आहे मला. पण कोण म्हणून माहितीय? राक्षसीण म्हणून. माझी मैत्रीण रुपाली आहे ना, तिला त्याच नाटकात देवी बनवलंय. मला ना नेहमीच भिल्लीण, मोलकरीण, झाडूवाली, राक्षसीण असलीच कामं देतात बाई. हा हा काळा रंग आहे ना माझा, मला परी व्हायचंय म्हणून म्हणून घासत होते मी अंग.'

'कृष्णा, अगं मी काळा आहे ना? पण माझं कधी अडलं का कुठे? किती गोरेपान लोक माझ्या हाताखाली काम करतायत. हा बघ, साबण लावलाय ना दाढी करायसाठी? पण हा बघ रेझर फिरवला की आतला गालाचा रंग काळाच आहे ना? म्हणून काय असाच साबण लावून ऑफिसला जाऊ शकतो का मी? गाल गोरे दिसावेत म्हणून? अंग घासून गोरं होता आलं

असतं तर अजूनपर्यंत काळा राहिलो असतो का मी? केव्हाच झालो असतो गोरापान.'

'कृष्णा, अग अशी घासून घासून कातडी खरखरीत होईल ना तुझी. शिवाय साबण लावून-लावून फोड-बीड येतील अंगावर. आपली त्वचा खूप नाजूक असते कृष्णा. तिची काळजी घ्यायला हवी. ' आईनेही समजावलं.

'ह्या काळ्या त्वचेची कसली काळजी घ्यायची आहे? मला तर रागच येतो या काळ्या रंगाचा. ह्या रंगामुळे कोणाला आवडत नाही मी.' कृष्णाचे डोळे पुन्हा भरून आले.

'कोणी सांगितले की तू कोणाला आवडत नाहीस म्हणून. मला आणि बाबांना आवडतेस. आजी-आजोबांना आवडतेस. काका-काकी, मामा-मामी, मावशी सर्वांना आवडतेस तू, शेजारच्या चिकूला तर त्याची कृष्णाताई खूप खूप आवडते. सारखा तुला हाका मारत असतो.'

'आणि कृष्णा, राक्षसीणचं काम करणं सोपं का आहे? उलट देवीचं काम सोपं, छान कपडे घालायचे, मुकुट घालायचा, उभं राहायचं. ते तर काय, कोणीही करेल. राक्षसिणीचं, मोलकरणीच, झाडूवालीचं काम करणंच खरं कठीण आहे. माझ्या लहानपणी राक्षस-बिक्षस म्हणूनपण घेतलं नाही मला नाटकात. म्हणजे तू माझ्यापेक्षा हुशारच आहेस की नाही?'

आईने मग कृष्णाचे डोळे पुसले. तिच्या तोंडाला, हाता-पायांना हळूवारपणे क्रीम लावलं, 'आता चल दूध प्यायला,' आईने कृष्णाला हाताला धरून स्वैपाकघरात टेबलापाशी बसवलं आणि तिच्या पुढ्यात दुधाचा पेला आणि बिस्किटं ठेवली. आवडत्या क्रीम बिस्किटांचा समाचार घेता घेता मग कृष्णाचे डोळे आपोआप सुकले.

पण गणवेश घालून केस विंचरायला कृष्णा आरशासमोर उभी राहिली आणि काळे विचार पुन्हा तिच्या मनात घर करायला लागले. हा पांढरा ब्लाऊज आपल्या अंगावर जरा जास्तच पांढरा वाटतोय. आणि हे केस! कपाळ कधी संपतं आणि केस कुठे सुरू होतात तेच कळत नाही. इतका कपाळाचा आणि केसांचा रंग एक आहेय. एरव्ही कृष्णाला आपले पांढरेशुभ्र दात खूप आवडतात. पण आज आरशात पाहताना तिच्या मनात आलं की काळ्या रंगामुळेच दात जास्त पांढरेशुभ्र वाटताहेत. मग घाई-घाई केसांवरून फणी फिरवून कृष्णा आरशापासून दूर झाली. उगीच काळ्या रंगाकडे पाहून पाहून वाईट वाईट विचार मनात यायला नकोत.

'काय कृष्णा आज केस नीट नाही विंचरलेस? आण बघू फणी.' आईच्या लक्षात आलंच. मग आईने स्वतः तिचे केस पुन्हा नीट विंचरले. ते पुन्हा विसकटू नयेत म्हणून दोन बाजूना दोन क्लीप्सही लावल्या.

'चला आता बूट घाला आणि पळा शाळेला' आई कधी कधी लाडाने आहो जाहो करते कृष्णाला. गंमत!

कृष्णानेही मग बूट घालून झाल्यावर पाठीवर दप्तर चढवलं आणि म्हणाली, 'आई-बाबा, निघतो आम्ही. येतो आम्ही शाळेला जाऊन.'

पण शाळेत नाटकाच्या तालमीच्या वेळी तिला पुन्हा रडू यायला लागलं. देवीचे कपडे-दागिने, परीचा सुंदर झगा, मुकुट हे सगळं पाहिल्यावर! राक्षसिणीचे कपडे अगदी घाणेरडे होते. डोक्याला बांधायला शिंगे होती. गळ्यात, कानात जाडे जाडे घाणेरडे दागिने.

'दात पण खोटे चिकटावयाचे का राक्षसिणीला?' पी.टी. च्या बाईंनी विचारले,

'नाही चिकटवले तरी चालण्यासारखं आहे.' नाटक बसवणाऱ्या बाई म्हणाल्या.

'बरं झालं दात चिकटवत नाहीयेत ते.' कृष्णाच्या मनात विचार आला. 'त्यामुळे आणखीच भयंकर दिसायला होईल.'

पण मग लगेचच तिच्या मनात हाही विचार आला की दात न चिकटवताही आपण राक्षसिणीसारख्या दिसत असणार म्हणून नाटकाच्या बाई म्हणाल्या की, नाही चिकटवले तरी चालण्यासारखं आहे म्हणून. असलं घाणेरडं काम करण्यापेक्षा नाटकात घेतलंच नसतं तरी चाललं असतं आपल्याला. वर्गात बसलो असतो आरामात.

मग तिला आठवलं, मृगा सांगत होती, 'तुम्ही सगळी कार्यक्रमातील मुलं-मुली गेलात ना तालमीला की वर्गात कंटाळा येतो.'

अंकितही म्हणाला, 'हो आम्हाला कधीच घेत नाहीत कशात.'

कृष्णाच्या मनात इतका गोंधळ होता की, आपल्याला नाटकात घेतात म्हणून चांगलं म्हणायचं की, राक्षसिणीचं काम देतात म्हणून वाईट वाटून घ्यायचं. काय चांगलं आणि काय वाईट? हा काळाकुट्ट रंग मात्र वाईट वाईट्ट आहे. एकदम वाईट्ट.

शाळेच्या वार्षिक समारंभात सर्व कार्यक्रम

संपल्यावर राष्ट्रगीत म्हणायचं होतं. सर्व नाटकातली, नाचातली मुलं-मुली मंचावर एकत्र येऊन राष्ट्रगीत म्हणणार होती. त्यावेळी मात्र पी.टी.च्या बाईंनी कृष्णालाच माईकच्या पुढ्यात उभं केलं, 'तुझा आवाज गोड आहे. तू रहा माईकच्या पुढ्यात.' बाई म्हणाल्या.

कृष्णा इतकी सुखावली, इतकी सुखावली की आपल्या अंगावर अजूनही राक्षसिणीचाच वेश आहे आणि डोक्यावर शिंगंसुद्धा आहेत हेही विसरली. खड्या, गोड आवाजात राष्ट्रगीत म्हणताना आपल्या एका बाजूला सुंदर दिसणारी परी आणि दुसऱ्या बाजूला सुंदर दिसणारी राजकन्या आहेत याचाही विसर पडला तिला.

आई-बाबा कार्यक्रमाला आले होतेच. घरी जाताना बाबा म्हणाले, 'नाटक तर खूपच छान झालं कृष्णा. खूप छान काम केलंस तू.' कृष्णा खूश झाली. पण लगेच मनात आलाच. 'हं! राक्षसिण म्हणून छान शोभले असणार मी!'

तेवढ्यात आई म्हणाली, 'राष्ट्रगीत किती गोड गायलीस क्रिश!' आई खुश असली की 'क्रिश'च म्हणते तिला, यावेळी कृष्णाही खुश झाली. बाईंनी म्हणून तर माईकच्या पाठी उभं केलं असणार आपल्याला,' प्रथमच चांगला विचार मनात आला तिच्या.

वार्षिक संमेलन संपलं आणि वार्षिक परीक्षा जवळ आली. अभ्यासाच्या गडबडीत मग काही दिवस कृष्णाला जरा काळ्या रंगाचा विसरच पडला. कधी ती अभ्यास करत असताना खिडकीवर कावळा काव-काव करायला लागला की मात्र त्याला हाकलताना तिच्या मनात विचार येई, 'हा काळाकुट्ट आहे म्हणूनच हाकलतोय ना आपण याला? याच्या जागी एखादा हिरवागार पोपट किंवा रंगीबेरंगी मोर येऊन बसला असता, तर हाकललं असतं का आपण त्याला? की पाहत बसलो असते त्याच्याकडे अभ्यास-बिभ्यास बाजूला ठेवून?'

मग लगेचच तिच्या मनात विचार येई. मुळीच नाही, काळा म्हणून नव्हे तर कर्कश आवाजात काव-काव करतोय म्हणून हाकलतोय आपण याला. नाहीतर आपलं लक्ष तरी कशाला गेलं असतं खिडकीकडे?

परीक्षा संपल्या संपल्या बाबांनी कृष्णाचं नाव कोपऱ्यावरच्या वाचनालयात घातलं. रोज बदलून नवं पुस्तक आणायचं आणि दिवसभर ते वाचून संपवायचं. वाचता-वाचता संध्याकाळी अंगणात खेळायला जायची आठवणही व्हायची नाही कधी-कधी.

मग आई बाबांना म्हणाली, 'दिवसभर वाचून-वाचून पुस्तकी किडा होणार आहे ही मुलगी. जरा कुठे बाहेर पडायला बघत नाही.'

'थांब, तिला नाचाच्या क्लासलाच घालू या.' बाबांनी तोडगा सुचवला. पण कृष्णाला नाचाच्या क्लासला जायचंच नव्हतं मुळी. काय उपयोग? नाचाच्या बाई कार्यक्रमात थोड्याच घेणारैत आपल्याला? त्यापेक्षा गाणंच शिकावं. राष्ट्रगीत गायला तरी बोलावतील आपल्याला आणि नाहीच बोलावलं स्टेजवर तर आतल्या बाजूला उभं राहून तरी गाता येईल.'

'मला गाण्याच्या क्लासला घाला बाबा.' कृष्णा म्हणाली. आई-बाबांना पटलं. पहिल्या दिवशी क्लासमध्ये नाव घालायला बाबा आले होते बरोबर. क्लासमध्ये नाव नोंदवून परत येत असताना 'कुहू-कुहू' साद आली म्हणून कृष्णाने वर पाहिलं, तर फूटपाथच्या कडेला उभ्या असलेल्या आंब्याच्या वृक्षातून आवाज येत होता. कृष्णा थांबली म्हणून बाबादेखील थांबले. त्याबरोबर आवाजदेखील थांबला. दोघं उभी होती तोपर्यंत आवाज येईना. वाट पाहून दोघं पुन्हा चालायला लागली, तर पुन्हा आवाज आला, 'कुहू-कुहू'. पुन्हा कृष्णा थांबली. 'किती गोड आवाज आहे बाबा.'

'कोकिळ आहे तो कृष्णा. आंब्याला मोहोर आला की त्या वासानेच तो येतो.'

'कुठेय पण तो बाबा? दिसत कसा नाही?' कृष्णा आपली शोधतेय.

'कोकिळ ना रंगाने काळा असतो म्हणून तो आपल्याला सहजा-सहजी दिसत नाही. पानांमध्ये लपला जातो तो.'

'बाबा, त्याला ना त्याच्या काळ्या रंगाची लाज वाटत असणार. म्हणूनच बाबा, लपून बसत असणार तो.' कृष्णाचं मन बोललंच.

'त्यात लाज वाटण्यासारखं काय आहे बाळा? कावळा किती काळा असतो. पण बसतो की नाही खिडकीवर येऊन काव-काव करत. त्याचा तर आवाज पण गोड नसतो कोकिळ पक्ष्यासारखा.'

'होय नै बाबा? कावळ्याला तर जास्तच लाज वाटायला पाहिजे. रंगाची आणि आवाजाची.'

'कृष्णा, अगं रंग, आवाज, रूप हे सगळं जन्मल्यापासूनच आपल्याबरोबर असतं. त्यात आपली काहीच चूक नसते. चोरी-मारामारी करणं, खोटं बोलणं, वाईट वागणं, फसवणं, दुसऱ्याला दु:ख देणं हे सगळं जन्मल्यापासूनच नसतं. लाज त्यांची वाटावी. मुळात लाज वाटावी असं वागूच नये आपण.' बाबांच बोलणे ऐकत कृष्णा मान हलवत होती.

'कावळा उष्टं-खरकटं, उकिरड्यावरची घाण खातो. त्यामुळे आसपासची घाण कमी होते. कोकिळ गोड गातो. आपल्या कानांना सुख देतो. मग त्यांनी त्यांच्या काळ्या रंगाची लाज का बरं बाळगावी?'

बाबांचं बोलणं ऐकत होती, तरी कृष्णाचं सगळं लक्ष आंब्याच्या झाडाकडेच होतं. तेवढ्यात पानांची सळसळ झाली आणि कोकिळपक्षी एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडाला.

'आई, मी आज कोकिळ पाहिला. गोऽऽऽड गातो ग आई कोकिळ. 'कुहू-कुहू' कृष्णाने आईला कोकिळ गातो तसा आवाज काढून दाखवला.

'पण ना आई, बाबांना नाही कोकिळ पाहायला मिळाला. कारण ना आई, इतका गोड गातो, पण ना आई, अगदी काळा-कुट्ट असतो कोकिळ.'

'सगळे गुण सगळ्यांमध्ये नसतात कृष्णा. मोर इतका सुंदर दिसतो. पण कधी गातांना ऐकलंयस का मोराला? तुझ्या नाटकातली परी आणि राजकन्या त्यांना येतं का गायला?'

'म्हणून तर माईकच्या पुढ्यात मला उभं केलं असणार बाईनी' कृष्णा हळूच म्हणाली.

आता कृष्णाला छंदच जडलाय. गाण्याच्या वर्गातून परत येताना आंब्याच्या झाडाखाली उभं राहायचं आणि कोकिळला शोधून काढायचं. जाता येता त्याचं 'कुहू-कुहू'; गाणं ऐकायचं. गाण्याच्या वर्गात बाई आणि वाटेत कोकिळ असे दोन दोन गाण्यांचे शिक्षक मिळाल्यावर मग छान गाणं शिकायला आणि गायला कितीसा वेळ लागणार.

आपला आवाज तरी गोड आहे. पी.टी.च्या बाईच म्हणतात. आपला आवाजही जर कावळ्याच्या आवाजासारखा कर्कश्श असता तर काय केलं असतं आपण? कावळा तर बिचारा दिसतोही काळा आणि आवाजही कर्कश्श!

कृष्णाने ठरवलं, खूप मन लावून गाणं शिकायचं. अगदी कोकिळ गातो तसं गोड गायचा प्रयत्न करायचा. कृष्णा रोज गाण्याच्या वर्गात मन लावून गाणं शिकते. गाण्याच्या वर्गाहून परत येताना 'कुहू-कुहू' ऐकलं की कृष्णा आंब्याच्या झाडाखाली उभी राहून तसाच गोड-गोड आवाज काढायचा प्रयत्न करते. 'कुहू-कुहू'

हल्ली कोकिळ लाजून पानात लपत नाही. हळूच पानांतून डोकातून पाहतो. 'कोण बुवा ही आपल्या सारखीच गोड-गोड गातेय?' 'कुहू-कुहू' 'कुहू-कुहू'

*

## कोण महान

**-यशोदिनी य. राणे**

कुहू कुहू करीत कोकीळ गाई गाणे
साऱ्या जगताला सांगे, वसंताचे आगमन झाले।
झाडे, वेली बहरा आली,
सारी सृष्टी आनंदीत झाली
बुलबुल मारी शिट्टी
म्हणे मैत्रिणीला करु या आपण गट्टी
स्वत:भोवती घेऊन गिरकी
कबुतर करी घुटर्गू
खारुताई ही त्यास साथ पाहे देऊ
चिऊताई म्हणते, कावळेदादाला ही सारी मंडळी
आहेत महान
आपल्याकडे नाही कुणाचेच ध्यान
असे का बरे म्हणतेस चिऊताई?
बाळाची आई आपल्याला लावते लाडीगोडी
आपण बनतो बाळाचे सवंगडी
या साऱ्यांची बाहेरच गर्दी
पण मी मात्र साऱ्यांच्या घरी जाऊन
पाहुणा येणार असल्याची देतो वर्दी।
आपण कधी समजू नये आपल्याला लहान
आपण आहोत आपल्यापरीने महान
पक्ष-तिथीला सारे देती मलाच मान।।

*

# निसर्गाची किमया

## (कास पठार)

★ सौ. सुरुची अनिल प्रधान ★

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा ।।

या कवी वसंत बापट यांच्या कवितेतच्या ओळींची प्रचिती साताऱ्याजवळच्या सह्याद्रीच्या डोंगररांगा-वरील 'कास पठार' पाहिल्यावर आली.

सकाळची वेळ. स्वच्छ, निरभ्र आकाश. या मोकळ्या आकाशाखाली पसरलेले कास पठार. बसमधून उतरल्यावर असे वाटले की, जणू काही सर्वकडे अनेक रंगांचे गालिचे अंथरलेले आहेत.

Carvey ची टोपलीच्या आकाराची रोपटी पाहून वाटलं, की जणू काही हिरव्या रंगांच्या टोपल्याच उपड्या घातलेल्या आहेत. या झाडांना ८ वर्षांनी फुले येतात असे सांगितले जाते. २००८ साली या झाडांना फुले आली होती. म्हणजे पुन्हा २०१६ साली फुले येणार. पण आम्हाला मात्र काही झाडांवर फुललेली पांढऱ्या रंगाची फुले पाहावयास मिळाली.

छोट्या, छोट्या निळ्या फुलांची रोपटी पाहिली. याला 'सोनेची अश्रु' म्हणतात. Vlouria हे कीटक भक्षक छोटे रोपटे पहावयास मिळाले. याच्या मुळांवर छोटे छोटे गोळे (Bladder) होते. `Droser' नावाचे आणखी एक कीटक खाणारे रोपटे पाहिले. इथल्या जमिनीत नायट्रोजनचे प्रमाण कमी असल्यामुळे ही रोपटी कीटकांपासून तो मिळवितात. या रोपट्यांची उंची फार तर २ किंवा ३ इंच एवढीच असते. पागोट्याच्या आकाराची पांढऱ्या रंगाच्या फुलांची रोपटी (areoculon), पिवळ्या रंगाची 'सोनकी' (Sankio), शिवाय किरमिजी व जांभळ्या रंगांची तेरड्याची रोपटी. ती सुद्धा अगणित. जिथपर्यंत नजर पोहोचत होती तिथपर्यंत फुलेच फुले दिसत होती. या सर्व रोपांची उंची जमिनीपासून २ ते ४ इंचापर्यंत होती. त्यामुळे पायाखाली फुले न येण्याची खबरदारी घ्यावी लागते.

त्याचप्रमाणे पाण्याच्या छोट्या प्रवाहातील शेवाळ (Moss), बुरशी (algae), शिवाय ओल्या फांद्यांवर व पाण्यातल्या दगडावर आलेले (Lichen) दगडफूल, पूर्णपणे किंवा अंशतः मोठ्या झाडांवर अन्नासाठी अवलंबून असणारी बांडगुळे, Partial, Parasties, Total parasites पाहिली. अशी एक ना अनेक छोटी रोपटी पहावयास मिळाली. काही फुले तर इतकी छोटी होती की, ती काचेच्या भिंगातून पहावी लागत होती. पठाराच्या कडेला अर्जुन वृक्ष होते.

कास पठाराशिवाय आम्ही ठोसेघरचा धबधबा व चाळकेवाडीच्या पवनचक्क्या पाहिल्या.

डोंगररांगांच्या दुसऱ्या पठारावर ३००, ४०० पवनचक्क्या आहेत. त्यांच्या पायथ्याशीसुद्धा असंख्य फुले गालिच्यासारखीच फुललेली होती. तिथून परतताना पाय निघत नव्हता.

ठोसेघरच्या धबधब्यासाठी १००, १५० पायऱ्या उतरून खाली जावे लागते. उतरताना मजा वाटत होती. पण तेवढ्याच पायऱ्या परत चढायच्या याविचाराने काही जण उतरू की नको या विचारात होते. पण खाली उतरल्यावर महाबळेश्वर येथील आर्थर सीट पाईंटप्रमाणे येथे कठडा बांधलेला आहे. समोरच्या डोंगरावरून खळाळत येणारे ३, ४ मोठे धबधबे पाहिल्यावर सगळा शीण दूर झाला.

काळ्या कातळावर उगवलेली असंख्य रंगांची फुले, डोंगरावरून उड्या मारणारे प्रपात पाहून या निसर्गाच्या किमयेला माझे त्रिवार वंदन!

*

प्रवास वर्णन

# आगळे वेगळे तन्रिफ

**★ कल्पना सुभाष कोठारे ★**

दुसरीच्या वर्गात भूगोल, इतिहास शिकत असताना एक व्याख्या घोकलेली आठवते. ‘चारी बाजुंनी पाणी आणि मध्ये जमीन याला बेट असे म्हणतात.’ या व्याख्येबरोबरच नागपूरच्या शुक्रवार तलावातील बेटाचे बालस्वरूप मनात ठाण मांडून बसले होते. पोर्तुगिजांनी आंदण दिलेल्या मुंबई बेटाशी पुढे गाठ पडली. परंतु जोडलेल्या रस्त्यांमुळे हे शहर तर स्वत:चे बेटपण हरवूनच बसले होते, खऱ्याखुऱ्या बेटाशी गाठ पडली ती मी वयाने आजी झाल्यावर. स्वत:चे वय विसरून निळ्याशार पाण्याशी संवाद साधीत ‘नाना ऽऽ नानाऽऽ! अशा लाटांसारख्या अवरित हाका झेलीत नातवंडांबरोबर मी खऱ्याखुऱ्या बेटावर मनसोक्त हुंदडून घेतले. या बेटाचे नाव ‘तन्रिफ’! अनेक भारतीयांना नागरिक म्हणून सामावून घेणारे तन्रिफ इकडे कित्येकांना ठाऊकच नसणे, हे त्याच्या वेगळेपणात भरच टाकते.

युरोप खंडाच्या नैऋत्येस व आफ्रिकेच्या उत्तरेस अटलांटिक महासागरात, कॅनरी आयलंडस् म्हणून ओळखली जाणारी सात बेटे आहेत. त्यापैकी एक तन्रिफ हे बेट उत्तर व दक्षिण अशा दोन भागात विभागले गेले आहे. राजकीयदृष्ट्या स्पेन या देशात ही बेटे येतात. स्पेनची राजधानी ‘मॅड्रिड’ ही सर्व जगाशी आंतरराष्ट्रीय विमानसेवांनी जोडलेली आहे. आपल्या इंडियन एअरलाईनप्रमाणे आयबेरियाची छोटी विमाने आपल्याला मॅड्रिडहून दोन तासात तन्रिफ नॉर्थ किंवा तन्रिफ सूरला (साऊथ) आणून सोडतात. आमचा मुक्काम तन्रिफ सूर इथे होता.

पहिल्याच दिवशी संध्याकाळी पायी थोडेसे फिरण्यास बाहेर पडलो. संध्याकाळ म्हणजे रात्रीचे नऊ वाजले होते घड्याळात. परंतु मावळतीवर दूर क्षितिजावर चक्क केशरी सूर्याचा गोळा होता. सूर्यास्ताची वेळ वेगळी असली तरी सूर्योदय मात्र आपल्या प्रमाणेच झाला. जाग आली ती समुद्राच्या गाजेनेच. रात्री समुद्रदर्शन झाले नव्हते ते मॉर्निंग वॉकच्या वेळी म्हणजे १० वाजता झालेच.

आपल्याकडे मुंबईत खार व वांद्रा इथे समुद्रकिनाऱ्यालगत पॅरोमनेड आहे. इथे मागूनपुढून येणाऱ्या ट्रॅफिकच्या भीती न बाळगता माणूस चालू शकतो. तन्रिफचा पॅरोमनेड-समुद्रालगतच्या पदपथ हा सलग असून मध्येच चढउतारासाठी पायऱ्या आहेत. जुहू ते चर्नीरोड चौपाटी (अंदाजे) इतका सलग, स्वच्छ, गुलाबी पदपथ कल्पनेत आणल्यास तन्रिफचे वेगळेपण जाणवेल. या पदपथावरून बाहेर येऊन तुम्ही तुमच्या वाहनात बसू शकता किंवा मुलांबरोबर ट्रॉली बसमध्ये बसून बेटाची फेरी करून येऊ शकता. पदपथावरून समुद्रकिनाऱ्यावर उतरून वाळूची मजा चाखू शकता. तेथील बेंचवर नुसते टेकलात तरी कंडक्टरसारखा माणूस येऊन तुमच्याकडून तिकिटाचे पैसे वसूल करतो. वाळूचा किनारा व पदपथ यामधील कट्ट्यावर बसल्यास मात्र तिकीट पडत नाही.

येथील वाळूही राखाडी रंगाची असते. ही मानवनिर्मित आहे. आपल्या गोव्याप्रमाणे येथील समुद्रकिनारे नैसर्गिक नाहीत. कारण मूळ बेट हेच ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे तयार झालेले आहे. तैदे नावाचे ज्वालामुखी पर्वताचे शिखर या बेटावर आहे. म्हणजे येथे येणारा टूरिस्ट हा प्राणी एकाच वेळी पर्वतारोहण, ट्रेकिंग व समुद्रावरील वॉटर स्पोर्टसचा आनंद लुटू शकतो. समुद्रस्नानाबरोबर सूर्यस्नान प्रवाशात लोकप्रिय आहे. आम्ही मात्र बंदिस्त तरणतलावातील पोहणेच पसंत केले. आता

भारतातही वॉटर पार्कस् झालेले आहेत. आम्ही तन्‌रिफ येथे वेगवेगळ्या वेगाच्या घसरंगुडीवरून घसरत जाऊन पाण्यात पडून पोहण्याचा आनंद प्रथमच घेतला होता.

डोंगर, समुद्र आहे. परंतु या बेटावर एकही नदी नाही. आहे नं हे तन्‌रिफचं आगळेपण? 'नो रेन इन स्पेन' ही म्हण इथे लागू पडते. उत्तर तन्‌रिफ पावसाशिवायच असते. पाऊस नाही मग झाडे कशी असणार? नैसर्गिक नसली तरी मानवनिर्मित झाडे आहेत. खजुरी, शिंदी यासारखी झाडे एका रात्रीत आणून हॉटेल इंडस्ट्रीने लावली आहेत. गोल्फची मैदाने ही मुद्दाम राखलेली काही भागात आहेत. रस्त्यांच्या मधोमध डिव्हायडरवर चक्क रंगीबेरंगी जास्वंद लावलेली दिसली. वडपिंपळ आजोबांचे इथे वास्तव्य नसले तरी प्रत्येक घराच्या कुंपणाआडून बोगनवेल, कण्हेर, बिट्टी यासारख्या ओळखीच्या आज्या हसताना दिसत. विंडोबॉक्सेसमधून मोहन बिगुनिया कार्नेशन्, पिट्युनिया, फ्लॉक्स आदि फुलांचे रंग डोळ्यांना सुखवीत. षोडशा तन्‌रिफसूर युवती, मोरपिशी रंगाच्या समुद्री साडीचे वस्त्र पायाशी उतरवून जणू स्वच्छ गुलाबी पदपथांचे पैंजण लेवून शेंदरी, पांढरे, जांभळे, पिवळे, खडेच जणू जास्वंद फुलांच्या रुपात बसविलेले होते. इथे फुले चोरणारी पेन्शनर मंडळी बहुधा नसावीत. मात्र नातवंडे फिरवून परतताना एका ठिकाणी हमखास थांबून सायलीचे सुवासिक गुच्छ तोडीत घरी गेल्यावर ममाच्या हाती ती सुवासिक भेट ठेवताना चिमुकल्या चेहऱ्यांवरचे भाव आम्हाला मनोरम भासत. गंमत म्हणजे एकदा त्यांची ममा आमच्याबरोबर आलेली असताना तिनेही त्याच जागी थांबून 'घे आई, तुझ्या मुंडावळ्यांचा वास!' म्हणत मला सायलीचा गुच्छ बहाल केला.

मात्र मुलांना मुलांच्या या ममाने म्हणजे आमच्या मुलीने, चॉकलेट, वेफर्सची वेष्टने कचरापेटीत टाकण्याची चांगली सवय लावलेली दिसली. जागोजागी कचरापेट्या असतच. रस्ते व पदपथांप्रमाणेच वाळूचे किनारेही स्वच्छ राखले जातात. संध्याकाळी साडेसहानंतर सर्व किनारे बंद करून सफाईस सुरवात होई. मशीनने रस्ते, पदपथांची धुलाई होई. वाळूचे किनारेही झाडून सपाट व स्वच्छ केले जात. क्वचित आडरस्त्यावर सिगेरटच्या थोटकांचा कचरा आढळे. नाही असे नाही. पुतळ्याप्रमाणे तासन् तास सोंगे घेऊन उभे राहणारे भिकारी असत. वाळूवर चित्रे काढून पैसे मिळविणारे होते व फुटकळ विक्री करणारे आफ्रिकनही होते. मात्र कुणीही अंगाला हात लावून भीक मागताना भेटले नाही. फुटपाथवर गिटार वगैरे वाद्ये वाजवून पोट भरणारे लोकही होते. हे छोटेसे नादप्रदुषण सोडल्यास इतर वाहनांचे भोंगे कधीच वाजत नसत. मुलीने व जावयाने आम्हाला बेचाळीस दिवसात अनेक प्रेक्षणीय स्थळे दाखविली. परंतु त्यांच्या गाडीचा हॉर्न फक्त एकदाच ऐकला.

एकदा मुलीने वाण्याकडे जाण्यासाठी गाडी काढली. हा एक वेगळाच निसर्गप्रवास घडला. हायवे स्वच्छ असला तरी इतर देशांप्रमाणे सरळ नव्हता. सतत उंच सखल भागातून जीप धावत होती. बोडक्या, खडकाळ, टेकड्यांमधून धावणारा हायवे मधेच खाली उतरे, चौरस्त्यावर सिग्नल्सचे अलंकार दिसत. चौरस्ता मजेदारच असे. एखाद्या टेकडीस वळसा घालून यू टर्न घेऊन जीप परत हमरस्त्यावर येई. रुक्ष, वृक्षहीन टेकड्या एका बाजूस तर दुसऱ्या बाजूस दूरवर सतत बरोबर येणारी अटलिंकाची रिबीन! मोरपिशी, निळा व राखाडी, पांढऱ्या फेसाची झालर, अशा त्या सुंदर रिबीनीकडे परत परत दृष्टी जाई. जवळजवळ तासभर असा एकला प्रवास संपवून सुळकन आमची जीप एका शॉपिंग सेंटरमध्ये माणसात शिरली.

असाच परंतु अनेक मैलांचा प्रवास करून एकदा तैदे या ज्वालामुखीला प्रत्यक्ष भेट दिली. आकाशीचा चंद्र अधूनमधून दिसावा तसे बेटावरील हे पर्वतशिखर अधूनमधून दुरून दिसे. त्याच्या पायथ्याशी गाडी पोचताच अंगावर रोमांच उठले. तन्‌रिफ सूरची खडकाळ रुक्ष भूमी मागे टाकून हिरवी रांगोळी ल्यालेल्या पर्वताजवळ आम्ही आलो होतो. रस्त्यात कुठेही ट्रॅफिक न लागूनही या रम्य स्थळी मात्र अनेक प्रवाशी वेगवेगळ्या दिशेने आले होते. मोटारी शिस्तीत पार्क केलेल्या होत्या. पोटपूजा आटोपताच आम्ही तिकीटे काढून रांग धरली. 'विरळ हवेमुळे त्रास होऊ शकतो.' अशा पाट्या लावलेल्या होत्या. ज्वालामुखीच्या जवळ पोचण्यास दोन केबलकोर्स ये जा करीत होत्या. दोन दोऱ्यांवर दोन मणी विरुद्ध दिशेने येजा करावेत तसे दुरून दृश्य दिसले तरी प्रत्यक्ष एक केबिन एकावेळी ३०

एक प्रवाशांना सामावून घेत होती. शिस्तबद्ध पद्धतीने तिकीटे तपासल्यानंतरच केबलकारमध्ये प्रवेश मिळे. काचेतून बाहेरील खडकाळ भाग निळे आकाश दिसत होते. प्रत्येकाने आपापल्या पिशव्यातून हातमोजे, कानटोप्या काढून चढवले होते. समुद्रसपाटीतून जवळजवळ दोन हजार फूट उंचीवर आमची केबलकार असावी. केबलकारमधून उतरल्यावर सर्वजणांना कंपल्सरी ट्रेकिंग करावे लागले. हाशहुश करीत दगडगोट्यातून वाट काढीत, अखेर लहानथोरांनी शिखर गाठले. वाटेत एके ठिकाणी गुहेसारख्या भागात चक्क बर्फ- हिम आढळला. मुलांनी थोडावेळ हाती धरला. मात्र पर्यावरणाचा तोल सांभाळण्याची शिकवण असल्याने साधी गारगोटीही उचलून घेऊन घरी नेण्यास आमची नातवंडे तयार नसत. दमछाक करीत गाठलेले तैदे शिखर, एखाद्या इमारतीस कंपाऊंड असावे तसे बंदिस्त होते. कारण त्या शिखरातून गरम वाफा येत होत्या. सल्फरचा वास आपल्या चेंबूरची आठवण करून देत होता. थोडावेळ विश्रांती घेऊन आम्ही परत उतरते ट्रेकिंग करीत परतीची केबलकार गाठली.

तैदे ज्वालामुखीजवळच एका पठारासारख्या भागात नंतर आम्ही कारने गेलो. हा परिसर लाव्हारस थंड होऊन झालेला होता. जणु चहाचा समुद्रच वाटत होता. आपण एखाद्या परग्रहावर तर आलो नाही? असे वाटून गेले. एखाद्या गडाच्या पायऱ्या असाव्या तशा रुंद चहाच्या रंगाच्या नैसर्गिक पायऱ्या एके ठिकाणी होत्या. ही जमीन चालायला भुसभुशीत होती. बाजूला उंचच उंच चर्चच्या टॉवरप्रमाणे दिसणारे निमुळते खडक होते त्याला 'कॅथेड्रेल' असेच नाव होते. तांबट, सोनेरी, पिवळ्या अद्भुत रंगांचे मनमोहक मिनार! तन्‌रिफमध्ये फक्त बटाटे व केळी पिकतात. बाकी सर्व माल आयात केला जातो. टिन्ड भेंडी, टिन्ड पातवड मिळतात. 'अगं लवकर जा. मेथी आलीयं बाजारात. संपेल!' असे एकदा आमची मुलगी मैत्रिणीला फोनवर सांगताना ऐकले व हसावे की रडावे तेच कळेना! पिण्याचे पाणी इथे विकतच घ्यावे लागते कारण नळाचे पाणी खारट असते. आपल्याकडे राखीव गॅस सिलिंडर्स जशी स्वयंपाक घरातील जागा अडवतात. तसे इथे पाण्याच्या मोठ्या बाटल्या.

'कॅक्टर्स पार्क' नावाचे एक प्रेक्षणीय स्थळ पाहिले. तऱ्हतऱ्हेच्या निवडुंगाच्या जाती इथे होत्या. एकदा एका पार्कमध्ये मोर, बदके आणि इतर पक्षी मजेत फिरताना दिसले. पिंजऱ्याशिवाय हे न उडता कसे बरे फिरताहेत? असा प्रश्न पडला. वरती पाहिले तर काय! पूर्ण नेटने आच्छादित होता. पुढे केळीच्या बागांवरही असेच आच्छादन दिसले. नेटने पूर्ण आच्छादिलेल्या टेकड्याही होत्या.

आपल्याला निसर्ग ताटात वाढून देण्याचे काम प्राणीसंग्रहालये करतात. लोरो पार्क हे असेच प्रेक्षणीय स्थळ होते. हिरव्यागार झाडांच्या सावलीतून अगणित रंगाचे पोपट निरखीत आम्ही इथे एक संपूर्ण दिवस हिंडलो. इराणीत तूती, हिंदीत तोता, मराठीत पोपट व स्पॅनिशमध्ये लोरो: आफ्रिकेतून आणलेल्या अनेक पोपटाच्या जाती इथे जोपासलेल्या आहेत. गुलाबी, पिवळा, राखी, निळा, लाल व मिश्र रंगांचे आणि नक्षीदार पोपट पाहून जीव थक्क झाला. सांताक्रूझच्या घरातून रोज संध्याकाळी तारेवर हिरवी पोपटांची शाळा भरलेली मी पाहतेय. परंतु लोरो पार्कच्या पोपटांनी रंगपेटीतून प्रत्येक रंग नेसून दाखविलेली फॅशन परेड काही औरच! काचेआडील लॅबोरेटरीत बाळपोपटांना इंकफिलरने फीडिंग चालू होते; तीही एक अविस्मरणीय आठवण!

युरोप, अमेरिकेप्रमाणे गारठवणारी थंडी इथे कधीच नसते. पौर्वात्य देशातील भाजून टाकणारे ऊनही नसते. कधीच नसते. समशीतोष्ण हवामान लाभलेले तन्‌रिफ हे बेट जुलै-ऑगस्ट व नोव्हेंबर डिसेंबर या सुट्टीच्या दिवसात प्रवाशांना आकर्षून घेते. निसर्गसौंदर्याबरोबरच मानवनिर्मित अनेक मनोरंजन स्थळे प्रवाशांना खुणावीत असतात. मोठ्या कष्टाने नातवंडाने गळ्यातील हात दूर सारीत अखेर या सुंदर स्थळासही बाय बाय केले तेव्हा ओठ गात होते.

## गळती

झोपडीमध्ये पाऊस पाणी टपटप होतं गळत,
सखूबाईने त्यातच बादली लावली होती भरत,
रात्रभरात एकेकाने आंघोळ घेतली करून
उजाडायच्या आत कपडे सुकत पडले धुवून.

**-डॉ. सुमन नवलकर**

रुप पाहता दर्पणी
उभी धरा थबकून
असे अथांग निळेपण
नभे गेले वेडावून ।।१।।

उंच पहाट पांघरती
दुलईत मऊ ढग
धुक्या लाटांशी खेळत
नभ गेले वेडावून ।।२।।

नाही झालर वृक्षांची
सृष्टी बिकिनी लेवून
* दोन फुले वक्षावर
खाली अवघी चमचम
रुप पाहूनी आरसपानी
नभ गेले वेडावून ।।३।।
जशा चांदण्या फुलती
तशा डेझी आल्या फुलून
कण्हेर, जास्वंदी हासताती
सायली हसे पानाआडून
नभे गेले वेडावून ।।४।।

जशी पऱ्यांची लगबग
तशी मोटारींची सळसळ
माणसे ओतती गुलाबी रंग
पाहताना त्यांचे संग
नभ गेले वेडावून ।।५।।

जेथे जावे तेथे भेटे सागर
उतरावे दडदड चढताना पडझड
हाक येई कानी नानी नानी ऽऽ
पाय निघेना तेथून
मन नभ गेले वेडावून ।।६।।

* (दोन बेटे)

# हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



# Cat Among Pigeons

**- Aditi Simit Desai**

(Age - 7 years)

One day in my school, my teacher told us that everyone should go home after school quickly. Those children going by van should sit inside the van, those going alone should go quickly, and those who went with their parents should not leave their parents' hand. I was surprised and wondered why my teacher was making this announcement. Then my teacher said that a leopard was roaming in our complex. A leopard? In our complex? We were all surprised. And actually I did not really believe this.

That evening when the vans left the children and came back to school, in the evening, a leopard was seen resting under a van. My teacher told this to us the next day. That evening the leopard was captured in cctv cameras of a building next to ours. It was seen strolling across the compound of that building among parked cars. Now I had to believe that a leopard was really here in our complex. Everybody was talking about the leopard and this video. I saw it on my mother's phone. It was really scary. At one moment the leopard turned and looked right at the camera....it's eyes were shining in the dark. It was really scary.

There were many questions in my mind. How could a leopard come into our complex, with so many buildings, and people, and cars? Leopards are found in forests, aren't they? How did it hunt here? What did it eat? This leopard had come from the Borivali National Park. Why? Was it not happy there? My mother explained to me that we had upset the balance of nature. We had built buildings and complexes and cut trees and forests to do so. Many people came from outside Mumbai to live here. So there were many more people and many more buildings, but less and less trees, and no forests. Where could the animals go? Even in the National Park there was no food for the wild animals, and so they were roaming among buildings and complexes searching for food.

Everybody was scared. Children were not allowed to play downstairs after dark. Our school installed new floodlights in our ground which were kept on throughout the night. Morning walkers started their walk only after 8 – 8.30 am. Nobody walked outside after dark. Everywhere everyone was only talking about the leopard.

The next morning a lot of blood was seen outside the main shopping center of our complex. The leopard had killed and eaten a stray dog. The forest officials studied the paw marks and said that this was a cub. But the one in the video was a full grown leopard....so there were two leopards! Later the forest officials informed us that there was a family of leopards in our complex and the surroundings. Everybody requested the officials to take quick action and traps were laid across our complex. And finally 2 cubs were caught. Later one more leopard was caught. But one leopard is still roaming freely in our complex.

Meanwhile, we all live in fear. One resident called the forest officials to inform them that he had spotted the leopard in his building. It turned out to be a cat! We all thought that was funny. But we are all scared. The roads are deserted not only after dark, but also during the day. The forest officials told us that the leopards come to the buildings to eat stray dogs, and the dogs keep growing in numbers because of garbage dumped in the open. Also, because we continuously encroach on their territory, they have no place to go. So even after this last leopard is caught, more will keep coming.

We learn in school about "Save the Earth", this is a real example of what happens when the balance of nature is disturbed.

✳

# Nature & We the People

-Tanisha Nitin Desai

## One touch of nature makes the whole world kin.

**William Shakespeare**

The first thing which any new born baby does is breathe. Breathe the air from the nature and next open the eyes to view it. The only force which can't be controlled by human being is the force of the nature. Nature is supreme. Nature is beautiful. Nature is life. Nature is a teacher.

Nature teaches us to help others, with all the good we can offer. Water, the basic requirement for any living creature on the planet earth can be produced in abundance only by the nature. The trees help in purifying the air. Trees which have been made 'Bonsai' and a source of decoration by the humans on earth and their place is taken by the large concrete walls of civilization and industrialization have damaged the balance in the nature. The day-by-day increase in the number of vehicles has made the air impure to a dangerous level.

Everybody loves to be at the beach and enjoy the waves, the water, the air. In Mumbai, along with the other parts of India the industrial waste / the hotel sever all contaminate the water all the time. No beaches in Mumbai today can be found today with fresh water.

Many of the people in the the metros are seen admiring the village for its greenery, beauty and freshness. Everybody feels rejoiced in the village than in the cities. All wish to retire and enjoy the rest of the life in the village, as the nature has not been disturbed at these places. Nowadays the concept of second home has been flourishing, thereby disturbing the nature where it's still green.

Every product today tries to be eco-friendly. But the man who makes these products is harming the nature the most.

We must learn to protect our mother nature. Cleanliness is forgotten after the Community Living subject in school ends. We, the people, have become too ignorant to care about the person following us. It has become the nature of the human beings. Just the opposite of what the nature teaches, the human nature does.

Although some good people try hard to save the nature from the dangerous effects arising from human civilization / progress, it can be successful when it becomes a completely collective effort and everybody tries to save the nature.

If everybody tries to keep all the places, wherever he visits, along with his house, clean, If recycling of all the products can be done with active participation by everybody, If the use of public transport can be maximum than the use of private vehicles, If nobody obstructs the nature (rivers, lakes, sea) for any purpose, then the mother nature can certainly be too happy, helping you to prosper more and live a fit and fresh life.

✳

# Nature

**By Suraj Nayak**

In this era of technological renaissance, how many of us take the time to appreciate the smell of wet mud on the first sign of monsoon, the multicolored vista during a sunset, the way drops of water roll off a lotus leaf, the melodious song of a bird at dawn? In essence how many of us truly take the time to observe nature and all its intricacies?

As a child, I remember doing all of these things and more. It is as we become older that most of us forget or ignore these experiences, deeming them pointless or something that “they don't have time for”. With the never ending rise in technology and social media such as Facebook and Smartphones, we will progressively find even less time for experiencing nature. These multimedias are created so that in our free time we don’t get bored, but aside from distracting us from our life goals they are also hindering our will to interact with nature the way our ancestors use to. As advanced as we would like to think of ourselves, we as human beings lack in one of the very core aspects of being human: humanity. Humanity stems from appreciating the minute details of life, through which we get a greater understanding of our surroundings.

All the current crises that we are facing in the world such as the recent Syria debacle is essentially because of a lack of humanity. Re-learning to appreciate nature in all its wonder, will do us more good than harm and as corny as it may sound, we have to realise that we are a part of nature; not apart from nature. It is very crucial for us to extend our compassion and to embrace all living creatures and the whole of nature in its raw and infinite beauty. Because through spending the time to understand nature we will learn more about ourselves.

So the next time you are feeling bored; close that laptop screen, shutdown the pc, turn off the TV and just head outdoors to the nearest park, beach, reserve, forest or anywhere that will get you close to nature. Once at your desired location just sit back, relax and soak in on all the awesomeness that is nature. You will be amazed at the many ways it will improve your life physically, mentally and spiritually. As the well-known philosopher and novelist, George Santayana said “The earth has music for those who listen”; so let your inner child surface.

# NONPAREIL

By

**DEEPASHRY KOTHARÉ**

" Were you breathing up there , Maa?"

" Was it dark ? "

"Did u visit the Sun n the Moon? "

"What about your Yoga n meditational exercises ? "

" What lingo did you speak and teach to the aliens ?"

And a multitude more . I was victoriously fielding their questions , bathing in a heavenly volley of unending questions.

Their joy saw a mountainous high to welcome back on Mother Earth - a lady with the longest solo flight to the Space Station who dwelled in an unknown space and time . I was very much missed at home, work and by friends.

"Absence makes the heart grow fonder , eh?"

Having created a rocking n unequalled record on the face of the Earth , I was fortunate to garner a mammoth fanfare locally, nationally and internationally.I became a Space Station Super Star , fans spread across the seven seas. Folks trying to communicate with me- in person or on telephone.

Sabash ! Kudos! Bien fait ! Bien cocido ! Molodstom ! Bem feito ! Gut gemacht !

In my honour , a royal reception to felicitate my courageous and unsurpassed feat was arranged.. The air was rent with the noteworthy tubaic melody . I was later given to understand by one of the tubaists that tubas are only played at extraordinary achievements of the highest order . In tears I counted the blessings , well- wishes and the love of my parents , family , friends and students . The entire humanity inundated me with a thunderous applause of claps, whistles n cheers.

What a lavish splash of champagne , the most savoury Asian delicacies pregnant with aromatic spices, the richest European desserts, colourfully dressed herrings a multi- tiered gâteau in the shape of a Space Station representing the national flags of the world. Undoubtedly , it was the longest feminine séjour at the Space Station to go into the pages of World History …

Phones kept ringing - myriad fans thronged the phone booths with an undying desire to wish 'Bravo ' to the dynamic woman who had engraved her unprecedented feat in every heart and on every mind.

A phenomenal standing ovation ! I was hugely honoured and humbled to share the stage with the Queen of England who shook hands warmly and offered the MOST PRESTIGIOUS MEDAL ever awarded proclaiming " You are our pride ."

Amidst deafening tuba music and paparazzi and tears of joy and humility streaming down my face I shouted Dhanyavad ! Thank you ! Merci !Gracias ! Danke ! Obrigada !

" Why are you weeping ?

"Why are you profusely thanking an invisible audience at 3 in the morning?

Go back to sleep , you have a long day ahead !"sleepily muttered my dear husband .

OMG ….. IT WAS A HEAVENLY DREAM!

Dear readers, dream big , bigger things happen !

Dare to be NONPAREIL – THE UNPARALLELED ONE!

लेख

# निसर्गावर बोलू काही

**★ शौनक कौशिक जयकर ★**

या वर्षी आपल्याकडे भरभरून पाऊस पडला. गेल्या वर्षपिक्षाही या वर्षी खूप पडला. अजूनही पडतो आहे. बाहेर बघा की. पावसाचे पडणे, धान्या करता चांगलेच असते. पण यावर्षी सगळंच जास्त होते आहे, असे वाटत नाही? गेल्या वर्षपिक्षा या वर्षी गरमी ही फारच होती. या वर्षी थंडी ही खूप असणार आहे. अगदी मुंबईत बर्फ पडेल इतकी नाही. पण तीन-चार गोधड्या घेऊन झोपण्यायेवढी तर नक्कीच. पण हे सगळं होते कशामुळे?

याचे कारण म्हणजे ग्लोबल वॉर्मिंग. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तोल कसेसे झाले आहेत. आपले हिमालय पर्वत आता वितळू लागले आहेत. ज्याच्यामुळे पृथ्वीवरच्या पाण्याची मात्रा आता वाढत चालली आहे. या सगळ्याला आपण जबाबदार आहोत. आता तुम्ही म्हणाल की, आम्ही तर काही केलेच नाही. मग आम्ही कसे जबाबदार झालो? बरोबर आहे. काही न केल्यामुळेच तुम्ही जबाबदार आहात. याचे कारण म्हणजे आपल्याला रोज एका नाक्यावरून दुसऱ्या नाक्यावर जायला गाडी लागते. ती पेट्रोलवर चालणारी. गाडी पेट्रोलही कमी करते व त्याच्या एक्झॉस्' मधून निघणारा धूर वातावरणाला प्रदूषितही करतो. आता मला तुम्हीच सांगा, साधं एका नाक्याररून दुसऱ्या नाक्यावर जायला चालत जायला काय अडचण होती? कुठचे वांद्र्याला जायचे नव्हतं चालत! असे जगातले ७५ टक्के लोकांनी केल्यावर किती प्रदूषण होईल. याचा तुम्हाला अंदाज आलाच असेल.

एखादी सोसायटी बांधताना तुम्ही त्याखालची झाडे तोडून टाकतात. कायद्याप्रमाणे तुम्ही नवीन झाडे लावता.पण कोणाच्या हे लक्षात येत नाही की तोडताना वृक्ष तोडले जातात पण मात्र लावताना एक छोटेसे रोप लावले जाते. वृक्ष आणि रोपाची काय तुलना? जेवढी कार्बन डायऑक्साईड खेचण्याची क्षमता एका वृक्षात असते त्याच्या कितीतरी पट कमी क्षमता एका रोपात असते. तर मग एक वृक्ष तोडल्यावर कमीत कमी खूप रोपं लावली पाहिजेत नाहीतर त्याच्या परिणाम भोगायला तयार रहावे.

निसर्गाला जपण्यासाठी वृक्षांचे मोठे योगदान आहे. वृक्ष आपले हात पसरवून पावसाला बोलावतो. तो वातावरणाला शुद्ध करतो. ज्याच्यामुळे आपण सुखाचा श्वास घेऊ शकतो. याच वृक्षाला आपण निदर्यपणे कापतो. कोणीतरी बरोबरच म्हटले आहे, 'आपण हे वृक्ष कापून प्राण्यांचे घर उद्धवस्त करतो'. मग ते राहणार कुठे? आपल्याच घरी येणार नं? म्हणून तर बिबट्या, वाघ व इतर प्राणी पवईच्या सोसायटीत दिसले होते. अशा वेळी आपण फार दचकतो. त्यांना दगड वगैरे मारतो, पण हे जाणण्याचा प्रयत्न करत नाही की ते कशाला आपल्याकडे आले आहेत? त्यांना काय स्वप्न पडले नव्हते आपल्यावर येऊन हल्ला करायला किंवा आपल्याला घाबरावयाला. ते आपणच असतो ज्याला जगातले सर्व काही हवे असते. आपल्याला झाडे कापून विविध प्रकारचे लाकडी सामानही हवे असते. शिवाय आपल्यावर प्राणीही हल्ला न करतील असेही हवे असते. हे दोन्ही होणे काही शक्य नाही.

निसर्ग जपण्याकरता लागतेच किती? जर प्रत्येक माणसाने निसर्गाला वाचण्याकरता पाऊल पुढे जरी टाकले, तरीही ते फार पुरेसे असते. पण आपण माणसांना सगळे घरबसल्या हवे असते. झाडाला पाणी जरी घालायला सांगितले, तर घरातल्या

लहानाला ते करायला सांगतात. झाडाला पाणी घालायलासुद्धा उठायला आळस केला जातो. अशावेळी कसे जगता येईल? याचा बारकाईने विचार केला तर आपल्याला कळेल की झाडाला सकाळी पाणी घातल्याने एकतर झाडालाही पाणी मिळते, तुम्ही आळस बाजूला टाकल्याने अंगातला आळसही जातो. शिवाय थोडा व्यायामही होतो. म्हणजे शरीर सुस्तही होत नाही. निसर्गाशी सहवास, सोबत, मैत्री असं करता येईल. पण हे कोण लक्षात घेत नाही.

सार्वजनिक बागेतली फुलं आपण आपलीच मालमत्ता असल्यासारखी तोडतो. देव काय आपल्याला सांगतो का की , 'मला रोज फुलं घाला' तीही चोरून आणलेली? आपण मॉर्निंग वॉक बागेत घेताना तीच फुलं आपल्याला प्रसन्न करतात. ती चोरून देवपूजा केली तर मग देव होईल का आपल्यावर प्रसन्न? ही निसर्गाची नासधूस आहे. आधीच शहरात बागा कमी. प्रदूषण जास्त. माणसं तर शहराशहरात 'सॅच्युरेटेड' झालेली. त्यात 'बगियनमे भंवरा' कसा येणार? एक दिवस यामुळे असा येईल की आपणच आपल्या हातांनी 'जालियानवाला बाग' मध्ये जे झाले. ते या वागण्यामुळे परत भोगू. तसं व्हायचं नसेल, तर वेळीच जागे व्हा. प्रदूषणाला आळा झाला. झाडे लावा, झाडे जगवा, लहान लहान अंतरासाठी चालत जा. बस; चलते रहो। चलते रहो।

हं! ह्याची सुरवात मी माझ्यापासूनच करीन म्हणतो. कारण मी निसर्गाचाच एक भाग आहे ना?

*

---

## पावसाळी प्रेम दर्द

पावसाळी सांज वेळी
तू पुन्हा येऊ नको।।
विसरलेला प्रेमदर्द तू पुन्हा जागवू नको।।धृ।।

लाल मेहंदी तळहाताची,
रक्तरंगी जणु मम ह्रदयाची
बधीर मनाला टोच टोचुनी
तू पून्हा दुखवू नको ।।१।।

त्या भेटी, त्या गाठी,
ह्रदय पुष्प जणू तुटले देठी,
नव्हतीस तू कधीही माझी,
सय मीठीची देऊ नको ।।२।।

हीच विराणी आयुष्याची,
हीच कहाणी माझी माझी,
तुटल्या तारातून उगाचच,
दिडदा दिडदा छेडू नको ।।३।.

**-पद्माकर रणजीत**

## डुप्लिकेट

टाळं बोले चावीला
रहा माझ्या संग
मालकाचे घर राखू
सदैव अभंग ।।१।.

चावी, तुझ्यामुळे
नीट चाले माझे लिव्हर
तुझ्या खाचांचा
अनोखा ढंग ।।२।।

शब्द नाही प्रतारणेला
लटकलो मी कडीला
मालिकणीच्या कमरेला
जुडग्यात तू दंग ।।३।।

टाळ्याविना चावीला
मर्यादा फिरण्याला
शिक्षा तुझ्या प्रतारणेला
सवतीचा बांधला चंग ।।४।।

**-अजित प्रमोद तळपदे**

लेख

# हे आपणच केले पाहिजे

**✶ सुषमा ✶**

आपल्या आजुबाजूला पाहिल्यास खूपच सामाजिक प्रश्न दिसतात. एकीकडे लाभलेली हजारो वर्षांची परंपरा- पण काळाच्या ओघात मूळ उद्देश हरवलेली आणि त्याचे विचित्र/वेगळेच असे रूप घेऊन उरलेली संस्कृती तर; दुसरीकडे नवीन तंत्रज्ञान-विज्ञान यांच्याशी मित्रता करत वाटचाल करणारी बुद्धी असेच वर्णन आपण आपल्या समाजाचे करू शकतो. त्या सगळ्याबरोबरच अनियंत्रितपणे वाढणारी लोकसंख्या त्याच्या परिणामस्वरूप गरीबी, अशिक्षितपणा, राजकारण्यांचा बेजबाबदारपणा अशा असंख्य गोष्टींमधून समाजात वेगवेगळ्या प्रकाराच्या प्रदुषणांचा प्रादुर्भाव झालेला आढळतो.

हो, प्रदूषणच. मानसिकतेत, सामाजिक जाणिवेत, बुद्धीवादात, प्रापंचिकतेत, सार्वजनिकतेत सगळीकडे फक्त देखावा- आजच्या जमान्याची टॅग लाइन म्हणजे 'जो दिखता है वोही बिकता है' म्हणजे फक्त दिखावा. आत काय आहे? माहीत नाही.

आत्ताच बघा ना, आपल्या गणपतीबाप्पाचा उत्सव झाला. ह्या दिवसात म्हणजे गणपती येण्याच्या पाच-सहा दिवस अगोदरपासून रस्ते अडवून गल्ल्यागल्ल्यामधून बांधलेले मांडव, देखावा पूर्ण करायच्या आधीपासून मूर्ती घेऊन येणारी गणपती मंडळे. या सगळ्यामुळे माणसांच्या गर्दीत अजूनच भर पडते. अशा गर्दीतून वाट काढत जाणारी ॲम्ब्युलन्स पाहिली की बेचैन व्हायला होते. जन्म-मरणाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या रुग्णांना वेळेत उपचार मिळतील का? अशी धास्ती वाटते.

लोकमान्यांनी घराघरातून परंपरेने पूजल्या जाणाऱ्या गणपतीला जेव्हा समाजकारणासाठी सार्वजनिक केले तेव्हा अशाप्रकारे गणपती उत्सव साजरा व्हावा असे ध्यानीमनीही नव्हते. या संदर्भात काही महिन्यापूर्वी माहिती वाचनात आली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी लोकमान्यांना लिहिलेले पत्र. त्यात त्यांनी जे मुद्दे मांडले होते त्यापैकी प्रकर्षाने पटणारा मुद्दा असा होता की, 'घराघरात धार्मिकपणे साजरा होणारा गणेशोत्सव जर सार्वजनिक केला तर काही वर्षांनी ही सार्वजनिक मंडळे छोटी छोटी सत्ताकेंद्रे बनतील आणि समाजासाठी ती हानीकारक होतील. खरोखरच किती द्रष्टे होते न्यायमूर्ती!

आजुबाजूला नजर फिरवली तर असेच दृश्य दिसते. गल्लीगल्लीतील मंडळांमध्ये स्पर्धा होतात. देवाची मूर्ती अधिक उंच कोणाची? कोणाचा देखावा अधिक भव्य? कोणकोणते सेलिब्रेटीज तुमच्या गणपतीच्या दर्शनाला येतात? वगैरे. या सर्व गोष्टीसाठी लागतो पैसा. जो वर्गणीमधून जमवला जातो. प्रत्येकाच्या विभागातल्या माणसांकडून, दुकानदार, विक्रेत्याकडून वर्गणी घेतली जाते जी कधी आपखुशीने तर कधी जबरदस्तीने जमा होते आणि त्यातूनच रस्त्या-रस्त्यावर मांडव उभारले जातात. रोषणाई देखावे उभे राहतात.

त्या रोषणाईकडे बघताना, विजेच्या अशा अपव्ययाबद्दल मंडळांना सांगावेसे वाटते की, अरे, जरा आजुबाजूला बघा... मुंबईच्या उपनगरातून म्हणजे बोरिवलीच्यापुढे आणि मध्य उपनगरात विक्रोळीच्या पुढील भागात पार वसई-विरार व कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई व त्यापुढेही विजेचे रेशनिंग होते. दिवसातील काही तास अथवा आठवड्यातील एखादा दिवस वीज पुरवठा खंडीत केलेला असतो. मुंबईच्या विस्तारित उपनगरांची ही कथा तर; मग ग्रामीण भागातील लोकांच्या त्रासाला अंतच नाही.

जी गोष्ट विजेच्या अपव्ययासंबंधी, तीच गोष्ट रोषणाई/देखावे यावर खर्च केला जाणाऱ्या पैशासंदर्भात म्हणता येईल. आपल्या मुंबईमध्येसुद्धा असे लोक आहेत की ज्यांना एकवेळचे अन्नही पुरेसे

## कधी?

**-कल्पना सुभाष कोठारे**

कुहू, कुहू, कुहू
कोकिळ बोलली
वसंत आला, गेला
कधी? कळलंच नाही!

गुटर गूंऽ गुटर गूंऽ
पारवा घुमला
दुपार कलली
कधी? कळलंच नाही

चिव् चिव् कावकाव
भरली शाळा
सांज सरली
कधी? कळलंच नाही

चुरऽकुर्रऽचुरऽकुर्रऽ
रातकिडे रात्रभर
रात मिटली
कधी? कळलंच नाही

चू चू चूऽ चू चूचू ऽ
फुलचुखी पहाटेसच
उजाडलं, कळलं गं बाई!

---

मिळत नाही. याचा विचार रोषणाई/देखावे इत्यादीवर पैसे उधळणाऱ्या मंडळांनी करायला हवा.

आणि शिवाय ज्यांच्यासाठी सार्वजनिक उत्सव साजरा होतो अशानांच आपण ट्राफिक जाम, हवेचे प्रदूषण ह्यांनी त्रास देतो. हा विचार कधी केला जाणार?

जगभरातील शास्त्रज्ञ सांगत आहेत की, प्रदूषणामुळे पृथ्वीचे तापमान वाढते आहे. हिमनग वितळत आहेत, पाण्याच्या पातळीत वाढ होते आहे. पण आपण सर्व आपल्यातच मशगुल आहोत. 'मला काय त्याचे?' हाच विचार सगळ्यांवर अम्मल करतो आहे आणि हेच फार भीतीदायक आहे. निसर्ग देत असलेली चेतावनी आपण कानाआड / डोळ्याआड करतो आहोत. त्याची साद आपण ऐकत नाही. पण जर त्याचा प्रकोप झाला तर फक्त विनाशच आहे.

हा एक भाग झाला. त्या व्यतिरिक्त आपल्या संस्कृतीचा टेंभा मिरवताना- विसर्जनाच्यावेळी दारू पिऊन नाचणे, छेड काढणे, मारामारी करणे या गोष्टींकडे मात्र हेतुपुरस्सर सोईस्करपणे दुर्लक्ष केले जाते.

गणपती विसर्जनाच्या दिवशी सर्व वाहिन्यांवर लालबागच्या राजाच्या मंडळात महिलांना धक्काबुक्की करतानाचे क्लीप्स दाखवत होते. अतिशय संतापजनक अशी ती बाब होती. देवाचे दर्शन व्हावे म्हणून पंधरा-पंधरा वीस-वीस तास रांगेत उभे राहून आपला वेळ खर्च करून भाविक देवाच्या पायावर डोके टेकण्यासाठी येतो आणि माज आलेले हे कार्यकर्ते त्यांना धक्काबुक्की करतात हे पाहून असे वाटते की, आपण आपला भाव, आपली भक्ती आपल्याकडेच ठेऊन त्याचा बाजार मांडणाऱ्या मंडळांना/समित्यांना धडा शिकवण्याची, सारासार विचार करण्याची वेळ आली आहे. 'लालबागचा राजा नवसाला पावतो' आणि मग माझ्या घरात, देव्हाऱ्यात असणारा गणपती ज्याची मी दररोज मनोभावे पूजा करते तो मला पावणार नाही का?

गणपती विसर्जनाच्या दिवशी मिरवणुकीत सामील झालेले लोक पाहिले आणि वाटले... आपल्याकडे निसर्गाचा वरदहस्त आहे. मुबलक प्रमाणात पाणी आहे, धान्य पिकते आहे; एवढे मनुष्यबळ आहे मग त्याचा असा अपव्यय न करता त्याचा सुनियोजीतपणे उपयोग केला तर भारत हा विकसनशील देश न राहता विकसित देश होईल. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. ज्या नेतेमंडळींमध्ये जनसमुदायाला मोटिव्हेट करण्याचे सामर्थ्य आहे त्यांनी या वाया जात असलेल्या संपत्तीचा सदुपयोग देशाच्या भल्यासाठी करून घेतला पाहिजे. आपली स्वत:ची खासगी पोतडी भरण्यासाठी नाही.

आपला देश सर्व दृष्टीनी संपन्न आहे. विविधतेने नटलेला आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेला आहे. ते सर्व टिकवायचे तर फक्त गणेशोत्सव नव्हे तर संपूर्ण भारतभर सार्वजनिकपणे संपन्न होणारे, साजरे होणारे सर्वधर्मीयांचे सणवार अत्यंत विचारपूर्वक, सुसंस्कृतपणे आणि सर्व प्रकारच्या प्रदूषणांविरहित साजरे झाले पाहिजेत तरच आपल्याला पुढच्या पिढीला राहण्यासाठी योग्य असा देश आणि संपन्न असे घर देता येईल.

*

# Nature

**-Aparna Sameer Vijayakar**

Ecotours , Nature trails ,Carbon Footprints, Organic food ,Back to Nature ,Nature walks …….So many naturally unnatural fads and fancies ..!

A quest in each person's life seems to be going back to Nature ! Every where we can witness Man's desperation to "going back to nature ..".''Nature or Back to Nature " seems to be d new Mantra …the new

"N –word "..!

You have everyone ,from lil kids to seniors ,trying to claim a slice of the Nature Pie …….so you have small kids being taken for Nature Walks ,who keep shredding the leaves as they come within the reach of their tiny paws ……you have the seniors for whom picnics are arranged at out of the way temples ,hidden in the forests ,where they sit and marvel at the peace and quiet ……..then you have those walks all around the mangroves ,almost like a picnic. Its not care ,but curiosity which ensures that people go tramping ,albeit fearfully ,through the mangroves .Never mind their stagewhispers ,stomping and strong aftershave n colognes which disturb the roosting birds n small creatures.! Is this really our way to going back to nature , or Getting Back at Nature ….?

Everything that we do today seems to be having an impact on nature . Howz that ? Whatever happened to our good old cloth pishwya ? so down market ,surely ,the Branded ,logo –ed ,even duty free bags are obvious status symbols …….

Why does the government have to makes rules and ban certain materials ? if we enjoy some peace when in the lap of nature ,should we not have enough sense to preserve that very peace ?is it so very necessary to listen to music instead of d twitter of the birds …ofcourse nowadays ,the connotation for twitter is absolutely different . Whereever we go ,it almost has become mandatory to carry a bisleri ……not a single source of natural water is left pure by man .

Today seeing a couple of Sparrows seemingly bring us closer to nature . But they too have abandoned our unnatural world .

Man ,in his greed for nature,seems to be getting closer and closer to nature ,but at what cost ? and whose cost ?

The cost is borne ,ironically ,by Nature itself ! Today huge multi million housing projects are being sold on the Premise …."Going Back To Nature " so ,you are now the proud owner of a Hillside Home ,in the Lap of Nature,where you are assured that the only disturbances will be Birdcalls ..!!!! The Ad-world urges you to invest wisely into sane ,green surroundings……..

But who thinks of the consequences ? do your new neighbours really like you or even want you there ?Do they have any choice ?none…….

Oh yes ,if these existing residents decide to call on the new neighbours with their families or cubs ….Woebetide …..they are hunted ,tranquillized ,caged ,relocated …….from their Natural world to our Naturalized world of Zoos and Safari Parks !!!!!!!

What right do we have to go hunting for new places to spoil,when we were not really able to care for d places we had years ago ? The shady ,leafy Lanes of yesteryears are seen only in Sepia Tints ,naturally !! What guarantee do we give that we will not transform this nature's last bastion into another one of our natural habitat …ugly ,devoid of any beauty and sweetness ?

Let Nature be …..lets try ,with the help of this generation to bring back a lil bit of Nature in everyone's life , instead of we going away to find this very Nature ………

*

**कथा**

# घार

## ✶ सुहासिनी कीर्तिकर ✶

सरुताई हल्ली हल्ली त्या उद्यानात जाऊ लागल्या होत्या. 'आजी-आजोबा उद्यान'. सुरुवातीला समुद्राच्या कडेकडेनं ओझोन पीत त्या चालत जायच्या. मनपसंत सकाळला भेटण्यासाठी. घरातच सकाळ उगवावी असं हल्ली वाटेनाच त्यांना. होतं कोण घरात? घरपण ते फक्त आठवणीत. समीरनं तर ऑकलंडमध्येच संसार थाटला. परत कधीही न येण्यासाठी. त्याला दोष तरी कसा द्यायचा? संगतीनं बिघडला तेव्हा त्याच्या बाबांनीच त्याला तिथं सेटल व्हायला मदत केली. ती एकप्रकारे सेटलमेंट होती त्यांच्यात्यांच्यात. आई म्हणून फार जड गेलं तिला. पण उपाय काय? नवऱ्याच्या म्हणजे अरविंदच्या म्हणण्यानुसार तर सर्व वाटा ठरायच्या. नसतील तर निर्माण करायच्या. त्यानं म्हटलं 'नोकरी सोड.' सोडली. त्यांन म्हटलं, 'मुलांना इंडिपेंडन्ट होऊ दे.' दिलं. मग पैसा मुलांच्या हातात अकाली पडला तरी सरूला बोलायची सोय नाही. मुलगी सविता वयात आली, मुसलमानाबरोबर पळून गेली. 'गेली तर गेली; काय वाट्टेल ते झालं तरी तिला हे घर तुटलं.' अरविंद म्हणाला. सरितानं 'मम' म्हटलं. समीरला तर तो नववीत असतानाच स्वतंत्र बाईक आली. दहावीत गेल्यापासून रात्रीबेरात्री मित्रमंडळीत जाणं त्याला सोपं आणि सहज झालं. कधी दहावीच्या अभ्यासाचं कारण पुढं करून, कधी कुणाची पार्टी म्हणून... तो रात्रीचा घराबाहेरच.

'यडचाप, तो काय कुक्कला आहे? रात्री बाहेर राह्याला तर काय? कशाला घोर लावून घ्यायचा? त्याला कळतं सगळं.'

'अहो, काय काय ऐकतो आपण हल्ली..तेव्हा....'

'आपण नाही, तू!... तू ऐकतेस. कुणीही सांगावं आणि आपल्या मुलावर तू... तू अविश्वास दाखववावास? शी! फॉरवर्डनेस कधी येणार तुझ्यात?'

'अहो पण...'

'काही सांगू नकोस, हल्ली मुंबईत दिवस-रात्र असा फरक राहिलाय का? अगं राहिला बाहेर तर राहू दे. त्याचे म्हणून दिवस आहेतच ना? करू दे एन्जॉय. लेट हिम.'

मग ही एन्जॉयमेंट भर दिवसच्यादिवस झोपण्यात जाऊ लागली समीरची. त्याच्या कपड्यांना विशिष्ट वास. ओठांवर वेगळे व्रण. तळपाय उघडे ठेवायला कचरणं, हातउसने पैसे घेणं, कधी न सांगताच घरातली कॅश ढापणं... सारं सारं काही सुरू झालं. दहावी जेमतेम. मग अरविंदच्या धडपडीनं डिप्लोमाची जेमतेम ॲडमिशन मिळणं.... यात सरुताईंचा काहीच सहभाग नाही. परीक्षेला न बसणं, फीचे पैसे उडवणं, अरविंद- सरिता कुठं गेले की घरातच हंगामा करणं, फार वाढला गोंगाट की शेजाऱ्यांच्या तक्रारी येणं. एकदा निखळलं की वेगानं खाली यायला अन् गारगोटी व्हायला उल्केला कितीसा वेळ लागतो?

समीरनं जेव्हा यामिनीबरोबर प्रकरणच केलं तेव्हा मात्र अरविंद भांबावला. सवितानं केलं तेव्हा धीरानं कठोर निर्णय घेणारा हाच का अरविंदा? सरूचा याहीवेळा काहीच सहभाग नाही. उलट उपरोधानं तिनं अरविंदला टोकलं-

'का? आता का? त्याचे म्हणून दिवस आहेत ना हे? लेट हिम एंजॉय. यामिनी काय आपली पोर आहे? तुम्ही कशाला जीव जाळता?'

अरविंदला हे अपेक्षित नव्हतं सरूकडून. पण करतो काय? मग याला त्याला गाठून, सावरून समीरची पाठवणी झाली परदेशी. तेथेही त्यानं गुण उधळले. हमाली केली. लग्न केले. निस्तरले,

निस्तरण्याचा एक भाग म्हणून या घरातला त्याचा कोपरा त्यानं कायमचा मिटून टाकला.

कोणी म्हटलं नाही; पण या सगळ्या पुत्रायणानं अरविंद खचला. स्वत:ला दोष देत बसला अन् अखेर ब्लडप्रेशर, डायबिटीस करता करता कॅन्सरचा बळी ठरला. बळी जातो कुणीतरी. पण त्याचं नैवैद्याचं नसलं तरी शिंतोडे म्हणून उडालेलं रक्त माखतेच घाव घालणाऱ्याला. 'आपण याला कारणीभूत आहोत' ही खंत समीर दृष्टीआड गेला तरी अरविंदला सलत राहिली होती. संपवत राहिली होती.

-असा अरविंद परलोकी गेला. सविता पळून गेली. समीर परदेशी. सरुताई उरल्या एकट्या. एकट्याच, रात्र रात्र आठवण काढत जागायच्या. टीव्ही, पुस्तकं नातलग यांना त्यांनी खूप जवळ केलं. पण त्यांना जवळीक काही साधता आली नाही या सर्वांशी. उजाडलं की घरात नकोसं वाटायचं त्यांना. दुपार, संध्याकाळ ओढून काढण्यासाठी समुद्रावर तासनतास फिरायचं. सकाळ सरायची अशी. मग घरी आलं की पेपर वाचणं, टीव्हीवर बातम्या बघणं, पूजा-आरती करीत तासनतास काढणं. कधी फक्त दही खा, कधी फोडणीचे पोहे, कधी फळं, कधी साधा जाम फासलेला पाव. लोळता लोळता दुपार अटळपणे ढकलायची. सविताचा तर आठवणीतही ठावठिकाणा नाही. मनातली ओल जराही न पुसता, विस्कटता दुपार यातून निसटून जायची. सरुताई अशावेळी अगदी एकट्या, एकट्या उरायच्या.

मात्र समुद्राच्या कुशीकुशीनं चालत जाणारी त्यांची सकाळ अलीकडं जरा त्रासदायकच झाली होती. गडगा बांधायचं काम काढलं होतं पालिकेनं. मग मोठमोठाले दगड, राक्षसी यंत्रे, त्यांचा आवाज याचे समुद्राशी पटेना. सरुताईंना पटवून घेणे जमेना. समुद्रगाज आणि यंत्राचा आवाज म्हणजे अरविंद आणि समीर यांचे नातंच वाटलं त्यांना. दोघांचंही बरोबर, पण सरुताईंना त्यात स्थानच नाही. मग त्यांनी ही वाट बदलायची ठरवली. जवळच्याच गार्डनमध्ये जाऊ लागल्या सरुताई त्या या अशा. समीरला एक मुलगा आहे म्हणतात. अश्मित त्याचं नाव. त्याची त्या आजी. गार्डनमधल्या पालिकेनं आखून दिलेल्या आजी-आजोबा उद्यानात आज्जीपण मनात ठेवून त्या येऊ लागल्या.

कुणी भेटलं तिथं तर ' हरि ॐ' करायचं. 'जय श्रीकृष्ण' म्हणायचं. म्हणता म्हणता रोज चेहरे ओळखीचे होऊ लागले. मग कुणी कुणी त्यांना खरोखरच आजी, माताजी, आण्टी, माँसीजी म्हणू लागलं. खरंखुरं निसर्गातलं घर. मनमोकळं, निरोगी वाटणारं नातं. ओळखीच्या चतकोरावर फक्त कुशल विचारणारं हवहवंसं वाटणारं इवलंसं लोणी... असं कायबाय त्यांना वाटू लागलं. कुणी सकाळी सकाळी प्रसाद म्हणून चणे वाटायचे. कुणी एखादं फूल. पुढे अख्खा दिवसभर कोऽऽणी कुणाचं नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा आदल्या सकाळी भेटलेली, आवडलेली जवळकीची नाती पुढे चालू. मुख्य म्हणजे ही वाट त्यांची त्यांना सापडलेली होती. किती वेळ थांबायचं. फुललेली जास्वंद पाहायची की पायाखालची हिरवळ; कुणाची चौकशी करायची- कुणाशी नातं जोडायचं- हे सगळं सगळं त्या ठरवत होत्या या विशाल हिरव्या घरात. नवरा नव्हता ठरवणारा. मुलगाही नव्हता संघर्षाला खत घालणारा. एकटं, पण निवांत आयुष्य. सुखी नाही; पण समाधानी सकाळ. बागभर पसरलेली ती. आकाशभर मनानं विहरणारी. बाकाबाकांवर विसावणाऱ्यांशी क्षणभर नातं जोडणारी. जॉगिंग ट्रॅकवर 'जय श्रीकृष्ण' म्हणत किंवा 'हरि ॐ' म्हणत माणसात असणारी. घराबाहेर घरपण उभं करणारी.

याच माणसांत, माणसांच्या उद्यानात त्यांना एक आणखी घर दिसलं. म्हणजे एक दिवस त्यांना आढळलं की पंधरावीसजण ओढणी, चादर, प्लॅस्टिक, आसन, असेल ते अंथरून त्यावर बसलीत. एक शुभ्र वसनातला बुवा समोर बसलाय. त्यांनी चौकशी केली तर सगळीजणं त्यांच्याचसारखी हिरवळ शोधत, घर शोधत उत्स्फूर्तपणे तेथे जमताहेत काही महिने.

'याची फी किती?'

'काही नाही.'

'करायचं काय?'

'नक्की असं काही नाही.' बहुतेकजण गुजराती, मारवाडी, काही भय्या. अगदी थोडे मराठी. सरुताई मग यात अलगद सामील झाल्या. आधी फिरणं, मग हिरवळीवर अनवाणी पायांनी वेगवेगळ्या लयीत चालणं झालं की त्या या घोळक्यात जाऊन बसायच्या. समोरचा बुवा म्हणजे कुणी साधुबुवा नव्हे. संसारी माणूस. पण 'बापूं'सारखं त्यांचं दाम्पत्यजीवन नव्हतं

इथं. त्या बुवाला गुरुजीपद होतं. पण अतुलभाई या नावानं बिलगलेलं सामान्यपणही होतं. अतुलभाई कधी योग शिकवायचे. इगतपुरीच्या विपश्यनेचा त्यांचा अनुभव सांगायचे. दिवसातून एक तास तरी मौन पाळा म्हणायचे आणि स्वत: तासभर त्यावर बोलायचे!

'अरुणाबेन पेट केवु छे आज तमारू?' 'काका, काले आयव्या नही?', 'बिमलाभाभी इधर आओ, प्रॉब्लेम बताओ..' चालू असायचं त्यांचं. मग विमलाभाभी किंवा अमलाचाची त्यांच्याशेजारी येऊन बसायची. मुलांचे, नवऱ्याचे, सासूचे, कधी नोकरीचे, कधी तब्येतीचे प्रॉब्लेम सांगायची. 'सासू बोली तर एक घोट पाणी तोंडामधी घे. अख्खा तोंडात ते खुळखुळ घुमव. शांतपणे पी. दीर्घ श्वास घे. श्वासावर ध्यान केंद्रित कर.' असले काहीबाही उतारे गुरुजी सांगायचे. मग परत योगासनं सुरू. ब्रह्ममुद्रा, पर्वतासन, कपालभाती, अनुलोमविलोम, भ्रामरी, ताडासन, वक्रासन, भुजंगासन, शवासन अशी आसनं करण्यात ते पटाईत.

सरुताई सगळ्यांचे प्रॉब्लेम्स मनापासून ऐकायच्या. अनुभवाची जोड देऊन इतरांप्रमाणे गुरुजींच्या उताऱ्यांवर, उपायांवर भाष्य करायच्या. सहानुभूती दाखवायच्या. गुरुजी कधी नुसती 'आज सुट्टी' म्हणून अंताक्षरी खेळायचे. त्यांना 'मन तडपत हरिदरसनको आज,' 'तू गंगा की मौज मैं जमुनाकी धारा' पाठ. एखादे योगासन केल्यासारखे डोळे मिटून, गालभर हसून ते गाणं म्हणायचे. सरुताईना ही गाणी ऐकली की किती भरून यायचं. मग त्याही आपले एकाकीपण त्यांना आठवणाऱ्या गाण्यात मनभरून बुडवून टाकायच्या. मान वर करून, गुरुजीच्या डोळ्यात डोळे मिटवून. पण बेसूर होऊन... भोवतालच्या माणसांना हाच एक प्रॉब्लेम वाटायचा.

गुरुजी कधी जीवनशैलीवर बोलायचे. 'ब्रश वापरू नका. दात मंजनानं घासा. हरडा, कडूलिंबाची पानं, बाभूळची पावडर, लौंगची पावडर अने हळद ही पंचद्रव्ये तुमच्या हाताच्या पाच अंगुलिया समझो,', 'चाय मत पिओ. शुगर मतलब खांड अपना खंडखंड करती है', 'अगर क्रोध आया तो मुझे याद करो', 'प्रेमसे आगळके माणसने जीतो' असं काहीबाही. कधी ब्रह्मकुमारीचं तत्त्वज्ञान. ते संथ आवाजात म्हणत, 'सब आँखे बंद करो, अब दो भवोंके बीच आपका ध्यान केंद्रित करो, अपने देहसे बाहर आओ. प्रदक्षणा घाला. बघा. तुमचा शरीर देखा? अब अपनी आत्माको लेकर उपर आँसमानमे चलो, चलो. दिख रहा है वहाँसे उद्यान? पुरे गार्डनको चक्कर लगाओ: हराभरा पेड, पंछी, फूल, बच्चे खेलते हुअे, सब देखो, अब चलो बम्बई शहरमे। तुम गगनमे हो। तुम म्हणजे तुमी नाय, तुमची आत्मा. शरीर बागमध्येच आहे. चलो आगे, और आगे-आगे, उपर और उप्पर बाद लोगोंको नीचे छोडकर. अब एक बंद रूम है। वहाँ उस कमरेमे चलो. अब प्रकाश देखाई देता है? है? सगले लोकांनी बघिटला? वो परमात्मा आत्मासे भेंट कराना है। हवे तमारी जे इच्छा होय ए परमात्मापासे व्यक्त करो. दिकरीना लगन, बेटेकी नौकरी, पतिराजला आयुष, बिमारीका निर्मूलन, जे होय ते तमे कहो. बोला आपने? सांगितला? अब जैसे आये वैसेही वापस चले. पहले तेज:पुंज खोली. मग आकाशामंदी वरवरसे अगदी खाली, खाली, खाली-नीचें. बादलोकें नीचे, मग बम्बई शहर, झोपडपट्टी, उडताच आहात तुमी. पछी गार्डन. पेड, फूल, खेलते बच्चे. नीचे नीचे. अपने शरीरके पास. बादमे शरीरमे आये? आला? अब आँखे खोलो. आता तुमी मागतलेली इच्छा सौ टका पुरी होनार.'

असं काही करताना सरुताई डोळे बंद करून बेहोष व्हायच्या. शहरच काय, त्यांनी हा आध्यात्मिक प्रवास करताना देशही सोडलेला असायचा. उंच, उंच, अधिक उंच जात जात त्या प्रकाश भरलेल्या खोलीत जायच्या. छे! त्या समीरच्या (न पाहिलेल्या) घरात शिरायच्या. जे मागणं मागायचं ते त्याच्यापाशी मागायच्या. 'ये रे, ये अश्मितला बघू दे नं मला. हे बघ ताडासन करत उंच उंच झालेय. आता बाबा नाहीत रे. त्यांन पाठवला तुला इथं. एकट्याला. पण आता मी तुला मार्ग दाखवेन खऱ्या सुखाचा. या ढगावर बसून जाऊ या आपण खाली खाली. अजून खाली. दूर दूऽऽर. शहरात, मुंबईत, या गार्डनमध्ये. मग झाडांचे पंख घेऊन उडत उडत आपल्या घरी. अरे, अरे पण थांब, गार्डनमध्ये मला माझ्या शरीरात जाऊ दे.' एका थरथरत्या क्षणी त्या आदेशाचे पालन करत परत शरीरमय व्हायच्या. गदगदायच्या, डोळे उघडताच ते गुरुजींकडे लागलेले असायचे. प्रेमानं डबडबलेले. ओथंबून आलेले. मग अचानक खूप उत्सुकता दाखवून प्रश्न- 'गुरुजी, अशी इच्छा पूर्ण होऊ शकते?' गुरुजींचे ठाम आश्वासक उत्तर. जवळ बोलावून त्यांच्या दु:खावर फुंकर. सरुताईच्या पाठीवर

क्षणभर विसावणारा गुरुजींचा हात आणि आधार देणारे शब्द.

b. 2nd S -- 1000 points
c. From 3rd follows the scoring pattern as in 9c onwards.

11. When partners are there, you are allowed to use partner's cards to make both B/S.

12. With partners when one partner has declared the first sequence or bezique pair then when you declare the next S/B you will get the next points.

13. You score points by:

a. Marriage K+Q of Trump -- 40 points -- Keep both K+Q Vertical
b. Marriage K+Q of Non-Trump -- 20 points -- keep both K+Q Vertical
c. 4 J --- 40 points -- keep horizontal (only trump J are useful, other can be used for discarding)
d. 4Q - 60 points - keep horizontal (unlike J, Qs of not married can be kept for marriage and then except Trump can be discarded.)
e. 4k - 80 points - keep horizontal (unlike J, Ks if not married can be kept for marriage and then except Trump can be discarded.)
f. 4A - 100 points - keep horizontal, keep only trump as, other can be discarded
g. Suppose you have 1/2/3 pairs of married K+Q as in (a) or (b) above, you can add 3/2/1 K or Q to make them horizontal and score points as in (d) and (e) above
h. When you have married K and Q and made them horizontal you have to keep only the trump and Q required for B and others can be used for discarding.
i. You can declare a S or B and score as mention before.

14. You can declare B pair or S using the already horizontal or vertical cards ( to make B or S ) or you can make B or S with fresh cards from your hand these will be kept vertical.

15. Cards used once to make B or S cannot be used again to make next B or S. These cards are to be locked. They can be used only for marriage or making if veritcal to horizontal. (using rule 13 and scoring points.)

16. STARTING THE GAME : After dealing the required cards play clockwise. The person next to the dealer starts the game.

17. If the trump card opended is higher 9 i.e. T,J,Q,K, or A which can be used in making sequence then the person or partners who win the hand are aloowed to take the opened card provided they have the 7 of that trump. Otherwise it remains there untill the oppositon takes it. The card so taken will remain in the vertical position by the person who takes it.

18. Like in seven-hands the trick is taken by the person showing the highest card, but unlike seven-hand have can use a trump card to take the trick irrespective of whether you are holding the same colour card or not.

19. Once a trick is taken after declaring any scoring the person who has taken the trick will pick a card from the stack followed by others in clockwise sequence. He will then throw an unwanted card followed by others. Go back to step 18.

20. The partners whose trick it is are allowed to score the points as in 13.

21. You can show only one B or S at a time.

22. Once a B or S is declared the cards are locked except for marriage or making horizontal from vertical position. If by chance you throw any card from this B/S you will have to start from 1st B/S with new B/S.

23. Normally a game is played for 20,00 points.

24. Once the stack of the 12 packs gets over, all the cards are mixed and the person next to the one who dealt first time will deal.

25. It is Considered a PLUS if you score exactly the 20,000 of course you win even if cross the set points. However after 2 deals if neither side scores 20,000 then the game is taken as DRAW and ther is no winner, even if one side is leading.




26. Markers are shown above. Use tens to register tens, once you reach 100 go to hundreds and make the hundred marker to 100 tens to 0. Every time going to the next hundred.

27. Similarly from 100 to 1000.

These are the rules we have used in Pathare Prabhu Social Club.

A word of caution - This is a complicated game and the best way to learn to play is :

1. Watch others playing game

2. Play the game, make mistakes but continue.

---

## हळवे क्षण

**-सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर**

हळवे क्षण जे छोटे मोठे
जपून मी ठेविले
तेच काय होऊनिया तारे
नभांगणी चकमले।।धृ।।

कधी ओझरती नजरभेट अन्
साक्ष प्रीतीची
कधी हळव्या हळदीत रंगली
पदकमले मेंदीची
जपले हळवे रोमांच कधी
नवथर स्पर्शामधले।।१।।

सत्कार कधी तेजाचे झाले
कौतुक भरलेले
पाठीवरती हात कधीतरी
वात्सल्याचे फिरले
त्या मायेचे लाख दिवे मी
अंतरात उजळले।।२।।

विरहामधली व्याकूळ थरथर
मनात सामावली
कधी अचानक भेटीमधूनी
पौर्णिमा उधळली
हे हृदयाचे स्पंदन स्पंदन
वेगळेच गमले ।।३।।

अपयशाने कधी अचानक
मन मलूल झाले
कधी विजयाने हर्षाचे हे
कारंजे फुलले
वेगवेगळे तुषार सगळे
अलगद मी झेलले ।।४।।

# BOMBAY ICE HOUSE

**✶ Solicitor Rajan Jaykar ✶**

Ice is such a common commodity in today's times that it is manufactured on a small scale in every household and whenever ice is needed, we take it for granted that it will be available by merely taking the ice tray from our refrigerator. However about 180 years ago, ice was completely unknown in Bombay and its introduction was through import from America. Consignment used to reach Bombay without ice melting inspite of months of travel by ship. Ice was therefore stored in an Ice House, specially constructed, before it was sold in retail. Why a poor, even a middle class Bombayite could not afford to quench his thirst by putting ice in his glass of sharbat as the price then was exorbitant. However the elite of Bombay not only were the first to consume it but because of their persistent demand there was scarcity of Ice in Bombay for sometime.




The first consignment of ice was received from America in September 1834 by the firm of Jehangir Nasserwanjee Wadia. The coolies complained that it "burnt" their back. It was sold at Rs. 7 per mound or Ans. 4 per pound, in retail. The "new substance" created a sensation among the people of Bombay. Emily Eden sister of Lord Auckland, Governor General of India, in one of her letters commented that "the Americans are valuable creatures from a distance" and that "the exporters Corro of Boston have introduced import of novel substance to the Island of Bombay. This was reported in Bombay Courier, Newspaper of 13th September 1834. The Cargo, in this first consignment consisted of about 3,70.000 pounds of ice in pieces of about 6 inches thick out of 188 tonnes. Only about 40 to 50 tonnes was lost as reported by Darpan newspaper of 12th September 1834.



Sir Jamshedji Jeejeebhoy in 1834 introduced ice at a dinner party at his Fort House (which subsequently housed "Evan Fraser & Co. and after Independence "Handloom" till it was burnt down) and his guests included the Bombay elite of that time. It was reported by Bombay Samachar, a few days later, that due to curiosity about the new substance, the guests put excessive amount of ice in their drinks and most of them caught bad cold next day and remained ill for several days.

Bombay Courier dated 24th January,1837 reported that "we regret to announce not merely the entire disappearance of ice from Bombay, but the little probability there is, of receiving another supply for some time to come. In the meantime we suggest that it will be advisable to be better prepared for the next cargo, to give it a cooler reception".

The popularity of the ice resulted in a movement for the regular supply of ice from America and in 1842 subscription was started for construction of a Ice House for storage and retail distribution of ice in Bombay. Out of the subscription of Rs.10,000 from people of Bombay,



An ice-house was constructed in 1843, with a dome on the top on a small plot of land between St. Andrew's Church and the Court House (which was subsequently used as Great Western Hotel) at Apollo Street, opposite the entrance of the Government Dockyard, now Lion Gate. An arrangement was made between Mr. Tudor of Boston, U.S.A. for the despatch of regular consignments.

Accordingly Mr. Tudor sent his first consignment in 1845 worth about Rs. 27,000 and after it was sold in Bombay it realized only Rs. 23,000. The meeting of subscribers was held on 20th August 1845 under the Chairmanship of Mr. J. H. Crawford, who sympathized with Mr. Tudor's loss and stated that the Bombay public shall at some future date have to resort to the consumption of ice, if not as luxury, at least for medicinal purposes. By 1857 great difficulty was experienced in finding ships to carry ice to Bombay. This led to the payment of very high freights, which coupled with heavy landing charges at Bombay, put complete check on the importation of ice. Bombay Saturday Review newspaper of 5th July 1862 reported that "Mr. Heycock introduced into Bombay in July 1862, the ice manufacturing machine and his factory was located at Girgaum". The ice made of Vihar Lake Water came out in large slabs of 3 to 4 inches thick and weighing on an average of about 20 pounds. It did not have the clean brilliant appearance of Tudor's ice but its price was less by 40% of the price of American ice. By 1868, the Peninsular & Oriental Ice Co. at Bombay, manufactured 5 tons of ice daily at a cost of 5 pies per pound at their factories constructed in 1863 near the Mazagon Docks. The output was mainly for the consumption of the passengers travelling by the P. & O. Ships. Bombay Gazette of 19th June 1871 reported that "the late scarcity of ice in Bombay induced the Rubattino Co. of Italy to ship 90 tons of Alpine ice from Genoa by the Steamer "S. S. Persia" to Bombay". However her late arrival in Bombay on 16th June 1871 resulted in the Cargo dwindling to merely 4 tonnes. Times of India of 14th August 1876 reported that "during the last week, the supply of ice was reduced to 3 pounds for each consumer. On Saturday it was made known that none but sick people, who were able to produce a medical Certificate, would be supplied with ice until the next shipment arrived. The vessel was expected daily".

In July 1877 an application was presented by a deputation of leading citizens of Bombay to H. E. Mr. Richard Temple, the Governor of Bombay, asking the Bombay Government to institute a searching enquiry into cause of scarcity of ice during 1876 and 1877 and to ensure a reliable and steady supply of ice. On 29th November 1878 Ice House was purchased at a public auction by Tudor & Co. for Rs. 30,000.




With the dwindling import of ice and increasing demand from residents of Bombay ice manufacturing companies started sprouting in Bombay. Bombay Gazette dated 12th November 1879 reported that "Mr. Cutler's ice works, was now complete and in full working order, enabling him to offer ice from today at 1 anna per pound". The Bombay Ice Manufacturing Co. was established in 1879 by Mr. J. A. Forbes and Mr. Nanabhoy Byramjee Jeejeebhoy, which broke down the ice monopoly held by Tudor & Co. The factory of the Bombay Ice Mfg. Co. was almost entirely destroyed by fire on 13th May 1884. With the introduction of ice manufacturing machines, Ice House fell into disuse by the turn of 19th Century and was used as a godown till it was finally pulled down in 1917.

The domestic refrigerators started coming into market at the turn of 19th century with early refrigerators being run on kerosene and huge in size. However with starting of electric supply, the next generation of refrigerators were more compact in size, cheaper and durable. Treacher & Co. Ltd., who were pioneers in selling household requisites, were the first to import foreign brand refrigerators such as McCray Refrigerators, which were priced between Rs.95/- and Rs.500, depending upon the model, in their 1911 catalogue.

The building presently standing on the Ice House plot, houses K. R. Cama Institute of Oriental Studies, opposite Lion Gate.

✳

# A Review of Splinters of Thought

**✶ Pratap Velkar ✶**

``Splinters of Thought'' authored by Sumeet Navalkar is the most precious volume of academic wisdom. Sumeet Navalkar's power of reasoning & thought thinking is genuine, Spliters set up by Sumeet will surely clog the mind of thoughtful person. The writings are clear like fountains; do not seem so deep they are.

Yes, Philosophy does vary from a person to a person, depen upon biases & prejudices, craze, passion & impulses. To illustrate, we have an example: during pre-Ramayana period. Raja Bhagirath, the king of Ayodhya dramatically switched over his philosophy of kingship to a philosophy of science and became a prominent builder at that time. Bhagirath built a long lengthy canal, brought Ganga all the way from Himalayas to his kingdom and connected Sharayu, which often suffered from water shortage, every season. The river Bhagirathi was his creation. Sumeet's logic of philosophy is appropriate acts as deterrence when the prediction of a theory is counter intuitive or against generally acceted norms.

H factor in between North-Indians & South Indians, pointed out by him is not uncommon. As a matter of fact, North Indians & South Indians are ideologically one and the same community bounded by a common culture, business & local customs; only pronouncing of words and spelling, interpretation vary. North Indians are influenced by Latin European way of life from North belt, while South Indians are sancritinized by Dravidian culture from South.

I doubt, Sumeet at such a young age, has ever come across a variety of women with various ways of life! My good sense suggests, when a woman is speaking to you, the sub-conscience mantra for a woman is to listen to what she says with her eyes.

As reg. ``faith in faith'', his thoughts are noteworthy. One should have a faith in sub-conscious mind to achieve necessities. The other word for sub-conscience is innervoice, so has been stated by Mahatma Gandhi. Gandhiji sincerely believed his inner-voice. During freedom struggle movement, while taking important decision Gandhiji faced difficulties to open out his inner-mind against his own colleagues. But hs believed in prayers. Prayers gave strength to Mahatmaji to open out his inner mind & thus he opted for inner-voice to lead the nation, Mahatma Gandhi had faith infaith of sub-conscience.

Sumeet's speculations in this book are based upon the facts, that are experienced in varied fields. Splinters of Thoughts are intentionally let off, after theorizing, hypotheorising & guessing the suppositions. His speculations are appropriate. According to him, the natural fragrant stink of male & female bodies, speeds up fast, resulting awesome fragrance that charms & cheers up extravagantly and not the scents of modern cosmetics; absolutely, it is universally acknowledged.

Splinters namely existence of Univers, Devil's kingdom- Internet, mytheca; physics, abnormal evolution are highly thoughtful, deep & debatable. While reading, vibrant study of the author comes alive, as never before in any a kind previously recorded.

This book should be read by all those who are interested in the study of such a kind of varied fields. Congratulations and best wishes to Sumeet Navelkar.

(Author's http:historical documents by pratap velkar.blogspot.in/)

(*A Book written by:*
**Sumeet S. Navalkar**
navalkar.sumeet@gmail.com
*Published by:*
**Sharada Prakashan,** Naupada, Thane.)

✳

परीक्षण

# इतिहासाचा जिवंत खजिना

**★ संजीवनी खेर ★**

एका अफलातून व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देणारे आणि त्याच्या अफाट कामाचे मोल आपल्याला कळावे ह्या उद्देशाने लिहिलेले ज्याला अलिकडे 'कॉफी टेबल बुक' म्हटले जाते; त्या स्वरुपाचे अत्यंत देखणे पुस्तक प्रकाशित झाले आहे. एका माणसाच्या वेडातून मोठी कामं उभारलेली पाहणे महाराष्ट्राला नवे नाही. इतिहासाच्या वेडाने झपाटून काम केलेले वि. का. राजवाडे असोत किंवा शिक्षणाच्या संकल्पनेने पछाडलेले कर्वे असोत. अशी वेडं आपल्या समाजाने कौतुकाने जपली आहेत. पुणे हे अशा व्यक्तीचे माहेरघर म्हणावे लागेल. अशीच एक व्यक्ती म्हणजे कै. दिनकर केळकर हे होत. एका माणसाचा छंद इतिहासाची साधना कशी बनत गेला हे जाणायचे तर 'परस्युट अँड रिटॉरिक ऑफ दिनकर केळकर, प्रिझर्विंग हेरिटज ऑफ इंडिया' हा मृदुला प्रभुराम जोशी यांनी लिखित आणि संपादित केलेला ग्रंथ वाचायला हवा. सहज सोपी भाषा, देखणी सजावट तसेच भरपूर प्रकाशचित्रे यांनी हा ग्रंथ सजला आहे. एका माणसाने उभारलेले हे संग्रहालय पुण्याची शान आहे. हौस म्हणून सुरू केलेल्या, जुन्या कलात्मक वस्तुंचा संग्रह केळकरकाकांच्या हयातीतच सामान्यांच्या तसेच जगातील राष्ट्रप्रमुखांच्या कौतुकाचे नि आकर्षणाचे केंद्र बनला होता. ह्या माणसाने हे सारे कसे केले, कुठून कुठून वस्तू जमवल्या ही कहाणी रंजक आणि थक्क करणारी आहे. त्यांच्याविषयी आजवर वृत्तपत्रातून फुटकळ बरेच आलेले होते. पण एकत्रितपणे सलग त्याची कहाणी तीही इंग्रजीतून आल्याने देशीपरदेशी पर्यटकांना, अभ्यासकांनाही खूप उपयुक्त ठरणार आहे. ह्या ग्रंथाच्या सोबत असलेल्या डिव्हीडीत संग्रहालयातील वस्तू, तेथील सजावट, वस्तू गोळा करताना कै. केळकरांना आलेले अनुभव जे आता त्यांच्या घरच्यांनी, सहकाऱ्यांनी सांगितले आहेत ते समाविष्ट केलेले आहेत. त्यामुळे ती डिव्हीडी एक उत्तम दस्तावेज म्हणून ठेवता येईल अशी आहे.

संग्रहालयाची हकिकत ही त्या काळापासून सुरू होते जेव्हा जुन्या कलात्मक वस्तुंचे महत्त्व लोकांच्या ध्यानी आलेले नव्हते. त्यामुळे जुन्या वापरात नसलेल्या वस्तू मग ती भांडी, लाकडी फर्निचर वा देवादिकांच्या मूर्ती असोत त्यांची रवानगी कोठीच्या खोलीत वा भंगाराच्या दुकानातच होत असे. एकेकाळी पुणे हे सरदार, जमीनदार आणि श्रीमंतांचे गाव होते. साहजिकच तेथे मोठमोठे वाडे होते, त्यात १८-१९ व्या शतकात आवश्यक अशा सुखसोयीच्या वापराच्या गोष्टी होत्या. कालानुक्रमाने त्यांची गरज संपली. त्या अडगळ वाटू लागल्या. परंतु त्या वस्तुंना ऐतिहासिक दृष्टीने खूप महत्त्व असल्याचे मर्म ज्यांना उमगले त्यापैकी एक होते काका केळकर. सरकारच्या पातळीवर हा वारसा जतन करायचे प्रयत्न होत आहेतच. परंतु एका व्यक्तीने अथक प्रयत्नाने आणि पदरचे धन खर्चून हा मराठी मुलुखातला कलेचा वारसा जपला म्हणूनच आपण आज मस्तानी महालाची झलक, डॉ. आनंदीबाई जोशी यांना त्यांच्या मैत्रिणींनी दिलेली प्रत्येकीने भरतकाम केलेली गोधडी, शिखर द्वीपासारखा अद्वितीय दिवा, विविध प्रकारचे अडकित्ते, रोजच्या वापरातल्या १८ व्या शतकातील वस्तू पाहू शकतो. तो काळ कसा असेल ह्याची कल्पना करायला आपल्याला आधार मिळतो.

ह्या पुस्तकाची रचना पाच प्रकरणं आणि त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वश्री अरुण बोंगिरवार, डॉ.

आनंद केळकर, डॉ. सुरेश धायगुडे आणि संजीव साठे यांचे काकांसबंधी लेख आहेत. ह्या साऱ्यांतून काकांचे लोभस कलासक्त, कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व समोर येते. काटेकोर संशोधन आणि आत्मीयतेने केलेले लेखन यामुळे ती व्यक्ती वाचकाला तिच्या कार्यासकट कळू शकते. काकासाहेबांची जडणघडण व्हायला जे घरचे वातावरण होते, त्याचे नेमके वर्णन लेखिका करते, त्यामुळे आणि त्या काळातील प्रकाशचित्रांमुळे जुने घरदांज मराठी कुटुंब, त्यांचे राहणे, वागणं एकमेकांना साथ देणे, घरावर आलेली संकटे त्यांचा सर्वांच्या आधाराने केलेला सामना, कलात्मक वस्तू जमवताना, गावोगाव हिंडताना आलेले लोकांचे अनुभव, पत्नीची अखंड साथ यामुळे काकासाहेबांनी अफाट वस्तूसंग्रह केला आणि तो देशाला अर्पण केला. या कृत्यातच त्यांचा मोठेपणा दिसतो. सधन घरात जन्मलेल्या दिनकरला अभ्यासात फारसा रस नव्हता. पण चिकित्सक वृत्ती आणि सतत नवं काहीतरी शोधत बसायची सवय यामुळे इतर भाऊ वैद्यकीय शिक्षणात पुढे गेले आणि दिनकर मात्र मागे राहिला. याखेरीज अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. त्यावेळच्या पद्धतीने त्यांच्याच तोलामोलाच्या घरातील सुंदर सुशील कमलाशी त्यांचा विवाह झाला. त्या दोघांना ६७ वर्षांचे दीर्घ वैवाहिक जीवन मिळाले. कमलाबाईंची त्यांना सतत सर्वस्वाने साथ होती. त्या गमतीने म्हणत, 'माझ्या नवऱ्याने माझ्या सोन्याच्या दागिन्याच्या बदल्यात तांबं पितळ घेतलंय.' कमलाबाईंना देखील हा जुन्या पुराण्या वस्तुंचे मोल कळत होते. त्यांच्या पाठीशी त्या सावलीसारख्या उभ्या राहिल्या होत्या. काकासाहेब मुळातले कवी. 'अज्ञातवासी' ह्या टोपण नावाने त्यांनी अनेक कविता लिहिल्या. त्याचे दोन संग्रहही प्रकाशित झाले आहेत. ह्या काव्य वेडाने त्यांचा त्या काळच्या सर्वच कवी आणि लेखकांशी संपर्क होता. त्या वर्तुळात त्यांची रोजचीच उठबस होती. सुरुवातीपासूनच त्यांना जुन्या वस्तुंचे प्रेम होतं. तेव्हा ते जुनी नाणी, कुलुपं विकत घेत असत. घरच्यांनी कधीही त्यांच्या हा छंदाला विरोध केला नाही. नंतर ज्याचे रुपांतर झपाटलेपणात झाले. काका म्हणत की, घरच्यांनी जराही नाराजी दाखवली असती वा राग केला असता तर मी हे काम कधीच सोडून दिले असते.

त्यांनी कँपात आणि गावात चष्म्याची दोन दुकानं यशस्वीपणे चालविली होती. कँपातील गिऱ्हाइक हे ब्रिटिश स्टाइल राहणारे असत. कलेचे जाणकार तिथे असत. पेशवेकालीन सरदार, घरंदाज लोकांशी काकांचा घरोबा होता. त्यातील पटवर्धनांशी त्यांचे चांगले जुळे. त्यांच्या वाड्यात अनेक दुर्मीळ आणि कलात्मक गोष्टी होत्या. त्यांच्याकडील एक पेंटिंग काकांना खूप आवडले. सरदार पटवर्धनांनी ते ओळखले आणि त्यांनी म्हटले की, तुम्हाला हवे ते तुम्ही इथून घेऊन जा, इथे जे धूळ खात अडगळ म्हणून पडलेले आहे. त्यांच्याकडील १९ व्या शतकातील पेंटिग ही त्यांची पहिली खरेदी होती. स्वत:कडील वस्तुंचे संग्रहालय करायचे हे कुठेतरी मनात ठरत होते. एकेक करत त्यांच्याकडे वस्तू जमत गेल्या. जुनाबाजार हे त्यांचे प्रिय ठिकाण होत गेले. घासाघीस करून, नीट पारख करून ते चीजवस्तू घेत असत. त्यांची नजर तीक्ष्ण होती. योग्य किमंतीलाच ते वस्तू घेत असत.

चेन्नईला एकदा गेलेले असताना एका दुकानात एका मूर्तीचे मस्तक दिसले. त्या दुकानदाराशी त्या तुटलेल्या शिल्पासाठी काकासाहेबांनी हुज्जत घातली. तुटकी मूर्ती काय कामाची? कोण घेणार? उपयोग काय? म्हणून पडत्या भावात मागितली. पण तो बधेना. पुढे जात असताना दुसऱ्या एका दुकानात एका मूर्तीचे धड दिसले. ज्यावर कामगारांनी कपडे टाकलेले होते. ते धडही तिथे बराच काळ पडलेले असावे. त्याच्याशी बोलचाल झाली. ती मोडकी मूर्ती काय कामाची? तो चौकशीला आत गेला तोवर काकानी अगोदरच मूर्तीच्या मस्तकाचे तुटलेल्या भागाचे माप काढून आणलेले होते. त्याचा अंदाज घेतला आणि तर्क ठीक निघाला. ते दोन तुकडे एकाच मूर्तीचे होते. मग ते खरेदी करून पुण्यास आणले आणि कारागिराकडून वेल्ड करून घेतले. ती श्रीरामाची चोला राजघराण्याच्या काळातील १३ व्या शतकातील मूर्ती होती, जी आज संग्रहालयातील एक अमूल्य वस्तू आहे.

त्यांच्या वस्तुंच्या खरेदीतील अनेक किस्से ह्या पुस्तकात आहेत. त्यांना बजाज कुटुंबीयांच्या इस्टेटीत खिळखिळा झालेल्या मस्तानी महालाचे अवशेष असल्याचे कळते. त्यांनी बजाज यांच्याकडून ते अगदी मामुली दरात घेतले. त्या

बदली त्यांनी हवे असलेले दिवे दिले. १० ट्रक भरून लाकडाचे नक्षीकाम केलेले दरवाजे, खिडक्या,कमानी त्यांनी आपल्या घरी नेल्या. तेथे पेशवेकालीन महाल उभारला. महिरपदार खिडक्या, कोरीव काम केलेले दरवाजे, खाली सुंदर गालिचे, भिंतीवर त्या काळातील पेंटिंग्ज, बसायला लोड, बिछायती, हंड्या, झुंबरे, आरसे यामुळे मस्तानी महल नि त्या काळचे वैभव सजले. आपल्याला तो काळ कसा असेल याची झलक मिळाली.

त्यांच्या संग्रहाला स्त्रियांच्या दालनाने वेगळंच महत्त्व प्राप्त झाले. स्त्रियांच्या रोजच्या वापरातील वस्तू जसे भांडी, कलथे, विळ्या, देव्हारे, पूजेची भांडी, त्यांनी विणलेल्या कशिदा आदी केलेल्या गोष्टी ह्या साऱ्यातून आपले रोजचे जीवनही किती सौंदर्याने नटलेले होते हे दिसते. ह्या दालनाला त्यांनी कमलाबाई दिनकर केळकर, वनिता कक्ष हे नाव दिलेआहे. घरातल्या एका शोकांतिकेनंतर म्हणजेच त्यांच्या १० वर्षीय मुलाच्या राजाच्या आकस्मिक मृत्यूनंतर विषण्ण झालेल्या केळकर दांपत्याने आपल्या मुलाची स्मृती रहावी म्हणून संग्रहालयाला राजा दिनकर केळकर हे नाव दिले.

ह्या संग्रहालयात अनेक देवीदेवतांच्या दुर्मीळ मूर्तीही आहेत. त्यातील वैशिष्ट्यपूर्ण आहे ती सहा हातांच्या गणपतीची मूर्ती, जी त्यांनी नेपाळहून आणली होती. तसेच सूर्याची प्रतिमा असलेला दिवा कारागिरीने आणि संपूर्ण सूर्य परिवार शिल्पित केलेला आहे. जगातील वस्तूसंग्रहालयांच्या तुलनेतही हा एका माणसाने केलेला संग्रह दिपवून टाकणारा आहे. २१ हजार कलात्मक वस्तू, त्याही एकट्याने जमवलेल्या आणि राज्य सरकारला दिलेला कदाचित हा एकमेव संग्रह असेल. त्यांच्या रत्नपारखी नजरेला सलाम!

त्यांना पुणे विद्यापीठाने त्यांच्या कार्यासाठी ‘डिलिट’ ही सन्मानीत पदवी दिली आणि भारत सरकारने पद्मश्री प्रदान केली. ह्या खेरीज अनेक सन्मान त्यांना मिळाले होते.

पर्स्युट अँड रेटॉरिक ऑफ दिनकर केळकर
प्रिझर्व्हिंग हेरिटेज ऑफ इंडिया
लेखिका- मृदुला प्रभुराम जोशी
प्रकाशक- राजा दिनकर केळकर म्युझियम
कमल कुंज १३७७-७८,
शुक्रवार पेठ, नातू बाग, पुणे४११०००२
पृष्ठ १५०, मूल्य ५०० रुपये
(आपलं महानगर मधून साभार -संपादक)

✳


# MEDICOFITS

MEDICOFITS

**WE "MEDICOFITS" ARE ONE OF THE LEADERS IN SUPPLY SALES & SERVICING OF ALL TYPES OF MEDICAL EQUIPMENT & INSTRUMENTS. (SPECIALITY - IN CARDIAC SONOGRAPHYT RESPIRATERY PRODUCTS)**

*OUR PRODUCT PROFILE:*

**✳ ECG MACHINE ✳ CARDIART MONITOR ✳ DEFBRILATOR**
**✳ OXYGEN CONCENTRATOR ✳ PULSE OXIMETER ✳ PESPIRATORY SYSTEMS.**
**✳ CENTRAL NURSING STATION ✳ STRESS TEST MACHINE**

**AND ALL CONSUMER PRODUCT ECG ROLLS, ECG - JELLY. SONO JELLY, PATIENTCABLE, CLAMP SET, B. P APPARTUS. ACCUCHEK ACTIVE STRIPS.**

*CONTACT US :* Office No.. 26707100 / 26244141.
1) MR. Ashok Patil Mob:- 9869109580 (PRUP)
2) MR. Mihir Dhurandhar Mob:- 9821379803 / 9821379803 (Agent)

Regd.Office: Khazana's Commercial Unit No. 2, Behind New Ashirwad Bldg., Shantawadi, J. P. Road, Andheri (W), Mumbai - 400 058.
Tel. : 91-22-2670 7100 Telefax : 91-22-2624 4141

# यक्षप्रश्न

**✶ सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर ✶**

जयवंत आणि यशवंत हॉलमध्ये पेपर वाचत बसले होते. उमा आणि सुमाही घरकामातून थोड्या मोकळ्या झाल्या होत्या. हाश्श हुश्श करीत त्या हॉलमध्ये आल्या. तेवढ्यात दारावरची बेल वाजली.

उमानं पुढे होऊन दार उघडलं. दारात शेजारच्या मालतीबाई उभ्या होत्या.

'या मालतीबाई' उमानं त्यांचं स्वागत केलं

दारातच उभं राहून परत घरात इकडे तिकडे नजर फिरवीत त्या म्हणाल्या, 'उमाताई, तुमच्याशी जरा बोलायचं होतं.' एवढं बोलतांना त्या संकोचत होत्या.

'अहो, आधी आत तर या. आरामात बसून बोलू की!' उमा हसून कोचाकडे हात दाखवीत म्हणाली.

मालतीबाई आत आल्या. कोचावर जरा अवघडतच बसत त्यांनी विचारले, 'तुम्हाला वेळ आहे ना?'

'हो, हो. भरपूर वेळ आहे.'

बायकांच्या गप्पांमध्ये आपण नको म्हणून जयवंत व यशवंत दोघेही उठले.

ते बघून मालतीबाई म्हणाल्या, 'अं... तुम्हीही थांबा इथंच. मला तुम्हा सगळ्यांचाच सल्ला हवाय.'

जयवंत व यशवंत पुन्हा समोरच्या कोचावर बसले

'काय सांगायचं? अगदी मोकळेपणानं बोला. आम्हाला खरंच आता बोलायला खूप वेळ आहे.' उमाताईंच मालतीबाईंच्या अस्वस्थतेनं खूप अस्वस्थ होऊन म्हणाल्या. ..'अविची मुलं शाळेत गेली नी आमची सून नोकरीवर गेली. अविसुद्धा ऑफिसला जायला निघेलच आता...'

उमाचं बोलणं पुरे होतंय ना होतंय तोपर्यंत अविनाश बाहेर आला. जयवंत, यशवंत, उमा नि सुमा ह्या सर्वांना त्यानं खाली वाकून नमस्कार केला. चौघांचेही हात सवयीनं अविच्या डोक्यावर आशीर्वाद देण्यासाठी क्षणार्ध स्थिरावले.

मालतीबाई ते दृश्य अनिमिष नेत्रांनी बघत होत्या नी डोळ्यात साठवीत होत्या. त्यांच्या डोळ्यातून आश्चर्य पुरेपूर ओसंडून वाहत होते.

'मालतीकाकू नमस्कार करतो हं..' असं म्हणत अविनाश मालतीबाईंच्या पायांशी वाकला.

मालतीबाई गडबडल्या. त्यांना अशा गोष्टींची सवय नव्हती. काय आशीर्वाद द्यावा हेच त्यांना कळेना. त्यांनी कसाबसा आपला थरथरता हात त्याच्या डोक्यावर ठेवला.

अविनाशनं हसत सर्वांकडे बघितलं नी म्हणाला, 'मी येतो हं. आज यायला थोडा उशीर होईल. परदेशी टीम आलीय त्यांच्याबरोबर महत्त्वाची मीटिंग आहे.' असं म्हणत बाहेर पडणाऱ्या अविनाशच्या मनात घरच्या चौघांची नी मालतीबाईंची तुलना डोकावली.

घरचा आशीर्वाद आश्वासक होता-

तर...मालतीबाईंचा आशीर्वाद नि:श्वास सोडत होता. ज्या नि:श्वासामध्ये उसासे जास्त प्रमाणात होते.

घरचा आशीर्वाद ठाम, भक्कम आधाराचा होता....

पण मालतीकाकूंचा आशीर्वादाचा हात मात्र खूप अस्थिर, साशंक नी डळमळीत वाटला त्याला...

अविनाश ऑफिसला निघून गेला. जाताना त्यानं दार ओढून घेतलं.

'हं आता बोला.' उमा ऐसपैस बसत म्हणाली.

मालतीबाई अजून आश्चर्याच्या धक्क्यातून बाहेर आल्या नव्हत्या. तशाच मन:स्थितीत त्यांनी विचारलं, 'अवि तुम्हाला नमस्कार का करून गेला? त्याचा वाढदिवस वगैरे आहे का? खरं तर हे मी अवि घरात असतानाच विचारायला हवं होतं; नाही? त्याला शुभेच्छाही दिल्या नाहीत मी..'

सुमा हसत म्हणाली, 'नाही हो, तो रोजच आम्हाला सगळ्यांना नमस्कार करूनच ऑफीसला जातो.'

हे ऐकताच मालतीबाईंचे डोळे विस्फारले गेले... ते बराच वेळ तसेच राहिले.

त्याच मन:स्थितीत त्या म्हणाल्या, 'खरंच! तुमचं घर म्हणजे एक आदर्श घर आहे. सर्वच जण सुसंस्कारीत आहेत. किती गुणवान आहे हो तुमचा मुलगा.'

मालतीबाई बराच वेळ अविचंच गुणगान करीत होत्या.

थोड्या वेळानं उसासे टाकीत त्या म्हणाल्या, 'आमच्या घरी उलटीच गंगा वाहतेय.'

'म्हणजे?' उमानं मालतीबाईंच्या संभाषणाची गाडी रुळावर आणण्यासाठी विचारलं.

'अहो, तुमच्याकडे जयवंतरावांची बहीण नी तिचे यजमान कसे अगदी तुमच्या घरात मिसळून गेलेत. जयवंतराव नी यशवंतराव सख्खे भाऊच वाटतात. नी तुम्ही आणि सुमाताईंच नातं नणंदभावजयीचं नातं नसून सख्ख्या बहिणींचंच नातं वाटतंय. नाहीतर आमच्याकडे अनिल नी त्याची बायको माझ्या उषाला अगदी पाण्यात बघतात. प्रत्येक वेळी ती आली की परत जाताना तिच्या हातातल्या बॅगेकडे अनिलची बायको म्हणजे आमची सून हो- अगदी डोळे वटारून बघत असते. तुमच्यासारखं भावा-बहिणीचं प्रेम अगदी दुर्मीळच होत चाललंय अलीकडे. मोठ्यांना विरोध करणं तर बाजूलाच राहिलं. उलट किती मान देतो तुमचा अवि! तुमची नातवंडसुद्धा तशीच असणार! तुमचा नातू संध्या वगैरे करीत असेल नाही?'

मालतीबाई बरंच काही बोलत होत्या.

पण कुणाचंच लक्ष त्यांच्या बोलण्याकडे लागेना.

त्यांना कालची संध्याकाळ आठवली.

संध्याकाळी अमोघनं-त्यांच्या नातवानं स्वत:चं वेगळंच रूप प्रकट केलं होतं.

अमोघ संध्याकाळी नेहमीप्रमाणे खाली खेळायला गेला नाही. म्हणून सहजच यशवंतरावांनी विचारलं-

'का रे? आज खेळायला गेला नाहीस?'

'नाही गेलो.' तुटक उत्तर आलं.

'का?' यशवंतरावांनी आश्चर्याने विचारलं,

'तुम्ही कोण मला हे विचारणारे?'...

कधीही मोठ्यांसमोर वावगे न वागणाऱ्या, न बोलणाऱ्या अकरा वर्षांच्या अमोघचा हा प्रश्न सगळ्यांचंच काळीज चिरत गेला...

'अमोऽऽघ!' जयवंतरावांनी दटावलं. 'अरे काय बोलतोयस हे? ते काय कुणी परके आहेत का?'

'हो, परकेच आहेत. माझ्या मित्रांच्या घरी फक्त मित्र, त्यांचे भाऊबहीण नी आईबाबा राहतात. मला सांगा आजोबा; हे बाबांच्या आत्याचे यजमान नं? मग हे नी आत्या आपल्या घरी का राहतायत?'

हे ऐकून यशवंत नी सुमा दोघांच्याही डोळ्यांत पाणी आलं. त्यांना फार फार वाईट वाटलं... त्यांना मूलबाळ नाही म्हणून त्यांनी अवीला मुलगा मानून त्याच्यासाठी ते झटले. त्याचा मुलगा म्हणजे स्वत:चाच नातू समजून त्याच्यावर मायेचा वर्षाव करीत राहिले..

'अमोघ तुला काय करायचंय? इथं कुणी राहावं नी कुणी नाही हे आम्ही ठरवू' जयवंतरावांचा पारा चढला होता.

'एवढा मोठा झालास तर भलतेच पंख फुटतायत तुला!'

'ते इथं राहताहेत म्हणून मला स्वतंत्र रूम मिळत नाहीय. आणि ही नेहा... मी माझी रुम हिच्याबरोबर मुळीच शेअर करणार नाही. तुम्ही कमीत कमी सहा खोल्यांचा तरी फ्लॅट घ्यायचा. मी एकुलता एक असतो तर किती बरं झालं असतं. अगदी माझ्या बाबांसारखं.'

'करायचीच काय तुला स्वतंत्र खोली? किती लहान आहेस तू'

'अरेच्चा, आत्ताच तर म्हणालात की मी मोठा झालोय तरी असं का बोलतोय- नी आता म्हणताय की लहान आहे म्हणून? मी मोठा झालोय. मलाही माझी मत आहेत. हॉलला का हा घाण निळा रंग दिलाय? घरातल्या कुठल्याच खोलीचा रंग मला

## रुमाल

त्याने तिला एक रुमाल दिला भेट म्हणून
ती म्हणाली, 'रुमाल देणं, नसतो चांगला शकुन'
तो म्हणाला, 'समजू नको त्याला रुमाल,
हाफपँट त्याची शिव, जशी घातली होतीस काल.'

**-डॉ. सुमन नवलकर**

मुळीच आवडत नाहीय.'

'का? निळा रंग वाईट आहे का?'

'हो. माझ्या मित्रांच्या घरी खूप वेगळे-अगदी सिनेमातल्या घरामध्ये दाखवतात तसे सुंदर सुंदर रंग आहेत. आणि घर घेतलंत ते ह्या आठ मजली बिल्डिंगमध्ये काय घेतलंत? मस्त सत्तावीस अठ्ठावीस मजल्यांच्या नव्या कोऱ्या टॉवरमध्ये घ्यायचं नं! आता तुमची ती नेहमीच रेकॉर्ड- 'आम्ही चाळीत राहायचो पूर्वी. आमच्या हिंमतीवर आम्ही घेतलाय हा फ्लॅट.' नका वाजवू. माझ्या बाबांना त्यांच्या लहानपणी तुम्ही काहीही देऊ शकला नाहीत. ते राहिले असतील छोट्याशा जागेत. जगले असतील अपुऱ्या पैशात. पण मी नाही तसं कसंही जगणार. ह्या घरात जुन्या घरातलं फर्निचर का आणलंत? नवीन करायचं नं? बाबांची मोटारसुद्धा किती जुनी झालीय!' असं म्हणत त्यानं अविकडे मोर्चा वळविला.

लाडक्या लेकाची ही मुक्ताफळं ऐकून तोसुद्धा हवालदिल झाला होता....

अमोघ म्हणत होता, 'बाबा, तुम्ही दुसरी नवीन गाडी घ्या. ही काढून टाका... नाहीतर असं करा... ही मोटार तुम्हालाच ठेवा. मला नवीन घेऊन द्या.'

'तुला नवीन मोटार?' अविनं कसंबसं विचारलं.

'हो. अमोघचे वाग्बाण सुरू झाले. 'माझ्या शाळेतली खूप मुलं त्याच्या स्वतंत्र मोटारीनं येतात. त्यांच्यासाठी वेगळा ड्रायव्हर असतो. त्यांचे बाबा वेगळी मोटार वापरतात. आणि त्यांच्यासाठीसुद्धा वेगळा ड्रायव्हर असतो. तुमच्यासारखे ते नाहीत. काय तुम्ही स्वत:च गाडी चालवता? शी... लाज वाटते मला. काही मित्रांच्याकडे तर त्यांच्या आईसाठीसुद्धा वेगळी मोटार आहे. आणि हो! माझ्यासाठी स्वतंत्र टी.व्ही आणि लॅपटॉप घेऊन द्या. शिवाय मला हा फडतूस मोबाईल नकोच. आयफोन फाईव्ह हवाय मला...'

सगळं बोलणं सहन न होऊन उमा म्हणाली, 'हे बघ अमोघ, आम्हाला नी तुझ्या बाबांनाही आहे हेच परवडतं. तू खूप शीक. मोठा हो आणि मग काय हवं ते घे. आमचा अवि अजून आम्हाला नमस्कार करूनच ऑफिसला जातो. रोज संध्या करतो...'

'जग कुठं चाललंय नी तुम्ही अजून जुन्या जगातच कुठे राहताय? संध्या करणं? ते ही आजच्या जमान्यात? काय मिळतं असे नमस्कार करून? नुसत्या आशीर्वादानं पैसा नाही ना मिळत? बाबांना परवडत नाही तर त्यांना जास्त काम करायला सांग. जास्त पैसे मिळवायला सांग. माझ्या मित्रांचे आजोबासुद्धा खूप श्रीमंत आहेत.' अमोघची मुक्ताफळं चहुबाजूंनी उधळतच होती.

'अरे, पण तू स्वत: पैसा मिळवलास तर ते जास्त चांगलं नाही का?' उमा करवादली.

'ते मी करीनच. पण आता तुम्हीच सगळ्यांनी मला जे हवं ते द्यायलाच हवं. इतरांचे बाबा कसे लाखो करोडो मिळवतात. नी मुलांना हवं ते ताबडतोब देतात.'

हे सगळं अमोघला त्याच्या इंटरनॅशनल स्कूलच्या मित्रांनी शिकवलं? की व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्लासमध्ये त्याला हे दिव्य ज्ञान प्राप्त झालं?'

सोशल नेटवर्किंग साईटस्वरच्या मित्रांचा तर हा प्रभाव नाही?

ह्या विचारांनी सगळेच गलबलले. वेगळ्याच अर्थानं अमोघचा व्यक्तिमत्व विकास होत होता. तोही खूपच. तोसुद्धा वेगळ्याच अर्थानं.

एका क्षणात त्या सगळ्या वडिलधाऱ्यांचं नी अविचंसुद्धा सगळं भावविश्वच उध्वस्त झालं होतं. त्यांना त्यांच्या घरच्या संस्कारांचा शिकवणुकीचा नी अविचासुद्धा जो अभिमान होता, तो पार गळून पडला होता. दोन पिढ्यांमधलं अंतर आता दरीएवढं होत चाललं होतं.

आपले संस्कार एवढे तकलादू कसे ठरले?

की ते चुकीचेच होते?

हा यक्षप्रश्न त्यांना आता सतावू लागला.

आता मालतीबाईंशी बोलताना त्या सगळ्यांच्याच मनात ही कालची प्रश्नोत्तरं सारखी गुंजत होती.

त्यामुळे आता मालतीबाईंच्या स्तुतीनं त्या सगळ्यांना कसंसंच झालं. काय बोलावं ते त्यांना

---

## फोन

लँडलाईन बसलीय कोपऱ्यात रूसून,
मोबाईलवर जो तो बोलतोय हसून,
लँडलाईन म्हणते, 'याचं नेटवर्क जाईल
तेव्हाच याला माझी आठवण होईल.'

**-डॉ. सुमन नवलकर**

कुणालाच सुचेना.

मालतीबाईंना घरातली परिस्थिती सांगून मोकळं व्हावं?

पण त्यामुळे त्यांच्या डोळ्यात उमटणारी आपल्याबद्दलची कीव सहन होईल आपल्याला? आणि घरातली लक्तरं घरातच धुवावीत ह्या आपल्या मनावरच्या संस्कारांचं काय करायचं?

संस्कार विसरून मनावरंच ओझं मालतीबाईंना सर्व सांगून टाकून हलकं करावं?

की चेहऱ्यावर बेगडी हास्याचा खोटा मुखवटा धारण करून आपल्याला मिळणारं खोटं मोठेपण मिळवून त्या मायाजालातच आपण गुरफुटून राहावं?

असे अनेक यक्षप्रश्न त्यांना पडले.

मालतीबाई काय सांगायला आल्या होत्या ते ऐकण्याच्याही मन:स्थितीत कुणीच नव्हतं.

बाहेर सकाळचं सुंदर कोवळं सोनेरीपण विलसत होतं.

पण त्या सगळ्यांच्या मनात मात्र कुंद रात्रीचा काळोख पसरला होता.

अमोघच्या मनाचा उद्रेक हा फक्त पौगंडावस्थेचा, ह्या पिढीचा वेगळाच उद्‌गार होता. तो सुद्धा खूपच जास्त?

खरंच का झालं असं? हा यक्षप्रश्न खूप मोठा होत त्यांना नव्यानं सतावू लागला.

---

# हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



लेख

# माझी माय, माझी शाळा

**✶ मृदुला प्रभुराम जोशी ✶**

गेल्या वर्षी म्हणजे ३१ जानेवारी २०१० रोजी आम्ही सर्वजण आपल्या शाळेत जमलो होतो. निमित्त होतं ते म्हणजे आमच्या १०६० सालच्या एस.एस.सी. तुकडीचा सुवर्णमहोत्सव. आमच्यापैकी कित्येक जणी शाळा सोडल्यानंतर अक्षरश: ५० वर्षांनी पुन्हा भेटत होत्या. साहजिकच सर्वांचं लक्ष आमच्या वेळच्या शाळेच्या इमारतीकडे गेले. राजा शिवाजी विद्यासंकुलात ती इमारत अजूनही उभी आहे, पण आता कुठलीतरी दुसरीच शाळा तिथे भरते. त्यामुळे आम्हाला त्या इमारतीत जाता आलं नाही. पण जवळजवळ प्रत्येकीनं मनानं त्या आमच्या ५० वर्षांपूर्वीच्या शाळेत प्रवेश केला होता...

आमची ती शाळा म्हणजे इंडियन एज्युकेशन सोसायटीचे गर्ल्स स्कूल नं.२. समोरच मुलांची शाळा म्हणजे किंग जॉर्ज बॉईज स्कूल. मध्ये प्रचंड मोठं मैदान. त्या मैदानात आम्ही सर्वांनी मनसोक्त खेळून घेतलेलं आहे. तिथेच हुतूतू म्हणजे आजची कबड्डी खेळतखेळत शाळेनं कित्येक मोठमोठे खेळाडू महाराष्ट्राला आणि देशाला बहाल केलेले आहेत. आमच्या वेळच्या काही नामवंत कबड्डीपटू म्हणजे उषा शाहाडे, किशोरी कामत, क्रांती आणि चित्रा नाबर ह्या भगिनी आणि इतर कितीतरी. पुढे शिवछत्रपती आणि तत्सम पुरस्कार मिळवणाऱ्या कितीतरी जणींचा पहिला सराव ह्याच शाळेच्या मैदानावर झालेला आहे. क्रीडाक्षेत्राच्या बॅडमिंटन, टेनिस, डॉजबॉल इ. वेगवेगळ्या शाखांत प्राविण्य मिळवणाऱ्या अनेक मुलींची पहिली पावलं याच मैदानावर उमटलेली आहेत. नुसते मैदानी खेळच नव्हे तर; बुद्धिबळासारख्या बैठ्या खेळांनाही त्या शाळेत प्रोत्साहन मिळायचं.

आपण शाळेत येतो ते शिकायला. पण शिकणं म्हणजे नुसतं वर्गात बसून पुस्तकातले धडे वाचायचे आणि शिक्षक फळ्यावर जे काही लिहितील ते उतरवून घेऊन पुढे त्याची घोकंपट्टी करायची आणि परीक्षेत जास्तीत जास्त मार्क मिळवून वरचा नंबर मिळवायचा एवढंच ध्येय असू शकत नाही, हे आमच्या शाळेनं आमच्या मनावर चांगलंच बिंबवलं. अभ्यास तर करायलाच हवा. पण त्याबरोबरच स्वत:चं व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यासाठी खेळ, संगीत, चित्रकला, वाचन, वक्तृत्व, अभिनय यांची ही जोड द्यायला हवी हे शाळेनंच आमच्या लक्षात आणून दिलं. त्यासाठी शाळेनंच अनेक अभिनव उपक्रमही राबवले. आम्हाला गायन शिकवण्यासाठी विद्यागौरी साठे ह्या नावाजलेल्या आकाशवाणी कलावंत होत्या. चित्रकलेच्या परीक्षा देण्यासाठी अभ्यासवर्ग चालवणाऱ्या स्वत: उत्कृष्ट चित्रकार असलेल्या बाकरेबाई होत्या. ज्यांना वाचनाची आवड असेल त्यांच्यासाठी सुसज्ज ग्रंथालयाची दारं सताड उघडी ठेवणाऱ्या रेगेबाई होत्या. माझ्या स्वत:च्या मनावर वाचनाचा सखोल संस्कार ह्या रेगेबाईंनीच घडवून आणला. आमच्या पाठ्यपुस्तकात समजा गंगाधर गाडगीळ किंवा अनंत काणेकर यांचा धडा असला तर तो धडा ज्या पुस्तकातून काढलेला आहे ते मूळ पुस्तक तर मिळवून वाचायचंच; पण त्याचबरोबर त्या लेखकाची उपलब्ध असलेली इतर सर्व पुस्तकंही वाचायची हे रेगेबाईंनीच मला समजावून सांगितलं. नुसतं सांगितलंच नाही तर; कुठलंही नवीन पुस्तक शाळेच्या लायब्ररीत आलं की त्या मला मुद्दाम निरोप पाठवून बोलावून घ्यायच्या आणि वाचायला द्यायच्या. या पद्धतीनं अकरावीपर्यंत मी शाळेतल्या जवळजवळ सगळ्या पुस्तकांचा फडशा पाडलेला होता.

आपल्या शाळेच्या मुलींनी सर्वगुणसंपन्न व्हावं असा त्या वेळच्या बहुतेक सर्वच शिक्षकांचा ध्यास होता.

त्यामुळेच आज ५० वर्षं झाली तरी आम्ही त्या शिक्षक-शिक्षिकांना विसरू शकत नाही. मराठीच्या घोलपबाई, संस्कृतच्या गुप्तेबाई, इतिहासाच्या प्रधानबाई, गणिताचे मोघेसर, सायन्सचे महाजनसर, इंग्रजीच्या वैद्यबाई, कुळकर्णीबाई, खुलगे(बडवे) बाई अशा अनेकांनी स्वत:च्या वर्तनातून आणि अध्यापनातून आमच्यासमोर आदर्श उभे केले. या सर्वांमुळेच आम्हाला शाळेचाही लळा लागला आणि ही आमची शाळा असं अभिमानानं सांगण्यात धन्यता वाटू लागली.

बाकी काहीही असलं तरी शाळेचंजे प्रमुख काम ते म्हणजे 'शिक्षण' आणि ते उत्तम रीतीनं देण्यात शाळेनं काहीच कसूर ठेवली नाही. दर्जेदार शिक्षण मिळणार ते ह्याच शाळेत असा आणि एवढा नावलैकिक ह्या शाळेनं प्राप्त केला होता की उत्तरेला सायन कुर्ल्यापासून दक्षिणेला परळ-लालबाग-भायखळ्यापर्यंतच्या पट्ट्यातल्या सर्व मध्यमवर्गीयांच्या मुली आपल्याच शाळेत यायच्या. दादर पूर्वची हिंदू कॉलनी आणि पश्चिमेचा शिवाजी पार्क यांच्या रहिवाशांना तर हीहक्काचीच शाळा. अगदी घरचीच शाळा होती. त्यामुळे इथे येणाऱ्या सर्व मुली अभ्यासू, सुसंस्कृत असायच्या आणि त्याचं प्रतिबिंब शाळेतल्या वातावरणावर उमटायचं.

अभ्यासात उच्च गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या कितीतरी मुली आमच्या आगेमागे असायच्या. एस.एस.सी.ला गुणवत्ता यादीत येणाऱ्या मुली शाळेला भूषण असायच्या. आमच्या वेळची आठवणारी काही नावं म्हणजे मंगला राजवाडे (आता डॉ. मंगला जयंत नारळीकर), पद्मजा गोडबोले, वीणा खांडेकर, निर्मला आगाशे, शोभा करमरकर इ.

वर्षभर चालणाऱ्या निरनिराळ्या आंतरशालेय स्पर्धांतून भाग घेण्यासाठीही शाळेकडून उत्तेजन मिळायचं. वक्तृत्वात चमकणारे कितीतरी मोहरे आमच्या शाळेचेच असायचे. आमच्यावेळी विजया दातार, शोभा वैद्य ठिकठिकाणी पारितोषिकं मिळवायच्या आणि आमचीच कॉलर ताठ व्हायची. शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आमच्यातल्या सर्व गुणांना वाव मिळायचा. नाटकातले प्रवेश, नृत्यं, आल्या आणि चमकल्या. आमच्या समकालीन राजश्री व्ही. शांताराम, भारती मालवणकर, माणिक देशपांडे, अशा अनेक जणी. यांच्या कलागुणांना प्रकाशात आणण्याचं काम विमल नेरूरकर, कांचन चुरी अशा शिक्षिका करायच्या. लीला घोलपबाईंही प्रोत्साहन देण्यात पुढे असायच्या.

ह्या सर्व घडामोडींमागे एक प्रेरक शक्ती होती. ती म्हणजे नवलकरबाई. त्या स्वत: थोड्याशा अबोल आणि कठोर शिस्तीच्या होत्या, पण आपल्या शाळेतल्या मुलींी सर्व क्षेत्रात चमकावं असाच त्यांचा ध्यास असावा. किंबहुना त्यामुळेच ही शाळा त्या काळात 'नवलकरबाईंची शाळा' म्हणूनच ओळखली जात असे. त्यांच्या ह्या ध्यासाचा ठसा संपूर्ण शाळेवर पडलेला होता.

आजही 'आमची शाळा' असं म्हटलं की हृदय भरून येतं ते त्यामुळेच. पुढच्या आयुष्यात आमच्यापैकी अनेकींनी मोठी मोठी क्षेत्र पादक्रांत केली. दिगंत कीर्तीमिळवली. तरीसुद्धा शाळेनं 'माजी विद्यार्थिनीच्या मेळाव्याला या' म्हणून निमंत्रण दिलं की माहेरच्या ओढीनं धावत सुटावं तशी पावलं वेगानं शाळेच्या दिशेनं पडू लागतात.

## हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



# विचारांना खाद्य!

★ सतीश शामराव मोरेश्वर कोठारे ★

आपला समाज पुरुषप्रधान समजला जातो. तरीही भाषेस मातृभाषा किंवा मायबोली असे का म्हणतात? इंग्रजीतही मदरटंग असाच शब्द आहे. कोणताहीअर्ज भरताना मातृभाषा कोणती, हे लिहावे लागते.

याबाबतीत आमच्या कुटुंबात डोकावल्यास अनेक गंमती आढळतात. माझी विवाहित मुलगी जरी इंग्रजी माध्यमात शिकलेली असली तरी मातृभाषा या अर्जातील शब्दापुढे मराठी हाच शब्द लिही. तिच्या नवऱ्याची मूळ मायबोली गढवाली आहे. दोघेही इंग्रजी माध्यमात शिकलेले असून उच्चशिक्षित आहेत. त्यांची मुलगी, म्हणजे माझी नात हीही इंग्रजी माध्यमात शिकत असली तरी तिला मराठी अवगत आहे. इंग्रजी व हिंदी अशा संमिश्र भाषेत घरीदारी बोलणारी ही मुलगी मातृभाषा या अर्जातील शब्दापुढे मात्र हिंदी हाच शब्द लिहिते. माझ्या भावाच्या जावयाची मायबोली कोकणी व बायकोची म्हणजे माझ्या पुतणीची मायबोली मराठी. त्यांचा मुलगा शाळेत इंग्रजी व घरी हिंदीत बोलतो. मोठेपणी तोही बहुधा अर्जात मातृभाषा या शब्दापुढे हिंदीच लिहिणार. माझ्या बहिणीचा जावई सिंधी भाषिक असून माझ्या भाचीने सिंधी उत्तमरित्या आत्मसात केलेली आहे. मात्र त्यांची मुले सिंधी किंवा मराठी मातृभाषा न मानता इंग्रजी असेच लिहीतात. माझा भाचा अमेरिकेस असतो. नवराबायको दोघेही पाठारेप्रभु! ते स्वत:ची मातृभाषा मराठी मानत असले तरी त्यांची मुले पुढे अर्जासाठी इंग्रजी हाच शब्द वापरतील. या मुलांना शाळेत स्पॅनिश भाषाही असते. (काही ठिकाणी जापनीज् चायनीज येऊ घातल्या आहेत.) आतेभावंडांबरोबर, आजीआजोबांबरोबर इंग्रजी व स्पॅनिश भाषेत ते संवाद साधतात. मराठीशी त्यांचे सख्य जुळणे कठीणच दिसते. काही अमेरिकास्थित मंडळी आवर्जून मुलांना मराठी शिकवतात. नाही असे नाही. परंतु अपवादात्मक व्यक्ती सोडल्यास पुढील पिढीची मातृभाषा मराठी असणे कठीणच वाटते.

एकदा गृहसंकुलाच्या एका वार्षिक सभेत चेअरमन म्हणून भाषण करण्याचा प्रसंग माझ्यावर ओढवला. माझे भाषण इंग्रजीत सुरू होताच 'मराठीत बोला,' असा ओरडा सुरू झाला. १६५ सदस्यांपैकी ६५ ते ७० सदस्य अमराठी! त्यांना माझे मराठी कसे समजावे? खरे तर हिंदीच योग्य ठरले असते. आपण रिक्षावाल्यांशी हिंदीतच बोलतो नं? 'मेजॉरटी रुल्स' या नियमाप्रमाणे अखेर मला मराठीतच भाषण करावे लागले. खरे तर महाराष्ट्राबाहेर अनेक वर्षे नोकरीनिमित्त राहिल्याने माझे हिंदी मराठीपेक्षा बरे असावे.

मराठी भाषा पावला पावलागणिक बदलते. नवीन माणसाचे मराठी ऐकून सारेच हसतात (टी.व्ही.वरील जाहिरातीतल्या मराठीत तर अनेक विनोद निर्माण होतात. परंतु हे विषयांतर परत कधीतरी) आमच्या बंबैय्या हिंदीला आमची ग्वाल्हेरची आत्या नेहमीच हसत असे. आम्ही वडिलांच्या बदलीमुळे प्रथमच नागपूरला गेलो तेव्हाची एक आठवण आहे- चक्क नागपुरी मराठी into मराठी असे शब्दकोश पुस्तक मी विकत घेतले होते. त्यातील 'म्या तुले का म्हनले' 'तू मले आनिक एक गनित सांगट, तोहा तोंडामंदी का आहे?' अशी वाक्ये वाचून आम्ही भावंडे खदखदून (की खळखळून) हसल्याचे आजही आठवते.

भाषावार प्रांतरचना होण्यापूर्वी बराच उहापोह झाला होता. संयुक्त महाराष्ट्राची क्रांती घडली. नागपूरचे हुतात्मा रानडेही त्यात सामील होते. तरीही बेळगाव, कारवार राजकारण अद्यापही चालू आहेच. बालाघाट, सिवनी वगैरेसारख्या इंग्रजी, मराठी बहुभाषिक बांधवांची कोणालाच आठवण येत नाही. गोव्याची मूळ भाषा कोकणी! महाडपासून मंगळूरपर्यंत कोकणी भाषा आहे. गोवा हे स्वतंत्र राज्य का? महाराष्ट्रात का नसावे?

सोईस्कर राजकारण हे उत्तर असावे बहुधा.

पूर्वी टी.व्ही. नव्हता. आज सह्याद्री, ई टीव्ही. झी मराठी, मी मराठी, साम मराठी वगैरे अनेक वाहिन्या मराठीस वाहिलेल्या आहेत. बातम्या, डेली सोप्स्, पार्लमेंटमधील धिंगाणे या सर्व कार्यक्रमात तोचतोचपणा जाणवतो. एखादी वाहिनी प्रादेशिक सांस्कृतिक कार्यक्रम दाखविण्याचा प्रयत्न करतेही. परंतु तिला टीआरपी मिळत नाही.

नागपूरसारख्या अनेक इतर शहरातही हिंदीचे वर्चस्व आहे. पुलापलीकडील व पुलाअलिकडील असे भाषेचे वेगळेपणही तीत आहे. टी.व्ही. वाहिन्यांना मराठी प्रेमापेक्षा टीआरपी ची चिंता ग्रासते आहे असे वाटते. दहीहंडी, गणेशोत्सव, आषाढी एकादशी यासारखे कार्यक्रम दाखविताना राजकारण्यांची लुडबुड कशाला? मराठीबद्दल निखळ प्रेम हवे नाही का? माधुरी दिक्षित नेनेसारखी अभिनेत्री अद्याप मराठी मालिकात का नाही? मराठी जाहिरातीत तर ती असते. अर्थात हे फक्त उदाहरणादाखल. मराठीचा आटापिटा करणारे लोक वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी म्हणजेच राजकारण्यांना खूष ठेवण्यासाठी सारे करतात अशी शंका डोकावते.

शेवटी भाषा हे विचारांचे आदानप्रदान करण्याचे एक साधन आहे. महाराष्ट्राबाहेर पडल्यावर दुकानावरील पाट्या बघून प्रश्न पडतो, आपण खरेच मराठीच्या प्रेमापोटी पाटया बदलायला लावतो? उगीचच मराठीचे स्तोम तर माजवत नाही? केवळ 'बाँबे' चे मुंबई झाल्याने जनमानसात मराठीचे स्थान खरेच वाढले आहे का? परदेशी पर्यटकांना मुंबईतील मराठी पाट्यांपेक्षा इंग्रजी जास्त भावतील? कोणत्याच भाषेविषयी आकस न बाळगता केवळ विचारांना चालना देणे, खाद्य पुरविणे इतकाच ह्या लेखाचा उद्देश आहे. आपल्यासारखेच, राजकारणी लोकही स्वत:च्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालून परदेशी पाठवतात हे सत्य आहे. सक्तीच्या हिंदीचा आग्रह धरला तर सर्वांचाच देशाभिमान वाढणार नाही का? मग मायबोली कुठलीही असेना का? इंग्रजी व मराठीला स्थान देणारा 'प्रभुतरुण' हिंदीलाही स्थान देईल अशी आशा व्यक्त करून हा भाषेचा फास्ट फूड स्टॉल बंद करतो. शुक्रिया!

# हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



लेख

# Un-Fair and Not-so-Lovely

✶ NATASHA TRILOKEKAR ✶

'बरं बरं' म्हणून जयसिंगरावांनी फोन बंद केला आणि स्वत:शीच पुटपुटत बाहेर पडले. चर्चा करायची आहे काय? साल्या तुला उसाच्या चरकात नाही घातला तर नावाचा जयसिंगराव दीक्षित नाव नाही सांगणार. समजलास? तुला दुर्गेची कृपा आहे तर मला चंडीकेचा वरदहस्त आहे. असं म्हणत ताड ताड पाय वाजवत बाहेर पडले आणि मोहितेना बँकेत पाठवून त्या मॅनेजर गुणाजी मिसाळ गेली कित्येक वर्षे ह्याच बँकेत आहे आणि पैशाची बेमालूम अफरातफर घोटाळे बेमालूम करत असे. तेव्हा त्याची चौकशी पोलिसीपद्धतीने न करता एक बनावट ठेवीदार म्हणून जाऊन करण्यास सांगितले. कारण मोहिते ह्या कामात चांगलाच मुरला होता. आणि मोर्चा टेंपोकडे वळवला. त्या टेंपोवरचे नाव पाहून ते चांगलेच हबकले. म्हणजे मघाशी फोन आला तो ह्या दुर्गेश पाटलाचा तर. साल्या आता बघतो तुला. 'मोरे लॉकअपचे दार उघड! आणि माझ्या घरी कुणी टेंपो पाठवला? हे सांगितलं का?'

'नाही साहेब पण हा दुर्गेश पाटलाच टेंपो आहे कारण ह्या पाटलाचे ट्रक्स टेंपो सर्विस आहे गावात. दुसऱ्या कुठल्याच टेंपोवाल्यांना काम मिळत नाही. आणि मिळालंच तर मालासकट टेंपो जाळून टाकतो पण मला कुणी पाठवला हे सांगण्यास मात्र नकार दिला. खूप मारलं पण तोंड उघडायला तयार नाहीत.'

'अरे मग असं कर. आपला पोलिसी पाहुणचार दे आणि सोडून दे.'

संध्याकाळ होत आली होती. थंडीचे दिवस असल्यामुळे काळोख लवकर पडायला लागला व थंड वारे व धुरकट वातावरण पसरलं होतं. आजुबाजूबच्या शेतात राब जाळल्याचा वास व धूर सर्वत्र पसरला होता. जयसिंगराव व मोहिते फार थकून आले होते.

'कोण आहे रे तिथे? पाणी आणा आणि चहा सांगा, मोरे, सावंत बरीच माहिती उजेडात येणार असं दिसते.' त्या दुर्गेशची पाळेमुळे म्हणे फार खोलवर गेल्यात आणि त्या अनाथ महिला आश्रमाच्या संचालिका, काय बरं तिचं नाव मोहिते?'

'यस सर.'

'तिचे नाव काय मी विचारलं, विसरलात? अहो काय सुंदर दिसत होती. अहो, अशा सुंदर मुलींचं नाव विसरता? हं आता आठवलं, आशालता मोगरे. व्वा! काय छान नाव आहे. आपल्याला बुवा आवडली ती. कशी मोगऱ्याच्या घमघमाटाप्रमाणे लतेसारखी वाऱ्यावर जणू डोलतच होती.

'सर, मुद्दाम कुमारिका राहिली असेल, असे नाही वाटत? कारण तिला पाहिल्यापासून माझी तशी पक्की खात्री झाली आहे.'

'व्वा मोहिते काय विचार आहे? खरंच फार सुंदर आहे, बघा विचार करा. मी करू का प्रयत्न?'

'काय सर काहीतरीच काय, मुंबईला ती इन्स्पेक्टर मिस ब्राऊनी प्रधान आली तेव्हा पण असेच म्हणालात. मी पोलीसची नोकरीच सोडतो.'

'मोहिते, अहो मी थट्टा केली. जाऊ दे. हे बघा त्या ब्राऊनी प्रधानचे नाव काढलं म्हणून मला एक कल्पना सुचली. त्या ब्राऊनी प्रधान आणि राधाराजे यांना बोलावून घ्या आणि दोन लेडी कॉन्स्टेबलपण बोलवा'

'सर, पण त्या ब्राऊनी प्रधान आणि राधाराजे ह्यांची क्राईम ब्रँचला बदली होणार होती; असं ऐकीवात होतं. आतापर्यंत झालीपण असेल!'

'मोहिते, सायबांना फोन लावा. मी बोलतो त्यांच्याशी. त्याची बदली झाली नसेल तर उत्तमच नाहीतर त्यांना आत्ताच आपल्याकडे बोलावून घेऊ.'

आणि जयसिंगरावांनी इकडील माहिती साहेबांना सांगितली.

'साहेब त्या लॉकअपमध्ये टाकलेल्या माणसांच्या घरची मंडळी आली होती. मी सांगितले; मोठे साहेब नाहीत. मला काहीच करता येत नाही, तुम्ही उद्या या.'

'मोरे, सावंत हे बघा तो माल घेऊन कडेपठार डोंगर

आहे ना? त्याच्या पायथ्याशी म्हणे त्या खंडोबाच्या मुरळ्या आणि आजुबाजूला गरीब लोकवस्ती आहे. मला नीटसं माहीत नाही. लोकांच्या सांगण्यावरून कळले. तेव्हा तो माल तेथे नेऊन वाटून टाका आणि त्यांना सोडून द्या. तुम्हाला जाण्याची गरज नाही. ड्रायव्हर घेऊन जाईल.'

सावंत, मोरे तुम्हाला एक आनंदाची बातमी सांगणार आहे,' असे म्हणून त्यांनी मोरे व सावंत मोहितेना आपल्या खास खोलीत घेऊन गेले व बाहेर असलेल्या ड्युटीवर दोघांना सांगितले,

'हे बघा आम्ही आत चर्चा करतो. कुणालाही आत पाठवायचे नाही. कुणाचा फोन आला तरी, अर्जंट असला तरी सांगायचे, इथे कुणी नाही. समजलं? जा चहा सांगा.' असे म्हणून सर्व आत गेले.

'सावंत बहुतेक उद्या परवा त्या राजेप्रधान येतील. मी सायबांना सांगितले आहे. ते 'हो' म्हणाले, त्या आल्या की त्यांना सांगायचे की तुमची ही खाकी वर्दी उतरवा!'

'सर...काय?'

'पुढे ऐका, घाबरू नका आणि साडी ड्रेस असा पेहेराव करा. विशेष त्या ब्राऊनीला सांगा नटीसारखा मेक-अप करून झकपक राहा आणि एक लेडी कॉन्स्टेबल ब्राऊनीबरोबर आणि एक राजेबरोबर! आणि मोरे, तुम्ही आपल्या स्टाफवर नजर ठेवायची. त्यांना कुठलाही त्रास झाला नाही पाहिजे. काम थोडे रिस्की आहे. कारण त्या मोगरीचे म्हणे त्या दुर्गेश पाटलाशी चांगलेच 'लागेबांधे' आहेत. ही बाई कॉलेज मुलींना व असाह्य स्त्रियांना आपल्या जाळ्यात कामाच्या निमित्ताने ओढते व वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करते आणि एखादं प्रकरण हाताबाहेर गेले की तिला खंडोबाची मुरळी म्हणून गडावर नाहीतर कोल्हापूर, सातारा इथे सोडून देते. त्या दुर्गेश पाटलाचे फार्म हाऊस आहे तेथे ती कामाच्या निमित्ताने वरचेवर पाठवत असते म्हणे. ह्या पाटलाकडून त्या मोगरीनं म्हणे खूप पैसा जमीनजुमला, घर लुबाडलं आहे.'

असे म्हणून सर्वजण बाहेर पडले तोच मुंबईचा फोन आला. वरिष्ठ अधिकाऱ्याचा होता. पलिकडून आवाज आला, 'जयसिंगराव तुम्ही सांगितल्याप्रमाणे एक नवीन कुमक पाठवत आहे. बहुतेक खेड्यापाड्यातले सेक्स स्कँडल उजेडात येईल. काम करताना काळजी घ्या.'

'यस सर. आत्ताच त्या कामाची चर्चा करून कामं वाटून दिलीत. आता ती ब्राऊनी प्रधान आणि राधा राजे आली की पुढची मोहीम लगेच सुरू करू. थँक्यू सर.' असे म्हणून त्यांनी फोन ठेवला आणि परत त्यांना फोन केला.

'सर... तुम्ही पाठवलेली नवीन बॅच आलीसुद्धा. सर थँक्यू. फोन ठेवतो.' 'हे बघा सावंत. त्यांना आपल्या गेस्ट हाऊसवर घेऊन जा आणि त्या दोघींना कामाची कल्पना देऊन उद्यापासून कामाला लागा. कारण आपल्याकडे वेळ फार थोडा आहे! मोहिते आपल्याला बँकेतल्या खोट्या नोंदी बऱ्याच सापडल्यात. खोटी खोटी नावं सांगून त्यांना कर्ज दिले. पण ती व्यक्ती अस्तित्वातच नाही. तेव्हा उद्या बँकेत जाऊन बँकेला कुलूप लावायचं आणि त्याला लॉकअपमध्ये ठेवायचं. नंतर त्या दुर्गेश पाटलाकडे मोर्चा वळवायचा म्हणजे ती लवलवणारी मोगरी, ते दोघेही एकदम फॉर्म हाऊसवर भेटली म्हणजे दोन तीन दिवस आपण बाहेरच राहणार आहोत. समजलं? चला निघू या. उद्या भेटू.' असे म्हणून सर्व बाहेर पडले.

सकाळचे दहा वाजले होते. थंडीचे दिवस असल्यामुळे धुकं मधून मधून पसरलं होतं. बसस्टॉप जवळच्या चहाच्या छोट्या मोठ्या टपरीवर प्रवाशांची गर्दी दिसत होती. त्या गर्दीत ब्राऊनी आणि लेडी हवालदार शारदाबाई चहा घेत होत्या. एवढ्या गर्दीत सुद्धा ब्राऊनींनी लोकांचं लक्ष आपल्याकडे खेचून घेतलं होतं. ब्राऊनी मुळातच सुंदर दिसत होती. त्यात नटीसारखा ड्रेस करून आपल्या सुंदर डोळ्यांवर गॉगल, पंजाबी ड्रेस, खांद्यावर मोठी पर्स, पायात उंच टाचाचे जरीचे सँडल्स, .....हेअर स्टाईल, सुंदर मेकअप अशा थाटात आजुबाजूला बघत चहा घेत

## शाई

लेखकाच्या लेखणीमधली संपली होती शाई,
लिहायची पण झाली होती त्याला खूप घाई,
रक्ताने मग लिहिली त्याने एक साहसकथा,
अश्रूंनीही लिहून टाकली हृदयामधली व्यथा

**-डॉ. सुमन नवलकर**

होती. जाता येता कुणीही तिच्याकडे बघत राहील! गावातील टपोरी पोरं तिच्याकडे बघून शिट्यासुद्धा मारत होती आणि शारदाबाई तर दुष्काळी भागातून आल्याप्रमाणे अगदी तिच्या मागे मागे हात पसरत उभी होती. ब्राऊनीने थोड्याच वेळात मुलींचे कॉलेज गाठले. 'मी नटी आहे, मला एका हिंदी सिनेमात काम करण्यास दोन चार मुली पाहिजेत.' म्हणून मुलींना विचारत गेली. सिनेमात काम करायला मिळणार म्हणून आणखी दोन तीन मुली तिच्या मागे लागल्या. 'बरं बरं मी उद्या येईन' म्हणून आपला मोर्चा फाईव स्टार हॉटेलकडे वळवला व आपण हॉटेलमधल्या स्वागत कक्षामध्ये सिगारेट पेटवून न ओढता इकडे तिकडे बघत होती व कानाला मोबाईल लावून राधाराजेशी बोलत होती,

'देखिये मैं यहाँ कभीसे आपकी राह देख रही है। मुझे बहुत काम है। मेरा कॅमेरामन आनेवाला है। वो मैने दो चार लडकी ढुंडी है। उसका थोडा फोटो सेशन करके लोकेशन देखके दो दिनमें शूटींग चालू करेगी। अच्छा बाय' म्हणून फोन ठेवला.

ब्राऊनी उगाचच आजुबाजूच्या लोकांना आपण सिनेमावाल्याबरोबर बोलत आहोत असे भासवत होती. तेवढ्यात तिच्याजवळ लोकांचा घोळका जमला. एकाने जरा जास्तच लगट करून 'कुठून ह्या गावात आला?' म्हणून विचारले. 'देखिये मैं दिल्लीसे आई है। मेरा नाम आपण सब जानते है शबाना चाँदनी' तेव्हढ्यात काहींनी हो... हो.. म्हटलं फेमस नटी

'मेरी अभी अभी मेरे डायरेक्टरसे बात हो गयी है। उसने कहाँ मैं जो व्हीलेजवाला लोकेशन बताई तो उसे मंजुर है। तो मुझे फॉर्महाऊस खेती ऐसा लोकेशन चाहिये। यहाँ व्हिलेज बहुत अच्छा है। गन्नेकी खेती और छोटासा घर है तो बहुत अच्छा हम यहाँ ही शुटींग करेंगे।' झालं. ब्राऊनीने टाकलेला खडा तेथे असलेल्या टपोऱ्याला बरोबर लागला.

---

# हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



'हो... हो. हाय की. आवं आमचाचं फार्म हाऊस हाय की. आत्ता घेऊन जातो कि तुम्हास्नी.'

'नहीं... नहीं. इतनी जल्दी नहीं चाहिये क्यूँ के मेरे साथ एक गरीब औरत है। मुझे कुछ काम दो. अभी अभी चायका स्टॉलवर मिली. बहुत पिछे पडी। उसका सब घर फॅमेली चल बसा है। ऐसा किजीये। आपका फार्म हाऊस है तो यहाँ उसको खाना पकाना और साफ सफाईका काम दिजिये। आप ऐसे किजिये फार्म हाऊस का पता मुझे दिजीये शाम को आप यहाँ ही मै मिलंगी मेरा कॅमेरामन आनेवाला है। उसका साथ लेके लोकेशन देखके थोडे दिनके बाद शुटिंग चालू करेंगे. अच्छा मैं अभी चलती हूँ।' असं म्हणून ब्राऊनी तेथून निघाली ती थेट पोलीस स्टेशनवर आली. कोण येवढी नटी आली म्हणून सर्वच जण क्षणभर तिच्याकडे बघत बसले. पण आत येताच तिने गॉगल काढून जयसिंगरावांना पोलिसी सॅलूट ठोकून पोलिसी रुबाबात उभी राहिली. एखाद्या नटीसारखी तयार होऊन आली होती.

'सर, काम फत्ते, आज रात्री त्या पाटलाच्या फॉर्म हाऊसवर छापा टाकायचा.'

येवढे बोलल्यामुळे ही ब्राऊनीच आहे, सर्वांनीच ओळखले जयसिंगरावाने तर उठून तिची पाठ थोपटली व म्हणाले, 'अगं ब्राऊनी दोन दिवस झाले तुझा फोन नाही आणि मोरे व सावंतसुद्धा दिसले नाहीत. आणि राजेबाई, त्या हवालदारबाई त्यांचा काय पत्ता?'

'साहेब, आम्ही सर्व सुखरूप आहोत. मी मोरे आणि सावंताना पाहत होते.' इतक्यात ते दोघे तिथे आले.

'हे बघा हे दोघेसुद्धा आले. मोरे सावंत अहो, तुम्ही हॉटेलातसुद्धा आला होतात.'

'हो पण कुणी नटी खेड्यात शुटिंगसाठी आहे समजलं. पण मिस ब्राऊनी तुम्ही पोलीस खातं सोडून सिनेमात जा.'

'सावंतसाहेब तुम्ही पाहिलंत ना; कसे मुंगळे चिकटले होते. आणि मला तो खेटून बसला होता त्या दुर्गेश पाटलाचा मुलगा. संध्याकाळी त्याच हॉटेलवर येऊन मला फॉर्महाऊसवर घेऊन जाणार आहे. तेव्हा कुणीतरी कॅमेरामन होऊन त्या स्वागत हॉटेलवर मी गेल्यावर पाठवायचा म्हणजे कुणालाही संशय येणार नाही.'

'ब्राऊनी आपला मोहिते आहे ना! तो सिनेमावाल्याप्रमाणे ड्रेस करून आपले पोलिसी छुपे कॅमेरे आणि मोठे कॅमेरा घेऊन येईल. त्याच्या जोडीला नवीन आलेले हवालदार हे हेल्पर म्हणून पाठवू. ब्राऊनी खरोखर दोन दिवसात बाजी मारलीस.' मुंबईत गेल्यावर तुला प्रमोशन मिळणार!' जयसिंगराव एवढे बोलून त्यांनी मुंबईतला मोठ्या सायबांना फोन लावला व सर्व घडलेला वृत्तांत सांगितला व रात्रीच्या कामाची जुळवाजुळव करण्याच्या तयारीला लागले. नवीन आलेल्या तुकडीला महिला आश्रम, दुर्गेश साखर कारखाना, दुर्गेश फार्म हाऊस, दुर्गेश सहकारी को. ऑ. बँक ह्या ठिकाणी पाठवली व आणखीन जास्त पोलीस फौज जयसिंगरावांनी मुंबईहून मागवली आणि धडक मोहीम चालू केली व सर्व ठिकाणी एकदम छापे टाकले. त्यामुळे दुर्गेश पाटलाची तारांबळ उडाली व गुन्हेगारांना पकडून त्यांना गाडीत बसवून ठेवले तोपर्यंत सकाळ झाली. ही बातमी सर्व गावात पसरली. त्यांना बघण्याकरिता पोलीस चौकीत गर्दी लोटली. पण जयसिंगराव, त्याच्या बरोबर आलेल्या सर्व सहकाऱ्यांनी लगेच मुंबई गाठली.

दुसऱ्या दिवशी सर्व पेपरमध्ये जयसिंगराव व त्याचे सहकारी यांचे नाव झळकू लागले. खेड्यात कशाप्रकारे गैरप्रकार चालतात हे उघडकीस आले. अशा रितीने पोलीसांचे नाव उज्ज्वल झाले. पोलीसांनी सापडलेल्या गैर कागदपत्रासोबत त्या सर्वांना न्यायालयात दाखल केले व न्यायाधीशांनी त्यांना योग्य प्रकारे शिक्षा करून पोलीसांचा गौरव केला.

'सद्रक्षणाय खल निग्रहणाय'

जयहिंद- जय महाराष्ट्र!

*

## लेखक आणि नटी

एका विनोदी लेखकाला भेटली 'ट्रॅजेडी क्वीन'
तुझ्या पिक्चरची मीच म्हणाली होणारी हिरॉईन
लेखक म्हणाला, 'ग्लिसरीनने डोळ्यात आणतेस आसू,
हमखास कसं आणशील सांग गालांवरती हसू?'

**-डॉ. सुमन नवलकर**

# अधोगतीच्या वाटेवर.. स्त्री भ्रूण हत्या

**✶ निनाद केशव धैर्यवान ✶**

स्त्रियांविरुद्ध हिंसा जगातल्या जवळ जवळ सर्वच देशात व समाजात कमीजास्त प्रमाणात अस्तित्वात आहे. आपला देश याला अपवाद नाही. हुंड्यासाठी छळ, अन्य कारणास्तव अपमानजनक वागणूक, प्रसंगी मारहाण व बलात्कार यासारख्या घटना सातत्याने ऐकिवात येत असतात.

या हिंसेने भारतात मात्र एक वेगळेच व अमानुष रूप धारण केले आहे. पूर्वी जन्माला आलेल्या मुलींना योग्य अन्नपाण्याविना व जरुरी औषधविना मारले जात असे. पण आता प्रगत वैद्यकशास्त्राच्या मदतीने गर्भाची लिंग चाचणी (Pre-natal Sex Discrement) स्त्रीगर्भ असल्यास, मातेच्या गर्भातच तिची हत्या अर्थात् गर्भपात करायचा, हा अत्यंत घृणास्पद व मानवतेला काळीमा फासणारा प्रकार आज अनेक लोक राजरोसपणे, कायद्याची कोणतीही भीती न बाळगता करत आहेत.

या अपराध्यांमध्ये स्वत:ला सुशिक्षित म्हणविणारे व सांपत्तिक सुस्थितीत असणारेच बहुसंख्येने आहेत. वंशाला दिवा हवा ह्या हट्टामुळे मुलगा व्हावा ही आस धरून बसलेले व त्यापायी स्वत:च्या अद्याप जन्मही न घेतलेल्या मुलीची, मातेच्या गर्भातच हत्या करण्यात माता, पिता, आजी, आजोबा व अन्य निकटवर्तीय आहेत, तसेच समाजातील लोकांच्या स्वास्थ्याचे व प्राणांचे रक्षण करण्याची Hippocratic oath घेतलेले डॉक्टर्स/रेडिओलॉजिस्ट व गर्भपाताची औषधे बेकायदेशीरपणे विकणारे केमिस्टही आहेत. या सर्वांना माणूस म्हणवून घेण्याचा तरी अधिकार आहे का?

स्त्रीभ्रूण हत्येमागे अनेक कारणे आहेत.

✶ मुख्य कारण म्हणजे आपला पितृसत्ताक व त्यामुळेच पुरुषप्रधान समाज, ज्यात पुत्रजन्माशिवाय पितृऋण फिटत नाही. पुत्राने चितेला अग्नी न दिल्यास स्वर्गप्राप्ती होत नाही व केवळ पुत्रच वंश पुढे चालवतो असल्या समजुती परंपरेने रूढ झाल्या आहेत.

✶ कुटुंबात फक्त मुलीच जन्माला आल्यास समाजात कुचेष्टा होणे.

✶ मुली 'परक्याचे धन' आहेत. त्यामुळे त्यांच्या पालन-पोषणावर व शिक्षणावर होणारा खर्च हा वायफळ खर्च आहे ही समजूत.

✶ मुलीच्या विवाहासमयी द्यावा लागणारा प्रचंड हुंडा.

अनेकवेळेला गर्भधारण करूनही केवळ गर्भ स्त्री आहे म्हणून गर्भपात करायला जीला भाग पाडले जाते, त्या स्त्रीच्या शरीरस्वास्थ्याची व मन:स्वास्थ्याची काळजी समाजाला करावीशी वाटत नाही. समाजात फक्त मुलेच बहुसंख्येने असतील तर त्याचे काय दुष्परिणाम होतील याचा साधा विचारही कोणी करत नाही.

केवळ कठोर कायदे करून हा प्रकार आटोक्यात येणार नाही, तर समाजाने या गुन्हेगारांना बहिष्कृत केले पाहिजे. त्याबरोबरच जुनाट चालीरीती व विचारांच्या पगड्यातून समाजाला मुक्त करण्यासाठी प्रभावी समाजप्रबोधनही घडायला हवे. या त्रिसूत्रीशिवाय समाजाची ही अधोगती थांबणार नाही.

मुलीदेखील वंशाचा दिवा आहेत हे समाजाच्या मनावर ठसायला हवे. आज मुली उत्तम प्रकारे शिकून, स्वत:च्या अंगच्या गुणांनी आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करताना दिसतात. आज मुली उच्चविद्याविभूषित होऊन व उच्चपदावर आरूढ होऊन अनेक क्षेत्रात कर्तृत्व गाजवतांना दिसत आहेत. तरीही मुली नकोत हा हट्ट का?

आजीची, आईची, बहिणीची, वहिनीची माया हवी. पत्नीचे प्रेम व साथ हवी. मग मुलगी नको, असे का?

स्त्रीभ्रूणहत्या केवळ एक मानसिकदृष्ट्या सुदृढ समाजच रोखू शकतो.

लेख

# Superstitions

✶ *Aishwarya Velkar* ✶

The recent murder of Dr.Dabholkar – the founder of the anti superstition movement ,got me thinking.What is superstition ? A **superstition** is the irrational belief that future events can be influenced or foretold by specific, unrelated behaviors or occurrences. For example, the number thirteen is considered by many in western society to be inherently unlucky whereas in Japan the number four is often considered unlucky. Many believe that superstitious beliefs originated during the earliest days of humanity. Faced with natural phenomena like thunderstorms and earthquakes, as well as the unpredictability of illness and food supply, human beings attempted to create an understandable world of powers that could be influenced by action. Often, superstitions are born from casual coincidence. For example, if an athlete wears a particular pair of socks on a day he performs particularly well, he may continue to wear the same pair of socks in the belief that the socks were responsible for the success. Future successes reinforce such a belief. Triskaidekaphobia is a common complaint. You may even have it and not realise! If you are overly superstitious, find out why you are! Black Cats bring Bad Luck(?): The origin of this superstition can be traced to ancient Egypt. Back then, their goddess Bast was a female black cat. Christians, at that time, wanting to eradicate all other religions from society, convinced people that black cats were demons. Thus, a black cat crossing someone's path began to be considered as evil, a barrier in one's way to heaven.The widely known story behind 13 being unlucky is that of Last Supper. Judas, the betrayer of Jesus was the 13th guest at the meal. And how did the Friday the 13th superstition originate? Actually, it's just that the 13th day of a month falls on a Friday. There should be nothing scary about it. But with the many beliefs associated with 13th coming on Friday, this date has become a reason to fear. We say "God bless you!" when anyone sneezes. In ancient times, it was thought that a man's spirit lived in his head as air or breath, so if he sneezed, there was a danger of driving away this spirit. Therefore, the utterance of "God bless you" would act as "counter-magic" to keep it from flying away.

Superstitions. Are they beliefs that strengthen? Or are they faiths that blindfold? Do superstitions beef up a timid mind or do they weaken a brave heart? While most of them arise out of fear, some are meant to drive fear away. Superstitious beliefs are an outcome of ignorance and lack of rational thinking, but then they are beliefs after all. Beliefs become notions, then become opinions, and eventually begin to prevail in society.

Many of them stay for years, deep-rooted in the minds of common people while some are wiped off over time. Many superstitions become the basis of certain social customs and go on to become traditions. Such is the power of superstitions that they turn from being false beliefs to becoming strong notions, and the masses start following them. So what if they lack a rational standing? So what if they lack a logical base? Superstitions are beliefs. And beliefs don't need a reason. Or do they?In south India people bathe early in the morning and apply sandalwood on their forehead. People

have now realized that sandalwood keeps the forehead cool and soothes the brain and hence the practice has been there since time immemorial. Why should we not walk under a ladder ?This has always seemed like the most rational of the more common superstitions. After all, if you walk under a ladder, you're pretty likely to have something fall on your head from the top of the ladder. However we should use our own senses and logical abilities before merely following any superstition. Though we should believe and practice superstitions but excess of anything is harmful. Most of the time we adopt any superstitious belief by seeing its prosperous effects on a person who adopted it. We don't search for the logical reason in this, we just blindly follow that superstition. For instance, in India, eating curd before giving any examination is considered lucky. Let's go to the origin of this belief, in past somebody must have worked hard for his exams and must have eaten curd in his meal before his exam. It is obvious that he will get good results since he has worked hard. But all the credit was given to the 'curd' he ate before his exam. And since then it is believed that eating curd before any exam brings success. Now it is worth thinking - how could 'curd' bring success in an examination? Suppose I don't study for any exam and I just eat curd before the exam then will I get successful??? No!. There is no end to the superstitions that have become a part of our lives, without our even remembering the origins or significance of them.

---

# हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



लेख

# तुमच्या आईची.. हरकत नसते का हो?

✶ त्वरिता संजय दळवी ✶

आमची आजी सांगायची, त्यांच्या लहानपणी पहाटेच्या प्रहरी वासुदेव बासरी वाजवत यायचे अन् गाणी गात, गाव जागवत गल्लोगल्ली फिरायचे. गृहिणी इच्छे/ कुवतीप्रमाणे त्याच्या पोतडीत धान्य घालायच्या. आमच्या लहानपणी भंगारवाले, भाजीवाले, कल्हईवाले आणि इतरही खूपकाहीवाले रस्त्यातून आपआपली चीजवस्तू विकायला ओरडत यायचे.

हल्ली कधीही कुठेही फुकटच्या आणि वेगवेगळ्या शिव्या विनासायास ऐकायला मिळतात. काही लोक गाणी म्हणतात, काही लोक शीळ घालतात. तसेच काही लोक शिवी देतात. देणाऱ्याच्या मुखी हजारो... पण माझे कान दुबळे आहेत त्याला मी तरी काय करू?

कुठेही कधीही जा, एकतरी शिवी कानावर पडतेच. सोने महाग झाले, भाज्या महाग झाल्यात, प्रेम महाग झाले आहे. साधे गोड शब्दही महाग झालेत. पण शिव्या मात्र अगदीच स्वस्त झाल्या आहेत. पूर्वीही त्या क्वचितच ऐकायला मिळायच्या. शिमग्यात लोक हक्काने शिव्या देत. तशी प्रथाच आहे. हल्ली मॉल संस्कृती आहे. त्यामुळे अगदी सगळीकडे आणि खूप प्रकारच्या शिव्या सर्रास ऐकायला मिळतात.

मी कुठेतरी वाचले होते की, शिवी दिल्यावर आपल्याला बरे वाटते कारण जेव्हा आपण रागावतो आणि ज्या व्यक्तीवर रागावलो असतो, त्या व्यक्तीला आपण शिवी देतो तेव्हा आपल्या मेंदूतून, आपल्याला चांगले वाटायला लावणारे (फील गुड) द्रव वाहतात आणि आपला राग शांत होतो. तेव्हा कधीतरी राग आल्यावर शिवी देणे आपल्या प्रकृतीच्या दृष्टीने चांगलेच. तसेच Human behavioural studies करणाऱ्यांनी असेही म्हटले आहे की, सतत शिवी देणारी व्यक्ती प्रामाणिक आणि विश्वासू असते. खरेखोटे देव जाणे.

हल्ली प्रकृतीसाठी किंवा तत्त्वासाठी राग अनावर झाला म्हणून नाही तर; सवय किंवा फॅशन म्हणून शिव्यांचा जास्त वापर होत असताना दिसतो.

३०-४० वर्षांपूर्वी लहान मुले क्वचितच शिव्या देत. तो हक्क (?) वडीलधाऱ्यांचा म्हणजे पुरुषांचाच होता. बायका सहसा (उघडउघड) शिव्या देत नसत. मुलीतर नाहीच नाही. आम्हाला सांगण्यात आले होते की, शिव्या 'खालच्या थरातली' लोक देतात. त्यामुळे कधी तर नात्यातल्या एखाद्या काका, मामा अथवा दादने अनवधानाने आमच्या समोर अपशब्द उच्चारला तर आमच्या आईची तारांबळ उडे.

मला आठवतेय, मी ७-८ वर्षांची असताना आमच्याकडे घरकामाला असलेल्या 'शांताला' एकदा रागावून मी 'साली' बोलले होते. शांताने, माझी ही भाषा विषयातील प्रगती लागलीच आईच्या कानावर घातली. आई चपात्या लाटत होती. तिने जराही उसंत न घेता स्टोव्हवर चमचा तापवून माझ्या ओठांना लास दिला. त्यानंतर आजतागायत मी कुठलीच शिवी देवू शकले नाही. म्हणजे, 'गाढवा', 'मूर्खा', 'बावळट'... बस इथपर्यंत मजल मारू शकले. या विषयातील आमची उडी कुंपणापर्यंतही जाऊ शकली नाही.

'अस्सल शिवी' माझ्या ओठावर कधीच आली नाही. तसे आमच्या मित्रपरिवाराने मात्र कान तृप्त केले आहेत. माझ्या काही मित्रांना मी खूप वेळा 'फिनाईलने तोंड धू' असेही गमतीने म्हणते.

हल्ली मुलामुलींची या विषयातील प्रगती थक्क करणारी आहे. जवळजवळ सर्व मुले दिवसातून कमीतकमी १०-१५ शिव्या चणेकुरमुरे खाल्ल्यासारख्या फेकत असतात. महत्त्वाचे म्हणजे

प्रत्येक मुलगा आपल्याच आणि मित्रांच्या किंवा शत्रूच्या आई-बहिणीचा आणि त्यांच्या खाजगी अवयवांचा खुलेआम उद्धार करीत असतो. आई आणि बहिणींची आपणच विटंबना करतोय हे त्यांना कळत नसेल? वडिलांचा आदर करावा हे आपण लहान मुलांना शिकवतो म्हणून असेल कदाचित्, पण वडिलांवरून फार कमी स्तोत्र ऐकायला मिळतात.

मुलीसुद्धा मुलांच्या सुरात सूर मिसळून 'नामस्मरण' करत असतात. मातृदेवोभव...

त्यात सुशिक्षित, अशिक्षित, व्हर्नाक्युलर मीडियममध्ये शिकलेल्या आणि इंग्लीश मीडियममध्ये शिकलेल्या हा भेदभावही नाही. समानतेचा जमाना आहे!

ग, म, भ, ... सारी वर्णमाला तोंडपाठ. हल्ली 'फ' या अक्षरावर सर्वांचे विशेष प्रेम दिसून येते. जावे तिथे आणि ऐकण्याच्या टप्प्यात असेल त्याच्यावर 'फ'कार फेकत सारी भावी पिढी जणू काही कोकोटेंचे सर्टिफिकेटच मिळाले आहे अशा तोऱ्यात 'फाडफाड' बोलत ऐटीत चालत जाते. वाक्यावाक्यात 'एफ' शब्द आला म्हणजे आपण फार पुढारलेले आहोत आणि 'इंग्लीश'चे पापड आहोत असे वाटते यांना.

शिव्या देण्यात कसले आले आहे पुढारलेपण आणि कसली ही घाणेरडी वोक्याब्युलरी! जे ऐकायला इतरांना लाज वाटू शकते ते बोलताना आपण संयम पाळायलाच हवा.

हल्ली राग अनावर झाल्यावर मीही मनातल्या मनात खर्पूस शिव्या देते. विशेषतः रिक्शावाल्यांना. आता कोणत्या ते विचारू नका.

*

## परिवर्तन

गुटगुटीत मल्लेश्वरीने जिम गाठल्यावर
झटक्यामध्ये झाली बुवा तिची 'झिरो' फिगर
हडकुळ्या भरतने गाठलं जेव्हा जिम,
'सिक्स पॅक ॲब्ज'वाला झाला त्याचा भीम.

**-डॉ. सुमन नवलकर**

## चित्र

**-सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर**

धरतीच्या या फलकावरची
अदृश्य ही लेखणी
चित्र रेखितो कलाकार तो
निसर्ग रंगांनी ।।धृ।।

सात समुद्रांच्या शाईने
ठिपके जोडियले
सरितांच्या नाजुक रेखांनी
चित्रबंध रेखिले
वेगवेगळ्या जागा भरल्या
मातीच्या रंगांनी ।।१।।

सागराच्या लाटा कोरिती
नक्षी पुळणीवरी
छाया काळी घनमेघांची
कृष्णरंगही भरी
चमचम चांदी कधी पाण्यावर
कुणी दिली पसरूनी ।।२।।

पाखरांची उडती झालर
दिवसाच्या पडद्याला
सौदामिनीचे कंठ शोभती
रजनीच्या वस्त्राला
पडद्यांची या उघडझापही
बनले दिन रजनी ।।३।।

रोज चालू दे प्रदर्शन परी
आदि न त्याला अंत
गौरवाची निंदेची ना
कलाकार करी खंत
वर्णन करण्या पडते अपुरी
स्तंभित माझी वाणी।।४।।

व्यक्तिचित्रण

# रुमालवाली

**✶ आनंदलक्ष्मी मधुकर विजयकर ✶**

बांद्रा स्टेशनला रिक्षातून बाहेर उतरल्यावर अभावितपणे हातावरल्या घड्याळाकडे लक्ष गेले. ९.०५ वाजले होते. वेळेवर पोचले होते. ९.०५ ची गाडी सुटली. ९.२२ ची गाडी फलाटावर यायला अजून ९.०५ मिनीटे होती. आरामात ब्रिज चढून उतरता येणार होते. माझ्याबरोबर ती पण होती. दररोजच असायची. हातात रंगीबेरंगी रुमाल घेऊन माझ्या बरोबर ९.२१ ची चर्चगेट लोकल पकडायची. माझा जरी पहिल्या वर्गाचा पास होता तरी; मी दुसऱ्या वर्गाने प्रवास करायची. मधला डबा. त्या डब्यातून चर्चगेटपर्यंत गाणी म्हणत प्रवास करणाऱ्या मुलींचा एक ग्रुप होता. त्यांची गाणी ऐकत वेळ कसा जायचा कळायचंच नाही. त्या दिवशी मी बोरिवलीतून निघाले. एक्सटेंशन मूळ दूसरा वर्गच होता, 'अरे, ताई तुम्ही येथे?' तिच्या तोंडावर आश्चर्य होते, 'माझा आता हाच मार्ग झालाय,' मी.

एक आठवड्यानी परत एक दिवशी तिच्याबरोबर एक मनुष्य होता. पुरा नाही. एक पाय कमी असलेला, 'ताई, हो टोनी' तिने लाजतच सांगितले. 'आम्ही गोरेगांवच्या चर्चमध्ये लग्न केलं, तिच्या डोक्यावर छप्पर नव्हते. त्याच्याकडे एक चाळीत खोली होती. विकलांग म्हणून त्याच्या नावावर मिळालेली. सरळ सोपी व्यवस्था होती.

तुम्हाला माहित्येय? त्यांना दोन मुली झाल्या. त्यांची लग्न पण झालीत. दोघीचेही संसार चांगले चाललेत. खूप आनंद झाला.



# हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# The Dragon who became vegetarian

*✶ Anika Jaideep Vijayakar ✶*

*Minneapolis, USA*

*Age 9 ½ yrs*

There was a creature that was so ugly nobody took a second glance, it was a dragon. His name was Smog. Smog had just ate 400 soldiers from the kingdom Croatia and was still hungry. I guess for dragons 400 soldiers isn't enough? So Smog went out and looked for food, he passed villages and several peasants but what he was really interested for was a juicy king. Finally Smog saw a tall castle and his mouth watered at the thought of the juicy king! When he got to the castle Smog saw a beautiful princess and she looked delicious. Smog swooped down impulsively and grabbed the beautiful princess with his nasty claws. The princess was frightened and bewildered by this action. Smog took the princess to his cave and was looking forward to eating her. Once they got to the cave Smog wanted to at least tell the princess why she was here. "Excuse me , princess you might be wondering why you are here-." The princess interrupted the dragon "for your information my name is Princess Elizabeth and I know why I am here, you want to eat me." He nodded and opened his mouth and was ready to eat her but got interrupted by the princess again." Wait, why eat me when I am so skinny when you could eat something fat and juicy." The dragon thought about this she was pretty skinny, but he was starving and wanted to know what was more appetizing. Smog asked "So what do you suggest to eat." The princess smiled and said "Well eat fruits like strawberries and apples" and she held a huge red apple "They are very juicy and way better than eating humans or any other animals." Smog looked at the juicy apple and ate it out of her hand, it was delicious maybe the princess was right why should he eat disgusting humans and other revolting animals. "Well you might be right Elizabeth but what about you where will you go." The princess was relieved and answered " you could let me go and I will go back to the castle also there is a garden at the castle where you saw me, in the garden there are the juiciest fruits go there all the time and eat as much as you want as long as you don't eat a single living being.

From that day on Smog went to the garden and ate the fruits there and never ate a single living being and he also became very good friend with Princess Elizabeth. AND THAT IS HOW THE DRAGON BECAME VEGETARIAN

✳

<u>**बालसाहित्य**</u>

# ऐका, नदी बोलतेय्

**✶ पद्माकर रणजीत ✶**

चिंगी कपाळाला आठ्या घालून रागारागाने घराबाहेर पडली. चालत चालत नदीवर एका झाडाखाली येऊन बसली. तिचे इकडे तिकडे कुठेही लक्ष नव्हते.

त्या आईला ना अजिबात समजत नाही. अख्खा वेळ अभ्यास, अभ्यास आणि अभ्यास. आम्हाला दुसरी काही आवड नाही वाटते? तिला कसा सारखे काम करायचा कंटाळा येतो. तसा आम्हाला अभ्यासाचा कंटाळा नाही का येणार? सारखे भूगोल, इतिहास, मराठी आणि हो ते इंग्लिश पण!

'शुक शुक' कुठून तरी आवाज आला. तिने चमकून इकडे तिकडे पाहिले. पण कुणीच नव्हते. ''अगं मी, मी नदी बोलते आहे.''

चिंगीने वाकून पाण्यात पाहिले तर काय? एक अतिशय सुंदर असा चेहरा पाण्यावर तरंगत होता.

''तू कोण गं?'' चिंगीने विचारले, ''मी ना? मी नदी. पण तू का येवढी रागावली आहेस आणि कोणावर?''

''अगं बघना तूच'' चिंगी कपाळाला आठ्या घालून उत्तरली.

''अगं माझी आई? अगं सारखी अभ्यास अभ्यास आणि अभ्यास.''

''अगं, पण तुझी आई ना ती? मग तुझ्या भल्याचेच सांगणार. तिला असेच वाटणारच की तू खूप शिकावे, अभ्यास करावा, तुझे नाव सगळीकडे व्हावे.' नदी हसून उत्तरली, 'मग तुला मेहनत करावीच लागणारच! तुझे बाबा नाही का सबंध दिवस मेहनत करतात? अगं मेहनतीला पर्याय नाही. समजले का? मेहनतीची फळे गोड असतात.''

'बरं, बरं समजले का? मी आता निघते माझा होमवर्क बाकी आहे? जाऊ ना? उद्या पण येऊ ना? चिंगाने निरोप घेतला व ती घराकडे पळाली.

*

# Sweet Revenge

-Mithli G Velkar

Bhole, a sweetmeat seller led a normal life untile competition showed up. Nandu opended His sweetmeat shop besides bhola's and all of bhola's customers went to Nandu's Bhola thought ,``That Nandu has stolen all my business, what shall I do now?" however bhola got an idea overnight. The next day bhola's shop had the billboard, All the people of this city eat my sweet's." and bhola's old customers flocked back to him followed by many new customers but Nandu did not give up so easily. He wasted no time putting up the billboard, `` All the people of this state eat my sweets." The banner worked on the people like a magnet. The next day Bhola put up the billboard `` All the people of this country eat my sweets' and was rather convinced that Nandu couldn't beat this one. However Nandu was smarter than that what Bhola estimated and came up with a billboard. which said, ``My sweets are exported around the world" Bhola accepcted defeat but his wife gave hime a mind blowing idea in the night. The next day Bhola's shop had a billboard which stated the following `Nandu eats sweets from my shop."

*

# बालचित्रकला



**ARNEET DHARADHAR**



**ARNAV DHARADHAR**

## BOOM

Alone in the desert with you
Run as fast as you can
I will get still get you
The sun's rays burning on my neck
Burning on my neck
I'm getting heated up
BOOM
That's the reaction
When I get you
BOOM
That's what I said
BOOM
like dynamite
That's what you get
For being a bad bad girl
BOOM
You said nasty words to me
You were playing games with me
I suffered because of you
BOOM
And now it all stops
And now it all ends

**-Anika Jaideep Vijayakar**

## BLACK CATS

Black cats Black cats
We love Halloween
Black cats Black cats
We don't like to be seen

Black cats Black cats
We make a good a team
We prowl on Halloween
That's our night to shine

Black cats Black cats We are always right
From the full moon light A light so bright
On this occasion it's not a pretty sight
Because it's on scary Halloween night

**-Anika Jaideep Vijayakar**
Minneapolis USA
Age 9 ½ yrs

## BEST FRIENDS

When there's Somebody you like a lot
When there's Somebody you trust
You share everything together
And you never lose touch
Best friends that's what they are
Best friends never apart
There's something that makes them special
They share everything together
When one gets hurt the other feels pain
When one feels happy the other feels joy
Best friends that's what they are
Best friends never apart

**-Anika Jaideep Vijayakar**

अहवाल

## पाठारे प्रभु  महिला समाज

महिला समाजाचा ९९ वा स्थापना दिन रविवार, दिनांक २२ सप्टेंबर २०१३ रोजी दुपारी ४ वाजता. पाठारे प्रभुं सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२ वा रस्ता खार (प.) येथे नृत्यालंकार सौ.  स्मृति शीतल तळपदे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. त्यावेळी संगीत स्पर्धा व नृत्यस्पर्धा घेण्यात आल्या.

समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर यांनी अध्यक्षांचे व परीक्षकांचे स्वागत केले. तसेच पाठारे प्रभु महिला समाजाची वेबसाईट चालू केल्याबद्दल श्री. राहुल आगासकरांचेही स्वागत केले.

सौ. स्मृती तळपदे यांनी आपल्या भाषणात देवाने दिलेली कला परिश्रम घेऊन कशी जोपासावी, तसेच त्याला शास्त्रीय अभ्यासाची जोड मिळाल्यावर ती कशी उद्दीपित होते. त्यामुळे आरोग्यही कसं चांगलं रहातं. आजच्या मुलांना वेगवेगळ्या माध्यमातून संधी मिळते. त्याचा फायदा घ्यावा. त्यामुळे आत्मविश्वास वाढतो; असे सांगितले.

संगीत स्पर्धा विषय- आशा भोसले यांनी गायलेले मराठी गीत

मुलींसाठी (१५ वर्षाखालील)

कु. अदिती सचिन विजयकर ही एकच स्पर्धक असल्यामुळे तिला समाजातर्फे बक्षीस दिले जाईल.

महिलांसाठी प्रथम क्रमांक श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे,

द्वितीय क्रमांक-श्रीमती मधु वसंत धुरंधर,

तृतीय क्रमांक-सौ. सुहास नंदकुमार विजयकर

नृत्यस्पर्धा-मुले, मुली (वय ५ ते ९)

प्रथम क्रमांक-कु. वेदिका आश्विन प्रधान, द्वितीय क्रमांक-कु. राहिल रितेश कीर्तिकर,

मुले, मुली (वय १० ते १५)

प्रथम क्रमांक-कु. चिन्मयी निखिल तळपदे,

द्वितीय क्रमांक-कु. आशिका पुष्पल विजयकर

महिलांसाठी (वय १६ ते २५)

सौ. मिहिका मिथिल नवलकर ह्या एकच स्पर्धक असल्यामुळे त्यांना समाजातर्फे बक्षीस दिले जाईल.

(वय २६ ते ४०)

डॉ. कु. अपूर्वा हर्षद विजयकर ह्या एकच स्पर्धक असल्यामुळे त्यांना समाजातर्फे बक्षीस दिले जाईल.

(वय ४० वर्षावरील)

सौ. अनिला विराग धैर्यवान ह्या एकच स्पर्धक असल्यामुळे त्यांना समाजातर्फे बक्षीस दिले जाईल.

सौ. मिहिका मिथिल नवलकर यांना उत्कृष्ट नृत्याविष्काराची ट्रॉफी देण्यात आली. तसेच उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शकाचे पारितोषिक श्री. मिथिल किरण नवलकर यांना देण्यात आले. एका अनामिक दात्याकडून भाग घेतलेल्या सर्व स्पर्धकांना बक्षीस देण्यात आली. काही स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आली. उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकरांतर्फे उत्कृष्ट नृत्याविष्काराची ट्रॉफी देण्यात आली.

संगीत स्पर्धेचे परीक्षण सौ. शारदा गोडबोले यांनी केले. व नृत्यस्पर्धेचे परीक्षण सौ. मनिषा निगुडकर व सौ. स्मृति तळपदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन चिटणीस सौ. नीता सेंजित ह्यांनी केले. देणगीवाचन सं. चिटणीस सौ. अक्षदा तळपदे व आभार प्रदर्शन सं. चिटणीस सौ. नूतन कीर्तिकर ह्यांनी केल्यानंतर थंडगार कुल्फीने कार्यक्रमाची सांगता झाली.

महिला समाजातर्फे दिनांक १९.१०.१३ रोजी पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात नवरात्रीचा 'दांडिया' सायंकाळी रंग चढवून गेला. प्रमुख पाहुण्या होत्या डॉ. अनुराधा प्रदीप धैर्यवान. उत्कृष्ट वेशभूषेकरीता, नृत्याकरिता बक्षिसे देण्यात आली. ज्येष्ठ बंधुभगिनींनीसाठी खास बक्षिसे देण्यात आली. ही खासियत. 'लकी डीप' चाही कार्यक्रम रंगला. टिपऱ्यांचा तालबद्ध आवाज, रंगारंग रंगलेले प्रभूजन, अल्पोपहाराची लज्जत यामुळे दरवर्षीप्रमाणे महिला समाजाने हा कार्यक्रम आयोजित करून रंगत आणली.

## पाठारे प्रभु हौशी कला मंदीर

दरवर्षीच दिवाळीची संध्याकाळ कला मंदीरामुळे पाठारे प्रभू एकत्रित येऊन साजरी करतात. डॉ. प्रिया सुधीर धुरंधर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम साजरा झाला.

लता नार्वेकरांचे 'आधी बसू मग बोलू' हे विनोदी नाटक सादर झाले. नेहमीप्रमाणे रंगशारदापासून अंधेरी आणि गिरगावपर्यंत बसची व्यवस्था होती. लकी ड्रॉ चा कार्यक्रमही नेहमीप्रमाणेच रंगला. श्री. प्रकाश नायक, श्री. चंद्रहास जयकर, श्री. अतुल मोरेश्वर जयकर आदी सेवाभावी कार्यकर्त्यांचे कार्य अभिमानास्पद आहे. त्यांच्या वागण्यात कुठेच 'दिवाळीनो भपको' नसतो. त्यांना शुभेच्छा.

## पाठारे प्रभू सोशल समाज

दिवाळीचे स्नेहसंमेलन २३ नोव्हेंबर १३ रोजी खार येथील सांस्कृतिक सभागृहात सौ. उर्वशी आनंद धराधर यांच्या अध्यक्षतेखाली साजरे होणार आहे. सौ. स्मृति तळपदे यांच्या नृत्यादिग्दर्शनाखाली सौ. शुभदा दादरकरांचा 'जय शंकरा। विद्याधरा!' हा रंगारंग कार्यक्रम दिवाळी धमाका करेल. शुभेच्छा!

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दिनांक २०.१०.१३ रोजी चॅरिटीजतर्फे दिवाळी निमित्त गरजूंना साखर, रवा, रोख पैसे, साड्या आदींचे वाटप झाले. यात इतर दात्यांनीही मदत करून चॅरिटीजच्या कार्याला 'मम' म्हटले. अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांच्या हस्ते हे वाटप झाल्यानंतर उपस्थित मान्यवर आणि दातृत्वाचे लाभार्थी यांनी एकत्रित भोजन केले. २४ नोव्हेंबरला विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा 'शारदेचा दरबार' भरवणार आहेच. शुभेच्छा!

## अभिनंदन

✳ डॉ. सुमन नवलकर यांना अंकुर पुरस्कार प्राप्त झाला. यंदाच्या वीस दिपावली अंकात त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. अभिनंदन.

✳ 'गिधाडे' या नाटकाचे पुनरुज्जीवन झाले. त्याच्या निर्मात्या आहेत कल्पिता तळपदे. अभिनंदन.

✳ गाजत्या 'ठष्ठ' या नाटकाचे स्थिरचित्रण श्री. नंदू धुरंधर यांचे आहे. अभिनंदन.

✳ सध्याच्या अनेक महत्त्वपूर्ण नाटकात प्रकाशयोजना श्री. शीतल तळपदे यांची आहे. परभांची दिवाळी यामुळे प्रकाशमय होते. अभिनंदन.

✳ सुमित्रा भावे यांच्या 'संहिता' या अनेक पारितोषिके प्राप्त चित्रपटासाठी अॅड. सौ. केतकी जयकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. अभिनंदन.

✳ रवींद्र नाट्य मध्ये नुकताच नृत्य संगीत सोहळा झाला. नृत्यदिग्दर्शन आणि सादरीकरण सौ. स्मृति तळपदे यांचे होते

✳ प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी विशाखा पुरस्कार, शांताराम कथा पुरस्कार, शासनाचा बृहन् महाराष्ट्र पुस्तक पुरस्कार, दैवज्ञश्री कथा पुरस्कार आदीत परीक्षक म्हणून काम पाहिले. परीक्षक या नात्याने त्यांनी 'दैवज्ञश्री'च्या प्रकाशन सोहळ्यात भाषण केले 'भारतातील संत महिला' या विषयावर त्यांचे ठाणे येथे व्याख्यान झाले. त्याबद्दल अनेक वृत्तपत्रांनी भरभरून नोंद घेतली. एकूण ११ दिवाळी अंकात त्यांचे समीक्षा लेख, मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. 'मलबार हिल असोसिएशन'तर्फे ज्येष्ठ नागरिक म्हणून त्यांचा सत्कार श्री. सचिन अहीर यांच्या हस्ते करण्यात आला.

✳

## प्रभुतरुणास देणगी

✳ कस्तुर रवींद्र तळपदेकडून रु. १००१/-

✳ श्रीमती मीना रमेश जयकरकडून त्यांचे पती कै. रमेस गजानन जयकर यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त रु. ५०१/-

✳ सौ. पूनम माधव कुर्डेकर याजकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

***चुकीची दुरुस्ती:-***

सप्टेंबर अंकात देणगीच्या वृत्तात श्री. राजेश रमेश तळपदे यांजकडून रु. ५०१/- असे वाचावे.

✳

## परीक्षेतील सुयश

**बी. एस्सी कॉम्प्युटर**

श्री. विशाल विकास वाझकर ७०.५ टक्के

(विल्सन कॉलेजमधून सर्वप्रथम. लंडन येथील डी मॉट विद्यापीठात एम. एस्. (आय.टी.) करण्यासाठी जात आहेत. अभिनंदन.)

✳

## प्रभुतरुणाची डायरी

**जनन**

२७-९-१३ सौ. पूनम आणि श्री. ऑ. विशाल अशोक प्रधान, कन्या, पुणे,

**कुर्यात बटोर्मंगलम्**

२६-१०-१३ आरित प्रणव शिवनाथ देसाई, वांद्रे

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| २४-१०-१३ | श्रीम. मीरा शांताराम जयकर, | वय ८०, | अंधेरी |
| ३०-१०-१३ | प्रभा मधुसूदन कोठारे, | वय ९३, | बोरीवली |
| २८-१०-१३ | श्री. मनोज मधुकर कोठारे | वय ५२ | बोरीवली |
| २९-१०-१३ | श्री. विनयकुमार कोठारे | वय ८२ | बोरीवली |
| १२-१०-१३ | श्रीम. विलासिनी वीरसेन कोठारे | वय ८२ | ठाकुरद्वार |
| ०७-११-१३ | श्री. तुषार मदन नवलकर | वय ४९ | दादर |

✳

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**
स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८ ०० ४४

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| १) | प्रभादेवी ट्रस्टकडून | २०००/- |
| २) | सौ. लीना मिलिंद वाझकर | २०००/- |
| ३) | श्री. विजय ग. प्रधानकडून (सौ. सुनेत्रा वि. प्रधान स्मरणार्थ) | १०००/- |
| ४) | सौ. चंदिनी राजस अजिंक्य | ५०१/- |
| ५) | सौ. नीता दिपक विजयकर | ५००/- |
| ६) | सौ. स्वरांगी स्मितचित्र नवलकर | ५००/- |
| ७) | सौ. मयुरा गुंजारव नायक | ५००/- |
| ८) | श्रीम. माधुरी विहंग नायक | ५००/- |
| ९) | कुमार विहान श्रीनल कोठारे | ५००/- |
| १०) | सौ. प्रतिमा विनोद प्रधान | २५१/- |
| ११) | सौ. सुमन सुवर्णकुमार नवलकर | २५१/- |
| १२) | श्रीम. सुहासिनी सुहास कोठारे | २०१/- |
| १३) | सौ. शोभा रंजन विजयकर | १५१/- |
| १४) | सौ. आशा जयबाळ विजयकर | १२५/- |
| १५) | श्रीम. उर्मिला विजय धैर्यवान | १०१/- |
| १६) | सौ. शैला प्रदीप राणे | १०१/- |
| १७) | सौ. सुरेखा बन्सी धुरंधर | १०१/- |
| १८) | सौ. अनुराधा सीमित देसाई | १०१/- |
| १९) | सौ. उर्मिला उदय जयकर | १०१/- |
| २०) | सौ. ज्योत्स्ना रामकृष्ण तळपदे | १०१/- |
| २१) | सौ. धनश्री विनेश तळपदे | १०१/- |
| २२) | सौ. मनीला अनिल राव | १०१/- |
| २३) | श्रीम. सुहासिनी अशोक कीर्तिकर | १०१/- |
| २४) | सौ. यशोदिनी यदुवीर राणे | १०१/- |
| २५) | सौ. वैजयंती जयेश सक्सेना | १०१/- |

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| २६) | सौ. ऐशाना अलोक प्रधान | १००/- |
| २७) | सौ. उत्तरा ललित कोठारे | १००/- |
| २८) | सौ. सुरेखा प्रदीप कोठारे | १००/- |
| २९) | सौ. श्रृता आनंद तळपदे | १००/- |
| ३०) | सौ. आश्विनी यश तळपदे | १००/- |
| ३१) | सौ. मेनका जयपाल तळपदे | १००/- |
| ३२) | सौ. रिया जितेश तळपदे | १००/- |
| ३३) | श्रीम. शिल्पा रसिक तळपदे | १००/- |
| ३४) | सौ. सुहास नंदकुमार विजयकर | १००/- |
| ३५) | सौ. आश्विनी दिप विजयकर | १००/- |
| ३६) | सौ. मेघना विवेक विजयकर | १००/- |
| ३७) | सौ. रोनिका सचिन विजयकर | १००/- |
| ३८) | सौ. भारती रसिक विजयकर | १००/- |
| ३९) | सौ. लुविना समित विजयकर | १००/- |
| ४०) | सौ. मीनल विजय कोठारे | १००/- |
| ४१) | सौ. पूजा मंदार कोठारे | १००/- |
| ४२) | सौ. सुजाता दिवाकर कोठारे | १००/- |
| ४३) | सौ. आशा विराग धैर्यवान | १००/- |
| ४४) | सौ. कुंदा प्रताप वेलकर | १००/- |
| ४५) | सौ. ऐश्वर्या तेज वेलकर | १००/- |
| ४६) | सौ. रश्मी प्रमोद जयकर | १००/- |
| ४७) | श्री. कौशिक सुभाष जयकर | १००/- |
| ४८) | सौ. नंदा दिपक नवलकर | १००/- |
| ४९) | सौ. यशाली राहुल आगासकर | १००/- |
| ५०) | सौ. जयश्री राजशेखर राणे | १०१/- |